१७
वर्षारंभ अंक

शनिवार । ४ जून १९७७ । ७५ पैसे

# माणूस

ट्रक-टँकर्स मालकांच्या संघटना काँग्रेसपक्षाकडे आहेत.
निवडणुका ऐन तोंडावर आल्या असताना
हा संप का घडवला गेला?

माहितगार

नंदिनी सत्पथींच्या निवडीमागे कोणते निकष
लावण्यात आले ?

ओरिसा, उत्तर प्रदेश, बिहार....
विधानसभा निवडणुकीचे धावते चित्र ( पृष्ठ ६ )

स्वर्गीय अमिया चक्रवर्ती

दोन दशकांवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या
या दिग्दर्शकाची आठवण जागवणारा महोत्सव . . .
( पृष्ठ ३१ )

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरा-अंक पहिला

४ जून १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी .

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९


# ट्रक-टॅंकर्स मालकांच्या संपामागील राजकीय हेतू!

माहीतगार

चिलीमध्ये अलादे यांचे लोकनियुक्त सरकार उलटून टाकण्यात आले घडवून आणलेल्या उठावात अलादे यांना ठार मारण्यात आले या उठावापूर्वी काही दिवस आधी चिलीमध्ये ट्रक-मालकांनी वाहतुकीचे दर वाढवून मिळावेत, यासाठी संप केला होता. चिलीची सारी अर्थव्यवस्था आयातीवर अवलंबून होती त्यामुळे वाहतूक करणाऱ्या ट्रकमालकांनी संप पुकारताच तेथे अनवस्था प्रसंग ओढवला व अराजक निर्माण झाले. चिलीच्या या घटनेची आठवण गेल्या आठवड्यात मुंबईत ट्रक व तेलवाहू ट्रकच्या मालकांनी सुरू केलेल्या संपामुळे झाली. चिलीमध्ये घडले तसे या देशात घडले, असा अर्थ लावण्याकरता चिलीच्या घटनेची आठवण करून दिली नाही दोन्ही घटनेत काही तरी समानधर्मी आढळते आहे चिलीमधील संप राजकीय हेतूने घडवून आणला होता. असाच राजकीय हेतू मुंबईतील ट्रक-मालकांच्या संपामागे होता, एवढे साम्य दोन्ही घटनात आहे त्याचे परिणाम वेगवेगळे आहेत. मुख्यमंत्री श्री. वसंतरावदादा पाटील यांनी तूत तरी मध्यस्थी करून संप मिटवला आहे.

हा मुंबईतील ट्रक-टॅंकरचा संप असला तरी, त्याची झळ महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश या तीन राज्यांना प्रामुख्याने लागली. मुंबईतील तेरा हजार ट्रक व चादा हजार टॅंकर्स आहेत याशिवाय अन्य राज्यातील ट्रक- टॅंकरची वाहतूक मुंबई-महाराष्ट्रात होत असते महाराष्ट्राचे वाहतूकमंत्री श्री. बाबूराव काळे यांनी सांगितल्यानुसार महाराष्ट्रात सर्व मिळून एक लाख ट्रक व टॅंकर्स वाहतुकीचे काम करतात.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर ट्रक वाहतूक केली जात असून लोकांना रोज लागणाऱ्या वस्तूपासून कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालापर्यंत वाहतूक होत असते. त्यामुळे असंख्य कामगाराच्या रोजगाराचा, इंधनाचाही प्रश्न ट्रक-टॅंकरच्या संपामुळे आ वासून उभा राहिला होता

मुंबईचे जीवन ग्रामीण भागातून होणाऱ्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील मालाला मुंबई बाजारपेठ आहे तेथील मालच आला नाही तर, त्याच्या उत्पादकांना मालाला उठाव नसल्याने पैसा मिळणार नाही स्वातंत्र्यानंतरच्या तीस वर्षांत एकाच पक्षाचे स्थिर सरकार असतानाही खेडेगावातील पिण्याच्या पाण्याची सोय झालेली नाही. कित्येक खेड्यांना टॅंकर्समधून पाण्याचा पुरवठा केला जातो केवळ पिण्याच्या पाण्याचाच टॅंकर्समधून पुरवठा होतो असे नव्हे, तर मुंबईतील अनेक कारखान्यांना टॅंकर्समधून पाणीपुरवठा केला जातो शंभर टॅंकर्स कारखान्याकरता पाणीपुरवठा करतात. संप वेळेवर मिटला नसता तर, कच्च्या मालाचा पुरवठा संपामुळे थांबला असल्याने कापड, रासायनिक, प्लॅस्टिक आदी उद्योगातील आठ लाख कामगाराच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असता

ट्रक व टॅंकर्स मालकांना वाहतुकीचे दर वाढवून पाहिजे होते ट्रक-टॅंकर्स मालकांची संघटना काँग्रेस पक्षाकडे आहे संपावर जाणाऱ्या मालकांनी संपावर जाण्यापूर्वी किती वेळा व कशा पद्धतीने वाहतुकीच्या दराचा प्रश्न उपस्थित केला होता, हा संशोधनाचा विषय होईल ! वाहतुकीचे दर परवडणारे नाहीत, याचा साक्षात्कार मालकांना अचानक कसा झाला? आजपर्यंत ज्या दराने वाहतूक केली तेच दर सध्याही आहेत. वाहतुकीचे दर परवडणारे नव्हते तर, मालकांनी ते दर मान्य करून आतापर्यंत वाहतूक का केली? दर मान्य करताना ट्रक व टॅंकर मालकांनी दर परवडणारे आहेत की नाही, याचा विचारच केला नव्हता काय? असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. त्याला समाधानकारक उत्तर दिले जात नाही.

'आज जे दर आहेत ते घेऊन ट्रक व टँकर्स मालकांना वाहतूक करणे परवडणार नाही मालकांना दर वाढवून मिळाले पाहिजेत. राज्यसरकारला मालकाच्या या मागण्या रास्त वाटतात,' असे वाहतूकमंत्री श्री. काळे यांनी पत्रकारांना सांगितले. म्हणजे राज्यसरकारची सहानुभूती मालकांच्या संपाला आहे, हे स्पष्ट आहे. कामगारांनी रास्त मागण्यांसाठी संप केला तरी कामगाराच्या मागण्यांना एवढ्या स्पष्ट शब्दात कधीही सहानुभूती अथवा पाठिंबा सरकारने दाखवलेला नाही. इतकी स्पष्ट सहानुभूती राज्यसरकार या सपाबाबत का दाखवत आहे ?

या प्रश्नाचे उत्तर किंवा या उत्तराचा सुगावा, थोडासा कानोसा महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात लागतो शिबिरात भाषण करताना माजी मुख्यमंत्री वसतराव नाईक म्हणाले होते की, केंद्रात दुसऱ्या पक्षाचे सरकार आहे राज्यात आपले सरकार आहे. राज्यसरकार म्हणून केंद्र सरकारला आमचे सहकार्य राहील. पक्ष म्हणून पक्षीय पातळीवर केंद्र सरकारबाबत वेगळे धोरण राहील. ते धोरण काय व कसे ठेवायचे, याचा विचार केला जाईल पक्ष म्हणून स्वीकारावयाच्या वेगळ्या धोरणाची ही पहिली चाल नाही ना, अशी शंका घेण्यास बराच वाव आहे. ट्रक–टँकर्स मालकाच्या संघटना काँग्रेसकडे असल्याने केंद्र सरकारला अडचणीत आणण्याच्या हेतूने हा सप घडवून आणला असावा ! नाही तर आजच अचानक सध्याच्या दरात वाहतूक करणे परवडत नाही, म्हणून सप कशाला झाला असता ? सप होण्यापूर्वी मागण्या माडणे, त्यावर चर्चा, वाटाघाटी केल्या जातात. त्यातून मार्ग निघाला नाही तर मग सपाचे हत्यार उपसले जाते. पण मालकाच्या सपाला वेगळे तत्त्व असावे ! वाटाघाटी वगैरे करण्याची काही आवश्यकता नाही एकदम सपच असा खाक्या 'मालक ट्रेड युनियन'चा दिसतो !

वाहतूकच ठप्प झाली तर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा होणार नाही व्यापारी काळाबाजार करू लागतील. किंमती वाढतील उत्पादकांना त्यांच्या मालाला उठाव नसल्याने पैसा मिळणार नाही. कच्च्या मालाची वाहतूक नाही म्हणून कारखाने बंद करण्याची पाळी येईल व तसे झाले की, जनता पक्षाचे सरकार लोकाचे मूलभूत प्रश्न सोडवण्यास असमर्थ ठरले आहे, या सरकारच्या कारकीर्दीमध्ये जीवन जगणे असह्य झाले आहे, असा प्रचार करून जनता पक्षाच्या सरकारविरुद्ध वातावरण निर्माण करावयाचे ! या वातावरणाचा फायदा जूनमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी घेता येईल तेवढा घ्यायचा ! हे राजकारण या सपामागे आहे. प्रस्थापित सरकारविरुद्ध जनतेचा असतोष पेटवण्यासाठी चिलीमध्ये ट्रक-मालकानी सप केला होता. मुबई–महाराष्ट्रातील सपामागेही प्रस्थापित सरकारविरुद्ध असतोष पेटवण्याचा प्रयत्न आहे त्यामुळेच दरवाढीच्या मागणीपेक्षा राजकीय कारणाने घडवून आणलेला हा सप आहे, असे म्हणावे लागते.

मालकानी तडजोड घडवून यावी म्हणून लवाद स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे. पण तेल कपन्या लवाद स्वीकारण्यास तयार नाहीत, असे महाराष्ट्राचे मत्री श्री काळे सागत होते तेल कपन्याची मालकी केंद्र सरकारची असल्याने कपन्यानी लवाद स्वीकारावा, यासाठी मुख्यमत्री वसतरावदादा पाटील पेट्रोलियम मत्री एच. एन बहुगुणा यांच्याकडे प्रयत्न करीत होते. तेल कपन्याची भूमिकाही स्पष्ट होती. वाहतुकीसाठी तेल कपन्यानी टेंडर्स काढली होती टेंडर्सचे दर अधिक होते; म्हणून वाटाघाटी करून वाहतुकीचे दर ठरवण्यात आले आहेत.

वाटाघाटीने दर ठरवले आहेत त्यामुळे ते ठरवताना खर्च परवडणार की नाही पाहिले असणारच ! तेल कंपन्याबरोबर एजंटानी करार केले आहेत व हे एजट आठ टक्के रक्कम स्वत: घेऊन टँकर्स मालकाना वाहतुकीचे पैसे देते. आजपर्यंत टँकर्स मालकानी एजंटाशी व्यवहार केले. हे व्यवहार करताना परवडणे न परवडणे या गोष्टीचा विचार करूनच टँकर्स मालकानी दर मान्य केले होते तेल कंपन्याचा करार एजटाशी झालेला आहे. एजटानी दर वाढवून मिळावा अशी मागणी केलेली नाही. त्यामुळे दरवाढीच्या प्रश्नावर कपन्यानी लवाद स्वीकारण्याचा प्रश्नच येत नाही, असे तेल कपन्याचे म्हणणे आहे. येथेही गेल्या तीस वर्षांच्या राजवटीचा प्रश्न येतो. काँग्रेसच्या राजवटीमध्ये दलाली पद्धत नष्ट झाली नाही. सरकारने दलाली पद्धत नष्ट व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले नाहीत. दलाली नसती तर तेल कंपन्यानी ठरवलेले दर मालकाच्या पदरात पडले असते. या दलालीमुळे मालकाचे नुकसान होते, ते टाळण्यासाठी टँकर्स मालकानी आपल्या सहकारी संस्था काढाव्यात, अशी कल्पना पेट्रोलियममंत्री एच. एन. बहुगुणा यानी केली आहे. मालकाची त्याला तयारी आहे का ? तेल कपन्याशी करार करणाऱ्या एजंटानी दरवाढीची मागणी केलेली नाही त्यामुळे कपनीने लवाद स्वीकारण्याची तयारी ठेवली नाही तर केंद्र सरकार लवाद मान्य करत नाही. सरकारचे धोरण आडमुठे आहे, असाही प्रचार त्यामुळे करता आला असता.

वाहतूक करणाऱ्याच्या सपाचे परिणाम सामान्य माणसाला भोगावे लागणार होते. त्यामुळे संप काही काळ असाच चालू राहिला असता तर जनतेचा सार्वत्रिक असतोष निर्माण झाला असता. त्यासाठी पद्धतशीरपणे प्रयत्न होत असतानाच उजव्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या अगावर लढाऊपणाची झूल पाघरली ही झूल नाचवत नाचवत कम्युनिस्ट, आदोलनाच्या मैदानात उतरले होते. काँग्रेस नेतृत्वाचा पदर धरून वावरणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाने गेल्या तीन–चार वर्षांत कामगाराच्या हितावर निखारे ठेवण्याचे काम केले होते. कामगाराचे बोनस रोखले त्यावेळी कम्युनिस्ट, काँग्रेस नेत्याच्या पुढच्या पट्टीचा आवाज चढवून त्याचे समर्थन करत होते लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर काँग्रेसच्या गाडीखालून चालणाऱ्या उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांनी टीकेची झोड उठवली. काँग्रेसचे धोरण चुकले, असे कार्यकर्ते बोलत असून नवी भूमिका घ्यावी असा त्याचा आग्रह आहे आपल्याविरुद्ध उठलेले मोहोळ परतवून लावण्याकरता कम्युनिस्ट नेत्यानी आपल्या हातात असलेल्या संघटनामध्ये सप घडवून आणण्याचा आदेश दिला आहे. सप घडवून आणण्याचे धोरण कम्युनिस्ट पक्षाने ठरवले असले तरी त्या पक्षाने काँग्रेसची संगत सोडली आहे, असेही म्हणता येणार नाही. काँग्रेसही केंद्र सरकारला अडचणीत

मलपृष्ठ ४ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ ते भयावह तीस तास ! !

नऊ राज्याच्या विधानसभाचे बरखास्ती प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने २९ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता निकाली काढले. केंद्र शासनाला आता घेतलेल्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करणे सहज शक्य होते. दुपारी दोन वाजता न्यायालयाने मार्ग मोकळा केल्याबरोबर गृहखात्यामध्ये त्वरेने हालचाल सुरू झाली. गृहमंत्री चरणसिंग यानी फोनवरून पतप्रधानाशी बोलणे केले. त्याच्या सल्ल्याने सायंकाळी पाच वाजता मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली. नऊ राज्याच्या विधानसभा बरखास्त करण्याबाबत जो वटहुकूम काढण्यात येणार होता, त्याचा तर्जुमा गृहमंत्र्यानी नजरेखालून घातला, आणि राष्ट्रपतीकडे सहीसाठी पाठवायचे कागदपत्र तातडीने तयार करण्याचा हुकूम आपल्या खात्यातील अधिकाऱ्याना दिला. सायकाळी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हेच कागदपत्र अवलोकनार्थ ठेवण्यात आले. कोणतीही चर्चा न होता मंत्रिमंडळाने—वटहुकूम राष्ट्रपतीकडे पाठविण्यास मंजुरी दिली. कागदपत्र तातडीने राष्ट्रपतीकडे रवाना झाले. त्याचे चिटणीस श्री. के. भालचद्रन् यानी ठीक सहा वाजता वटहुकूम राष्ट्रपतीसमोर सहीसाठी ठेवला. राष्ट्रपतीनी नजर फिरवली आणि आपल्या चिटणिसाकरवी गृहखात्याच्या माणसाला निरोप दिला, कागदपत्र पाहिले, सही करण्यापूर्वी विचारासाठी अवधी पाहिजे या एका निरोपाने प्रचंड रामायण घडले एक अभूतपूर्व असे राजकीय नाट्य आपोआप निर्माण झाले. सही करण्यापूर्वी वेळ मागून घेण्याच्या राष्ट्रपतीच्या निर्णयाने केवळ दिल्लीच नव्हे तर सारे राष्ट्र हादरले.

परिस्थिती गोंधळाची असतानाच सहा वाजून तीस मिनिटानी 'समाचार' वृत्तसंस्थेने नऊ राज्याच्या विधानसभा विसर्जित झाल्याचे वृत्त प्रसृत केले. लगोलग दहा मिनिटामध्ये-वृत्त रद्द समजावे अशी दुरुस्तीही आली. सात वाजून गेले तरी राष्ट्रपतीची वटहुकुमावर सही होईना, तेव्हा मात्र मंत्रिमंडळ हादरले. अनेक अफवा उठू लागल्या पराभूत काँग्रेस पक्षामधील काही नेते राष्ट्रपतीच्या मागे दडून ओंगळ राजकारण खेळत आहेत, असाही अनेकांचा समज झाला. माजी कायदामंत्री हरिभाऊ गोखले याची आणि राष्ट्रपतीची जी भेट झाली, त्यावेळी बऱ्याच गोष्टीचा खल झाला. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या लोकशाहीवादी काँग्रेसला जनता पक्षापासून वेगळे काढण्यासाठी दूत रवाना झाले. राष्ट्रपतीच्या चिरंजिवांचे लग्नही भलत्याच वेळी निघाले. कारण हे सारे प्रकरण धुमसत असतानाच त्याना लग्नाची आमंत्रणे देत हिंडावे लागले. मोरारजीभाई, राजनारायण, जॉर्ज, इंदिराबाई, हरिभाऊ गोखले, यशवंतराव चव्हाण, या सगळ्यांकडे राष्ट्रपती याच कारणासाठी गेले होते, – निदान राष्ट्रपतिभवनातून तसे अधिकृतरीत्या सांगितले गेले. तप्त राजकीय वातावरणामध्ये ज्याच्याकडे राष्ट्रपतीनी जाणे उचित नव्हते, अशा मंडळीकडेही राष्ट्रपतीना जावे लागले. संशयाला आणि खऱ्याखोट्या बातम्याना भरपूर जागा त्याच्या या भेटीगाठीमुळे निर्माण झाली. त्यातही नऊ राज्याच्या विधानसभाचे विसर्जन करण्यास हंगामी राष्ट्रपती अनुकूल नाहीत, अशी जनता पक्षामधील अनेकाची धारणा असल्याने, घरच्या कार्यासाठी त्यानी काँग्रेस नेत्याकडे घातलेल्या या फेऱ्या त्याना चागल्याच महाग पडल्या. एका काँग्रेस नेत्याजवळ राष्ट्रपती असेही म्हटल्याचे समजले की, मी म्हणजे काही रबर स्टॅंप किंवा सह्या करणारे यंत्र नव्हे. प्रत्यक्ष मोरारजीशी बोलण्याची वेळ आली तेव्हा ते काहीशा नम्रपणे म्हणाले, या प्रकरणी माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीला अनुसरून मी निर्णय घेईन. २९ एप्रिलच्या सध्याकाळी वटहुकुमाबाबतचे कागदपत्र बाजूला ठेवल्यावर राष्ट्रपतीनी आपल्या एका स्नेह्याला फोन केला आणि सागितले, माझी पूर्ण खात्री पटल्याखेरीज मी सही करणार नाही. गृहमंत्री चरणसिंग याच्यापर्यंत हे फोन प्रकरण पोचले आणि त्याना शिजत असलेल्या राजकारणाचा वास आला. त्यानी तातडीने पतप्रधानांशी संपर्क साधला. राष्ट्रपतीनी सही करण्यास नकार देणे म्हणजे लोकशाही पद्धतीने सत्ताग्रहण करणाऱ्या जनता सरकारच्या अस्तित्वासच आव्हान देण्यासारखे आहे. याबाबत दोघाचेही एकमत झाले त्यातच जगजीवनराम आणि बी. डी. जत्ती याची भेट झाल्याचे वृत्त पसरले. भेट घेण्यास नाराज असलेल्या बाबूजीना बोलावून घेऊन मोरारजीनी दम भरला. इंदिराबाईंनी बाबूजीबद्दलची माहिती असणारी जी फाइल आपल्याजवळ दिली आहे, त्यातील माहितीचा आपण गौप्यस्फोट करू, असेही पतप्रधानानी बाबूजीना सुनावले. बाबूजीनी एकदम नरमाईचे धोरण स्वीकारले. त्याच सायकाळी रामलीलेवर झालेल्या सभेत बाबूजीनी लोकशाहीवादी काँग्रेस जनता पक्षामध्ये विलीन होत असल्याची घोषणा केली. या घोषणेचा सगळ्यात विपरित परिणाम झाला लोकशाहीवादी काँग्रेसचे सरचिटणीस हेमवतीनदन बहुगुणा याच्यावर. त्यावेळेपर्यंत दिल्लीमधील उत्तर प्रदेश निवासामध्ये राहणाऱ्या बहुगुणांसमोर या विलीनीकरणाबाबत उत्तर प्रदेशामधील कार्यकर्त्यांना काय उत्तर द्यावे, हा खरा प्रश्न होता.

### तप्त वातावरणाचे पडसाद

राष्ट्रपतीच्या घरी वटहुकुमाबाबतचे कागदपत्र २९ एप्रिल रोजी सायंकाळीच पोचले होते. परंतु ३० तारखेची सकाळ उजाडली तरी सही झालेली नव्हती, तीस एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता मंत्रि-

मंडळाची तातडीची बैठक बोलावण्यात आली. दरम्यान राष्ट्रपतींनी सही करण्याचे नाकारले तर काय करता येईल, याबाबत कायदेशीर सल्ला घेण्यात आला होता. मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला मानण्या-खेरीज राष्ट्रपती काहीही करू शकत नाहीत, असे कायदामंत्रालयाचे मत होते. ४२ व्या घटनादुरुस्तीपूर्वीच ही परिस्थिती होती. याबाबत कोणताही संदेह राहू न देण्याचे काम बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने केले होते असे असूनही राष्ट्रपती सही करत नव्हते. यावर तोड काय ? गृहमंत्र्यांनी व कायदामंत्र्यांनी राष्ट्रपतींची पुन: एकदा भेट घ्यावी, असे ठरले.

गृहमंत्री चरणसिंग आणि कायदामंत्री शांतिभूषण ठीक ११ वाजता राष्ट्रपतिभवनामध्ये येऊन दाखल झाले. वातावरण गंभी-रच होते राष्ट्रपतींनी सांगितले की, घटनेचे रक्षण करण्यास मी बांधलेला आहे. आपण माझ्यावर अवाजवी दडपण आणू नये. आपल्या म्हणण्याप्रमाणे मी लगोलग सही करू शकत नाही, असे सांगून राष्ट्रपती म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचे संपूर्ण निकालपत्र हाती आल्यानंतरच मी सही करीन हे चक्क वेळकाढूपणाचे धोरण होते. राष्ट्रपती काहीही ऐकून घेण्याच्या मन:स्थितीमध्ये नाहीत, हे लक्षात आल्यावर जास्त हुज्जत घालत न बसता दोघेही मंत्री परत आले.

या सर्व प्रकारामागे काँग्रेसचा निदान काही वरिष्ठ काँग्रेस नेत्याचा हात असला पाहिजे, हे सूचित करणारे एक 'प्रपोजल' तीस तारखेला दुपारी बारा वाजता जनता पक्षापुढे आले काँग्रेसतर्फे असे सुचवण्यात आले की, उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांमधील निवडणुका १९७४ सालीच झालेल्या आहेत. तेव्हा ही दोन राज्ये बरखास्ती वटहुकुमाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आली तर राष्ट्रपति-पदाच्या निवडणुकीमध्ये राज्यसभेमधील काँग्रेस सदस्य जनता पक्षाच्या उमेदवारास पाठिंबा देतील आणि ही दोन राज्ये वगळून इतर राज्यांबाबत जो वटहुकूम निघेल, त्यावर विद्यमान हंगामी राष्ट्रपती सही करतील, यासाठी काँग्रेस पक्ष प्रयत्न करील पराभूत पक्षाकडून आलेला हा तहनामा जनता पक्षाला मंजूर होणेच शक्य नव्हते. शिवाय असली तडजोड सुचवण्याची आणि ती स्वीकारली जाण्याची वेळही केव्हाच निघून गेली होती. स्वाभाविकपणे जनता पक्षातर्फे या तडजोडीला साफ नकार देण्यात आला.

राष्ट्रपती अजूनही आडमुठेपणाचेच धोरण स्वीकारत आहेत, हे लक्षात आल्यावर वातावरण तापत चालले. त्यातच निरनिराळ्या राजकीय पक्षांची जनता पक्षामध्ये विलीनीकरण होण्याबाबत बोलावलेली अधिवेशने चालू होती. नेत्यांनी या व्यासपीठाचा उपयोग केला. अनुयायी संतप्त झाले. दुपारी १ वाजता सुमारे आठशे निद-र्शकांचा एक मोर्चा राष्ट्रपतींच्या निवासस्थानाकडे घोषणा देत निघाला. न्यायालयाचा निर्णय माना, जनतेचा सन्मान करा, सही करा अथवा राजीनामा द्या, यासारख्या घोषणा चालू होत्या. राष्ट्र-पती ज्या कर्नाटक राज्यातले, तेथील निदर्शकांचा एक जथा चक्क राष्ट्रपतिभवनाच्या दारातच जाऊन बसला. पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला. प्रक्षुब्ध जमावाला आवरणे पोलिसांनाही कठीण होऊन बसले: दुपारी तीन वाजता गृहमंत्र्यांनी राष्ट्रपतींना फोन करून परिस्थिती चिघळत चालली असल्याचे सांगितले आणि संर-क्षणाची हमी देणे कठीण असल्याचेही सूचित केले. एक शब्दही न बोलता राष्ट्रपतींनी फोन खाली ठेवला दुपारी चार वाजता मौलाना आझाद रोडवरील पोलीस बंदोबस्तामध्ये दुपटीने वाढ करण्यात आली निदर्शकांची संख्या वाढत होती घोषणांचे प्रमाण चढे होते. देश स्वतंत्र झाल्यापासून राष्ट्रपतिभवनासमोर कधी निदर्शने झाली नव्हती. हंगामी राष्ट्रपतींनी ही वेळ आणली. आता हा राजकीय पेच सोडवायचा कसा ? या प्रश्नावरून उडालेला प्रक्षोभ रस्त्या-वरील वातावरणातून सूचित होत असला तरी त्यामुळे प्रश्न सुटणे कठीण होते. राजकीय पेचप्रसंगाला त्याच पातळीवर उत्तर मिळणे आवश्यक होते. म्हणजेच कोंडी फोडण्याची जबाबदारी पुन्हा मंत्रि-मंडळावरच येऊन पडली.

## मोरारजीभाईंचा राजीनाम्याचा पर्याय

या गुंतागुंतीच्या राजकीय प्रश्नावर तोड काढण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची तातडीची बैठक तीस तारखेला सायंकाळी ५ वाजता बोलावण्यात आली. मंत्रिमंडळाच्या वतीने एक पत्र तयार करण्यात आले. त्यामध्ये घटनेमधील ४२ व्या दुरुस्तीप्रमाणे राष्ट्र-पतींची काय कर्तव्ये आहेत, ते नमूद करण्यात आले आणि मंत्रि-मंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. असे सांगतात की, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर झालेला भाग एवढाच. मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर चरणसिंग व मोरारजी यांच्यामध्ये चर्चा झाली आणि राष्ट्रपती जर दडपणाचे राजकारण खेळत असतील, तर त्याला तसेच उत्तर दिले पाहिजे; याबाबत दोघांचे एकमत झाले. तथापि उत्तराचा अंतिम मसुदा स्वत: पंतप्रधानांनी तयार केला ठीक सहा चाळीस वाजता पंत-प्रधानांचे पत्र राष्ट्रपतिभवनामध्ये पोचले. वर सांगितलेला राष्ट्र-पतींच्या कर्तव्याबाबतचा मजकूर तर त्यामध्ये होताच, पण शेवटच्या चार ओळी तर घाम फोडणाऱ्या होत्या. पत्राचा समारोप करताना पंतप्रधानांनी लिहिले होते की, रात्री आठ वाजेपर्यंत राष्ट्रपतींनी वटहुकुमावर सही केली नाही तर नाइलाजाने आकाशवाणीवर जाऊन मला माझ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा द्यावा लागेल आणि केवळ पाच आठवड्यांच्या कालावधीमध्ये देशाला पुन्हा निवडणुकांना तोंड द्यावे लागेल.

राष्ट्रपती जत्ती यांनी पत्र पुन्हा एकदा वाचले. पत्रावर पंत-प्रधानांची सही होती आणि पंतप्रधान मोरारजी देसाई यांना राष्ट्र-पती त्यांच्या सगळ्या स्वभाववैशिष्ट्यांसह चांगलेच ओळखत होते. आता सही-प्रकरण आणखी ताणणे शक्यच नव्हते. राष्ट्रपतींनी वट-हुकुमाचे कागदपत्र मागवले. पुन्हा एकदा धावपळ उडाली. कागद-पत्र लगोलग राष्ट्रपतींच्या सुपूर्द करण्यात आले. आपल्या कचेरीमध्ये राष्ट्रपती एकटेच होते. त्यांनी क्षणभर विचार केला आणि महाराष्ट्रा-मध्ये सातारा येथे तातडीने संपर्क साधला. फोनवर संबंधित माणसाशी पाच मिनिटे बोलणे केले. संबंधित माणूस अर्थात भारताचे माजी परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण. तीस एप्रिल रोजी सायंकाळी ७॥ वाजता राष्ट्रपतींनी वटहुकुमावर सही केली. लेखणीच्या एका फटकाऱ्याने नऊ राज्यांच्या विधानसभा विसर्जित झाल्या. समाचारने वृत्त दिले, आकाशवाणीवरील बातमीपत्रातही तशी घोषणा झाली

आणि २९ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता सुरू झालेले हे नाटक तीस एप्रिलला रात्री आठ वाजता संपले. नाटकाची नांदी आणि भरतवाक्यही राष्ट्रपतींनी म्हटले, आणि उदासवाणे राष्ट्रपतिभवन वगळता इतरत्र साऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. राष्ट्रपतिपदाची उबदार खुर्ची चटके बसण्याइतकी तप्त होऊ शकते, याचा अनुभव प्रथमच येत होता. राष्ट्रपतींच्या घरच्या कार्याचा सार्वजनिक पचनामा आजवर कधी झाला नव्हता. पण हंगामी राष्ट्रपती बस्साप्पा जत्ती यांच्या चिरंजिवाचे लग्न आणि त्यानिमित्त त्यांनी घेतलेल्या राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी चर्चेचा विषय झाला. सत्ताग्रहण गेल्यापासून केवळ चारच सप्ताहामध्ये जनता सरकारला अभूतपूर्व अशा घटनात्मक पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागले आणि डावावर प्रतिडाव करण्यात जनता पक्षाचे नेते यशस्वी झाल्याने पडद्याआड खेळले गेलेले हे गंभीर नाटक वेळीच सुखान्तिक होऊन संपले. ◻

---

## ◻ जयप्रकाशजी : थोडी कौटुंबिक माहिती

जयप्रकाशजींबद्दल आज देशामध्ये सगळीकडे आदराची भावना आहे. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याबद्दल देश कृतज्ञ आहे पण फार थोड्या मंडळींना जयप्रकाशजींच्या कुटुंबियांबद्दल, तसेच त्यांच्या आजाराबद्दल आणि त्यावर होत असलेल्या खर्चाबद्दल फार थोडी माहिती आहे. १९७७ चा महात्मा अशा शब्दामध्ये जयप्रकाशजींचा गौरव करून 'संडे' या साप्ताहिकाने त्यांच्याबद्दल जो अंक अलीकडेच प्रसिद्ध केला होता, त्यामध्ये ही माहिती आहे. जयप्रकाशजींचे आजोबा देवकीनंदन लाल हे पोलीस सबइन्स्पेक्टर होते या कुटुंबाकडे जी थोडी फार मालमत्ता जमा झाली, ती सारी जयप्रकाशजींच्या या आजोबांनी स्वकष्टाने संपादित केली पुढे त्यांचे एकुलते एक चिरंजीव म्हणजेच जयप्रकाशजींचे वडील या संपत्तीचे मालक झाले जयप्रकाशजींचे वडील हरसू दयाल यांनी मालमत्तेमध्ये थोडी फार वाढ केली. हरसू दयाल यांच्या निधनानंतर त्यांची संपत्ती जयप्रकाश आणि त्यांचे बंधू यांच्यामध्ये वाटली गेली. या वाटणीप्रमाणे जयप्रकाशजींच्या वाट्याला पन्नास एकर जमीन आली. या जमिनीपैकी पंधरा एकर जमीन जयप्रकाशजींनी पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी देऊन टाकली. आणखी १८ एकर जमीन विनोबांना भूदान चळवळीचे वेळी देऊन टाकली. आता १७ एकर जमीन त्यांच्या ताब्यात आहे. त्यापैकी १२ एकर जमिनीमध्ये जे रब्बी पीक निघते, त्यांच्या पाटणा येथे असलेल्या निवासस्थानाचा खर्च मात्र उत्पन्नातून चालतो. गावाकडे त्यांचे घर आहे. त्याला लागून ३ एकर जमीन आहे बिहारमधील चाप्रा जिल्ह्यातील सीताबिद्रा या गावी ११ ऑक्टोबर १९०२ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांना एक भाऊ आणि दोन बहिणी आहेत. अनेक खाजगी कंपन्यांमधून कामे केलेले त्यांचे बंधू राजेश्वर प्रसाद सेवानिवृत्त होऊन मुंबईमध्ये स्थायिक झालेले आहेत. मोठ्या बहिणीचे निधन झाले असून तिच्या पतीचेही निधन झाले आहे. त्यांची तीन मुले असून त्यापैकी दोघे बिर्ला उद्योगसमूहामध्ये काम करतात. आणि एक भारत कोकिंग कोल कंपनीमध्ये नोकरी करतो जयप्रकाशजींची दुसरी बहीण विधवा असून तिची दोन्ही मुले खाजगी कंपनीमध्ये नोकरी करतात.

त्यांच्या दोन मेव्हण्यांपैकी (बायकोचे भाऊ) विश्वनाथ प्रसाद युनायटेड कमर्शिअल बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आहेत. दुसरे शिवनाथन प्रसाद कलकत्त्याला बिर्ला उद्योगसमूहात नोकरी करतात भारताचे पहिले राष्ट्रपती कै. राजेंद्रप्रसाद यांचे चिरंजीव मृत्युंजय प्रसाद हे जयप्रकाशजींचे साडू. मृत्युंजय बाबू राजकारणामध्ये असून, जनता पक्षाच्या तिकिटावर बिहारमधील सिवान मतदारसंघातून निवडून आले आहेत

जयप्रकाशजींचे पाटण्यातील निवासस्थान १९५२ साली बांधण्यात आले. त्यांच्या पत्नी कै. प्रभावतीदेवी यांनी महिला चरखा समिती नावाची संस्था स्थापन केली होती. महिलांना तेथे सूतकताईचे शिक्षण दिले जात असे. बाबू राजेंद्रप्रसाद या संस्थेचे अध्यक्ष होते त्यांच्या निधनानंतर जयप्रकाशजी हेच त्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. जयप्रकाशजींना स्वतःचे मूलबाळ नाही. त्यांच्या राहत्या जागेच्या भाड्यावर ते सध्या २०० रुपये खर्च करतात.

२१ नोव्हेंबर ७५ रोजी जयप्रकाशजी जसलोक रुग्णालयामध्ये दाखल झाले. तेव्हापासून त्यांच्या तेथील निवासाचा, औषधपाण्याचा सर्व खर्च त्याच रुग्णालयाने केला आहे. जनमानसामधील त्यांचे स्थान लक्षात घेऊन रुग्णालय हा खर्च करते पैशाच्या हिशोबामध्ये बोलायचे झाले तर, याच औषधोपचारासाठी अन्य रुग्णाला महिना सहा हजार रुपये खर्च करावा लागेल. डायलेसिसच्या उपचारासाठी जो डायलिसर खरेदी करण्यात आला आहे त्याची किंमत एक लक्ष रुपये असून, जनतेने दिलेल्या वर्गणीतून आणीबाणीच्या काळात तो खरेदी करण्यात आला. याच यंत्रासाठी पंतप्रधानाच्या निधीमधून त्या वेळच्या पंतप्रधानांनी दिलेली देणगी जयप्रकाशजींनी नाकारली होती. या यंत्राच्या आधारे करण्यात येत असलेल्या डायलेसिसचा मासिक खर्च पंधराशे रुपये आहे. अलीकडेच औषधोपचार व अत्यावश्यक शस्त्रक्रिया यासाठी त्यांनी जी विदेशयात्रा केली, त्याचा खर्च भारत सरकारने केला आहे. ◻

---

## ◻ रुकसाना : नसबंदीची राणी

आणीबाणी-पर्व पूर्ण तेजाने तळपत असताना ती अचानक धूमकेतूप्रमाणे अवतरली. संजयच्या आशीर्वादाने तिने नसबंदीची मोहीम हाती घेतली आणि या देशामध्ये आता निवडणुका होणारच नाहीत असे गृहीत धरून युद्धपातळीवर तिने नसबंदी मोहीम हाताळली. तिचे कार्यक्षेत्र होते अव्वल मुस्लीम वस्तीचा भाग. नाना प्रकारची लालूच दाखवून, धाकधपटशा दाखवून तिने आपले काम चालू ठेवले. आणि नसबंदी मोहिमेबाबत विक्रमी आकडेवारी प्रस्था-

पित केली. नसबंदीबाबत तिला बहाल केलेल्या मुलुखामध्ये तिने १३ हजार शस्त्रक्रिया करवून घेतल्या. काही वेळेला कामाचा वेग असा जबर असे की, दिवसाला दोनदोनशे शस्त्रक्रिया उरकल्या जात. विचारलेल्या प्रश्नांना या बाईंनी मोठी नामी उत्तरे दिली आहेत.

प्रश्न : बदललेल्या परिस्थितीचा तुम्हाला काही त्रास होतो का ?

रुकसाना : होतोही आणि नाहीही.. माझ्याबद्दल वेडेवाकडे बोलले जाते त्याचा त्रास होतो. पण मी काही राजकीय कार्यकर्ती नाही. त्यामुळे मला शासनाकडून काही त्रास होईल असे वाटत नाही. संजय गांधी यांच्या पाच कलमी कार्यक्रमावर पूर्ण विश्वास असल्यानेच मी नसबंदी मोहिमेमध्ये सहभागी झाले आणि सामाजिक कार्य समजून मी काम केले.

प्रश्न · तुम्ही अचानक प्रसिद्धीच्या झोतामध्ये आलात त्याचे कारण काय ?

उत्तर मी अचानक आले असे तुम्हाला वाटते. कोणीतरी मला रस्त्यावरून उचलले आणि प्रकाशझोतामध्ये आणून ठेवले अशातला भाग नाही. माझा जवाहिरांचा व्यवसाय होता गरिबांसाठी आपण काही करावे असे मला सतत वाटत होते. माझ्या समाजसेवेच्या कल्पना आणि संजयचे विचार याचे सूत जमले आणि मी झपाट्याने कामाला लागले. मला प्रसिद्धी मिळाली ती माझ्या कामाच्या गतीमुळे.

प्रश्न : संजयची आणि तुमची पहिली गाठ केव्हा पडली ?

उत्तर : मी स्वतः होऊन त्याची भेट घेतली आणि स्वतःचा परिचय करून दिला. समाजकार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याने मला गरीब मुसलमानाच्या वस्तीमध्ये काम करण्यास सांगितले आणि मी तेच केले.

प्रश्न . संजयबद्दल आज तुमचे मत काय आहे ?

उत्तर . निष्ठा बदलणारांपैकी मी नव्हे. काम करणारांना प्रेरणा देणारा त्याच्यासारखा नेता मिळणार नाही. आजही मी त्याच्याशी एकनिष्ठ आहे. (चारही बाजूनी बॉंबगोळ्याचा वर्षाव होत असताना बिचाऱ्या संजयला गारवा देणारा हा एवढाच दिलासा )

प्रश्न तुमच्याबद्दल जे विविध आरोप केले जातात त्याबाबत तुमची काय प्रतिक्रिया आहे ?

उत्तर : राजकीय व्यासपीठाचा मी कधी उपयोग केला नाही. परंतु राजकारण्यांनी केलेल्या गलिच्छ टीकाटिपणीने मला संत्रस्त करून सोडले. सिकंदर बख्त याच्याकडून एक लक्ष सोळा हजार मतानी पराभूत झालेल्या सुभद्रा जोशी मला वेश्या म्हणतात, स्मगलर म्हणतात. बोलायला तोंड दिले आहे. काहीही बोलण्याचे स्वातंत्र्य आता आहे, तेव्हा बोलून घेऊ द्यात.

प्रश्न . युवक कॉंग्रेसनेत्या अंबिका सोनी यांनीही तुमच्यावर टीका केली आहे.

उत्तर : केली आहे ना, पण ज्यावेळेला ही बाई हे करा आणि ते करा असे सांगत फिरत होती, त्यावेळी मी प्रत्यक्ष काम करत होते. दिवसाचे आठ आठ तास !

प्रश्न : दिल्लीच्या एका जवाहिऱ्याने तुमच्याविरुद्ध फसवणुकीचा दावा दाखल केला असून अठ्ठावीस हजार दोनशे पासष्ट रुपयांची मागणी केली आहे, त्याबाबत तुमची प्रतिक्रिया काय ?

उत्तर : मी काय प्रतिक्रिया व्यक्त करणार ? न्यायालय काय ते ठरवेल ! मनुष्य म्हणून म्हणाल तर हा अहंमद अत्यंत कोत्या मनाचा आहे. आणि पैशाच्या व्यवहाराचा सारा तपशील काढला तर तोच माझे नऊ हजार रुपयांचे देणे लागतो.

## विलक्षण बदनाम बाई

ही बाई आपल्या पराक्रमाच्या कथा कितीही रंगवून सांगत असली तरी दिल्लीमध्ये ही बाई विलक्षण बदनाम झालेली आहे. ज्या मुसलमान वस्तीमध्ये काम केल्याचे दावे ती करते, त्या मुसलमान वस्तीमध्ये जर ती आज गेली तर तिला लोक दगडाविटानी मारतील इतकी तिची त्या भागात नाचक्की आहे चलतीच्या काळातही व्यक्तिगत स्वार्थापलीकडे तिची नजर जाऊ शकली नाही. एखादा मंत्र जपत असल्याप्रमाणे संजयच्या नावाची जपमाळ ओढायची आणि वाटेल ते अन्याय करायचे असे या बाईंचे तंत्र होते. एका सभ्य कुटुंबामधील असल्याचा दावा करणारी ही बाई. गुंडांच्या आणि दारूड्याच्या संगतीमध्ये रमत असे. या गुंडानी आणीबाणीच्या काळामध्ये प्रचंड लूट करून रोजची रात्र दारूच्या पार्टीने साजरी केली. एकतीस वर्षांची ही घटस्फोटिता आज स्वतःच्याच घरात बंदिस्त आहे. जे समाजकार्य केल्याचा ती दावा करते ते समाजकार्य नव्हतेच. तो साराच प्रकार जुलूमजबरदस्तीचा. त्या काळामध्ये लोक नमले ते शक्तीपुढे. दहशतीपुढे, आणि तरीही या बाईंचा दावा आपण मुसलमान समाजाचे कल्याण केले असा आहे. प्रचंड दडपशाहीच्या काळातही आता मात्र फार झाले अशी भावना जेव्हा झाली त्यावेळी जामा मशिद विभागामध्ये मोर्चा आयोजित केल्याचे झेड्. अहमद नावाचा ३७ वर्षांचा कापडव्यापारी आज सांगतो, या मोर्चामध्ये सामील झालेल्या मंडळींना बेदम मारण्यात आले. वातावरण आपल्या विरुद्ध जात आहे हे लक्षात आल्यावर रुकसानाने जास्त आक्रमक धोरण स्वीकारले. तिच्याच आदेशाप्रमाणे तुर्कमन गेट विभागामधील गरीब लोकांच्या झोपड्यांवर नांगर फिरले. तिचा पाठिंबा असलेले गुंड घराघरामध्ये शिरत असत आणि घर खाली करा– किंवा नसबंदी करून घ्या असा पर्याय ठेवत असत. या बाईंचे संजयजवळ वजन एवढे की पोलीसखातेही तिला बिचकून असे. ऋषी प्रकाश त्यागी आणि वेदप्रकाश कोहली या पोलीसखात्यामधील अधिकाऱ्यानी तिची मनोभावे सेवा केली.

जामा मशिद विभागामध्येच कॉंग्रेसच्या नेत्या सुभद्रा जोशी म्हणतात, 'ही बाई या विभागामध्ये पोचली कशी याबद्दल काहीही माहिती नाही. तथापि ती स्वतःला संजय गांधी याची खाजगी चिटणीस म्हणवून घेत असे. अत्यंत अधुनिक राहाणीस चटावलेल्या या नखरेल मुलीने या पूर्वी गोरगरिबांच्या विभागामध्ये कधीच काम केले नव्हते. तरीही सभा घ्यायच्या, पैसे गोळा करायचे आणि नसबंदी मोहिमेची शिबिरे भरवण्याचे उद्योग तिने जरूर केले. सर्वसाधारण नागरिकांना सामान्य परिस्थितीमध्ये पोलीस संरक्षण नसते. पण ही बाई पोलीस संरक्षणाशिवाय कधी हलली नाही. कुटुंब– नियोजन आणि नसबंदी या विषयामधील नाजूकपणा, लोकांच्या धार्मिक भावना, याची तिने कधी कदरच केली नाही कमालीचा निष्ठुरपणा हेच तिच्या कामाचे वैशिष्ट्य होते. माझी तिची कधी प्रत्यक्ष गाठ पडली नाही. पण मला काहीं लोकांनी असे सांगितले की, ती घदेवाईक बाई आहे.' बदललेल्या परिस्थितीबाबत रुकसानाची प्रतिक्रिया आहे– हर कुत्तेका दिन रहता है ! असेल बाई, तसेही असेल, पण तुझे दिवस संपले हे मात्र नक्की. □

# विधानसभा निवडणुका

## उमेदवार निवडीचा घोळ

वा. दा. रानडे

विधानसभा निवडणुकांना १० जूनला सुरुवात होत आहे. पहिल्या दिवशीच ओरिसा आणि हिमाचलप्रदेशची निवडणूक पूर्ण होत आहे. त्याशिवाय मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि बिहार येथील मतदानाची पहिली फेरी त्या दिवशी आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जवळजवळ दोन महिन्यानी या निवडणुका होत आहेत. त्यात लोकसभा निवडणुकाचीच पुनरावृत्ती होणार की जनता काही निराळा कौल देईल? पश्चिम बंगाल व तामिळनाडूशिवाय इतर ठिकाणच्या निवडणुका आम्ही जिंकू, असा विश्वास जनता पक्षाचे सरचिटणीस मधू लिमये यानी व्यक्त केला आहे. पण विजय मिळाला तरी लोकसभा निवडणुकीतील विजयाइतका तो मोठा नसेल, हे जनता पक्षाचे काही नेतेही मान्य करीत आहेत.

गेल्या दोन महिन्यात केंद्रातील जनता सरकारच्या कारभाराचा जो अनुभव आला, त्याचाही विचार आपला कौल देताना जनता केल्याशिवाय राहणार नाही. देशात एक निराळे वातावरण निर्माण करण्याचा जनता सरकारचा प्रयत्न आहे. आणीबाणीच्या काळ्या कालखडातील भीती व दहशत संपून देशात पुनः निर्भय, मोकळे वातावरण निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी दिलेली काही आश्वासने जनता पक्षाने पुरी केली आहेत, वृत्तपत्रस्वातंत्र्यावरील सर्व निर्बंध उठले. आक्षेपार्ह मजकुरासंबंधीचा कायदा रद्द झाला. पार्लमेंटमधील चर्चेच्या प्रसिद्धीबाबत वृत्तपत्राचे संरक्षण काढून घेणारा कायदाही रद्द झाला. 'समाचार'च्या पुनर्घटनेसाठी समिती नेमण्यात आली. स्वातंत्र्याच्या तीस वर्षांत प्रथमच प्रमुख राजकीय पक्षाना रेडिओ-टेलिव्हिजनवर निवडणूक प्रचाराची संधी मिळाली आणीबाणीतील अतिरेकांची चौकशी, मारुती मोटार प्रकरण, नगरवाला प्रकरण, बन्सीलाल यानी केलेला सत्तेचा गैरवापर याच्या चौकशीसाठी कमिशने नेमण्यात आली. सरकारी पैशाची उधळपट्टी कमी झाली निवडणूक दौऱ्यासाठी हवाईदलाचे विमान वापरावयाचे नाही, सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस बदोबस्तावरचा खर्च अगदी कमीतकमी करावयाचा, असे पायंडे पंतप्रधान मोरारजी देसाईंनी पाडले व सर्वच मंत्री त्याचे अनुकरण करीत आहेत. या चागल्या गोष्टी असल्या तरी जनतेच्या दृष्टीने भाववाढ हा सर्वांत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. ती आटोक्यात ठेवण्याच्या बाबतीत मात्र जनता सरकार परिणामकारक उपाय योजू शकलेले नाही पण या बाबतीत जनता सरकारला आणखी सधी देण्याची जनतेची तयारी आहे. मात्र हा प्रश्न सोडविण्यासाठी निर्धारपूर्वक उपाय योजलेले दिसले पाहिजेत, एवढी तिची अपेक्षा जरूर आहे.

गेल्या दोन महिन्यात आणीबाणीतील अत्याचाराची, दहशतीची, स्वार्थी कारवायाची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत त्यामुळे इंदिरा राजवटीची प्रतिमा अधिकच डागाळली आहे आणि कॉंग्रेस जनमतातून अधिकच उतरली आहे पराभवाची प्रामाणिक चिकित्सा करण्याचे कॉंग्रेसच्या नेत्यानी टाळले. आणीबाणीचे ते अजूनही समर्थन करीत आहेत. फक्त अतिरेक टाळायला हवे होते, एवढीच त्याच्या दृष्टीने इंदिरा सरकारची चूक. त्याबद्दलही इंदिरा गाधीना दोष देण्याची त्याची तयारी नाही. पक्षावर इंदिरा-गांधीची पकड कायम आहे. कॉंग्रेस सुधारण्याची काहीच चिन्हे दिसत नसताना जनतेचा कल कॉंग्रेसकडे कसा झुकेल?

लोकसभा निवडणुकीतील अभूतपूर्व विजयानंतर जनता पक्षाकडे विधानसभा निवडणुकीच्या तिकिटासाठी एवढी झुबड उडाली की उमेदवार निवडीचे काम अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत चालू होते. निवडीत अनेकावर अन्याय झाले, अर्ज मागे घेण्याच्या सूचना सर्वांना वेळेवर मिळाल्या नाहीत, त्यामुळे काही ठिकाणी तिकीट नाकारलेले उमेदवार जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध अपक्ष म्हणून उभे आहेत. या बडखोरीचा परिणाम निवडणूक निकालावर फारसा होणार नाही, असे जनता पक्षाचे नेते म्हणत असले तरी काही ठिकाणी ही बडखोरी जाणवल्याशिवाय राहणार नाही. बडखोराना पक्षात पुन घेतले जाणार नाही, असे अध्यक्ष चद्रशेखर यानी जाहीर केले. ते पक्षशिस्तीच्या दृष्टीने योग्यच आहे पण तत्त्व आणि शिस्त यात सघर्ष निर्माण होतो तेव्हा अधिक महत्त्व तत्त्वालाच द्यायला हवे. अर्थात प्रश्न खरोखरच तत्त्वाचा हवा तत्वाच्या बुरख्याआड दडलेला स्वार्थ त्यामागे नाही, हेही पाहायला हवे.

जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव करून बडखोर उमेदवार विजयी झाला तर, जनता पक्षाची निवड चुकली, असे निर्णयकपणे म्हणता येईल का? हा उमेदवार कोणाच्या पाठिंब्याने विजयी झाला, हेही पाहावे लागेल. जनता पक्षाच्या विरोधकाच्या मतानी तो निवडून आला असेल तर, तो त्याच्या तात्त्विक भूमिकेचा विजय म्हणता येणार नाही ओरिसात श्रीमती नदिनी सत्पथी टेकतळ मतदारसघातून जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून उभ्या असून त्याच्याविरुद्ध सर्वोदय कार्यकर्त्या श्रीमती मालती चौधरी अपक्ष म्हणून उभ्या आहेत. त्याचे पती सर्वोदयनेते श्री नवकृष्ण चौधरी यानी श्रीमती नंदिनी सत्पथी याच्या निवडीस विरोध केला होता. पण जनता पक्षाच्या नेत्यानी तो मानला नाही. त्याच्या निषेधार्थ त्यानी आपल्या पत्नीस श्रीमती सत्पथीविरुद्ध उभे केले. या मतदारसघातील कॉंग्रेस उमेदवाराने माघार घेतली असून, श्रीमती चौधरीना पाठिंबा दर्शविला आहे श्रीमती सत्पथीना पाडणे हे कॉंग्रेसचे मुख्य उद्दिष्ट त्यासाठी तिरगी लढत टाळून श्रीमती चौधरीना कॉंग्रेसने पाठिंबा दिला आहे. अशा परिस्थितीत श्रीमती चौधरी निवडून आल्या तर त्याचे यश कॉंग्रेसच्या पाठिंब्यामुळे डागाळलेले असेल. पण कॉंग्रेसने पाठिंबा द्यायचेच ठरविल्यावर त्या तो कसा नाकारू शकतात? आपला कॉंग्रेसला पूर्ण विरोध असून जनता पक्षाच्या धोरणानाच पाठिंबा आहे. फक्त जनता पक्षाची निवड चुकली हे

दर्शविण्यासाठीच मी त्याच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभी आहे. निवडून आल्यानंतरही आपली हीच भूमिका राहील. शिस्तभंगाबद्दलची शिक्षा भोगायला मी तयार आहे, पण जनता पक्षालाच माझा पाठिंबा राहील अशी आपली भूमिका त्यांनी स्पष्टपणे जाहीर केली पाहिजे बंडखोरीचा विचार करताना अशी तात्त्विक बंडखोरी आणि संधिसाधू बंडखोरी यांचा वेगळ्या पातळीवर विचार करायला हवा

नंदिनी सत्पथींची निवड योग्य होती का? याचा विचार आणखी एका दृष्टिकोनातून करायला हवा. आमचा पक्ष अंतर्गत लोकशाही कार्यपद्धतीचा पुरस्कर्ता आहे, असे जनता पक्षाचे नेते म्हणतात नंदिनीच्या निवडीत ही पद्धती अनुसरली गेली का? नंदिनीबाईंना राज्यनिवड समितीवर घेण्यास पक्षाच्या बहुसंख्य सभासदांचा विरोध होता असे राज्यशाखेचे अध्यक्ष बिजू पटनाईक यांनीच सांगितले आहे त्यांना तिकीट देण्यासही बहुसंख्य सभासदांचा विरोध होता. असे असता या दोन्ही गोष्टी केंद्रीय नेतृत्वाने राज्यनेतृत्वावर लादल्या यात अंतर्गत लोकशाही कार्यपद्धती पाळली गेली का? या बाबतीत एक युक्तिवाद असा केला जातो की, लोकशाहीवादी कॉंग्रेस जनता पक्षात विलीन झाल्यानंतर तिला उमेदवार निवडीत योग्य प्रतिनिधित्व मिळायलाच हवे तेव्हा त्या पक्षाच्या एक प्रमुख नेत्या म्हणून राज्यनिवडसमितीवर श्रीमती नंदिनी सत्पथींना नेमण्याचा व त्यांना तिकीट देण्याचा केंद्रीय नेतृत्वाचा निर्णय योग्यच होता या युक्तिवादाबाबत असे म्हणता येईल की, लोकशाहीवादी कॉंग्रेसला योग्य प्रतिनिधित्व हवे हे मान्य, पण विशिष्ट व्यक्तीच उमेदवार हवी, याबाबतचा अंतिम निर्णय घेताना राज्यशाखेची खात्री पटवून तिच्या संमतीने बदल करायला हवा. राज्यशाखेस परिस्थितीची अधिक जवळून माहिती असते तेव्हा तितकेच समर्थनीय कारण असल्याशिवाय तिचे निर्णय डावलण्यात येऊ नयेत आणीबाणीतील धरपकडीचे समर्थन करणाऱ्या नंदिनी सत्पथींना तिकीट कोणत्या कसोटीवर दिले जाते? हा निर्णय घेताना तत्त्वनिष्ठ भूमिका सुटून राजकीय सोयीची भूमिका घेतली गेली. श्री. जयप्रकाश नारायण यांनीसुद्धा नंदिनी सत्पथींना पाठिंबा न देता मालती चौधरींना दिला आहे, हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. जनता पक्षाचे सरचिटणीस रवी रे आणि ओरिसा शाखेचे अध्यक्ष बिजू पटनाईक यांनी नंदिनीबाईंच्या प्रचारासाठी आपण टेंकतळला जाणार नाही, असे जाहीर केले आहे ज्याचा प्रचार करायला प्रमुख कार्यकर्ते तयार नाहीत, असा उमेदवार निवडला कशाला?

ओरिसामध्ये नंदिनी सत्पथींची ही निवडणूक देशाचे लक्ष वेधून घेणार आहे. या राज्यात मुख्य सामना जनता पक्ष विरुद्ध कॉंग्रेस यांच्यात असला तरी अनेक ठिकाणी जनता पक्षाचे बंडखोर उमेदवार उभे असल्याने बहुरंगी लढती होणार आहेत. एकूण १४७ जागांसाठी ६४० म्हणजे एका जागेसाठी चार ते पाच उमेदवार उभे आहेत. जनता पक्ष १४६, कॉंग्रेस १४६, कम्युनिस्ट २३, मार्क्सवादी ४, उत्कल जनता १०, कलिंगसेना ११, झारखंड ११, समाजवादी ऐक्य केंद्र ६ अशी पक्षवार विभागणी आहे. जनता पक्षास बहुमत मिळाले तरी बहुरंगी लढतीमुळे लोकसभा निवडणुकाएवढे यश मिळणे कठीण आहे

बिहारमध्येही जनता पक्ष उमेदवार निवडीबद्दल असंतोष आहे जयप्रकाशांच्या आंदोलनास विरोध करणाराचा व काही गुन्हेगाराचा समावेश जनतायादीत असल्याचा आरोप जनता पक्षाच्या कार्यकारिणीचे सभासद श्री. रामानंद तिवारी यांनी केला. राज्य निवड समितीने तयार केलेल्या यादीत दोन–तीन व्यक्तींनी समितीचा सल्ला न घेताच बदल केले. सर्व मार्गदर्शक सूचना व तत्त्वे बाजूला ठेवून रातोरात ४० ते ५० नावे बदलली. राज्यनिवड समितीने एकमताने फेटाळलेल्या काही नावांचा तसेच एक मेनंतर जनता पक्षास मिळालेल्या काही कॉंग्रेस सभासदांचा समावेश यादीत केल्याबद्दल तिवारींनी टीका केली.

जनता पक्षाच्या कार्यकारिणीचे दुसरे एक सभासद श्री. कर्पुरी ठाकूर यांनीही बिहार-यादीबद्दल नापसती व्यक्त केली ते म्हणाले, 'उमेदवार निवडताना राष्ट्रीय कार्यकारिणीने ठरविलेली कसोटी अनेक ठिकाणी बाजूला सारण्यात आली. निराळ्या गटांना योग्य व समतोल प्रतिनिधित्व नाकारण्यात आले. छात्र संघर्ष समितीच्या युवकात यादीबद्दल असमाधान आहे. उमेदवार निवडीतील विलंबामुळे बारा उमेदवार अर्जच भरू शकले नाहीत. उमेदवार निवडीच्या निषेधार्थ बिहार छात्र संघर्ष समितीचे एक नेते श्री अरुणकुमार वर्मा यांनी निवड समितीचा राजीनामा दिला व पाटणा पश्चिम मतदार संघात जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार श्री. ठाकूर प्रसाद यांच्याविरुद्ध ते अध्यक्ष म्हणून उभे राहत आहेत. बिहार प्रदेश जनता पक्षाचे अध्यक्ष श्री सत्येंद्र नारायण सिन्हा यांनी आपल्याच जातभाईंना तिकिटे दिल्याचा आरोप केला आहे.

बिहारच्या यादीत माजी कॉंग्रेस मुख्यमंत्री हरिहरसिंग यांचा समावेश जनता पक्षाने कसा केला, याबद्दलही आश्चर्य व्यक्त केले जात आहे कारण अनेक वेळा पक्ष बदलणारा संधिसाधू नेता म्हणून ते विख्यात आहेत त्यांना खरोखर पक्षात प्रवेशच द्यायला नको होता.

उमेदवार निवडीबद्दल याप्रमाणे जनता पक्षातच असंतोष असल्याने पक्षाला लोकसभा निवडणुकीएवढे यश मिळविणे कठीण जाणार आहे पक्षाने मार्क्सवाद्यांशी केलेली समझोत्याची बोलणी फिसटकली जनता पक्ष सर्व ३२४ जागा लढवीत असून कॉंग्रेस २७५, कम्युनिस्ट ७५ व मार्क्सवादी १९ हे इतर पक्षांचे उमेदवार आहेत

उत्तर प्रदेशची परिस्थिती बिहारसारखीच आहे तेथेही बहुरंगी लढती आहेत. एकूण ४२५ जागांसाठी २९९४ म्हणजे एका जागेस सरासरी सात उमेदवार उभे आहेत जनता पक्ष ४२२, कॉंग्रेस ३९५, कम्युनिस्ट २८, मार्क्सवादी ३५, अपक्ष २११४ अशी उमेदवारांची विभागणी आहे जनता उमेदवार निवडीबद्दल बिहारप्रमाणेच उत्तर प्रदेशातही असंतोष आहे. उत्तर प्रदेशसाठी चरणसिंगांना निरीक्षक नेमले होते. आपण केलेली निवड अंतिम मानली जाईल, अशी त्यांची समजूत होती पण अध्यक्षांनी ८८ नावे चरणसिंगांचा सल्ला न घेता बदलली, अशी तक्रार चरणसिंगांच्या विसर्जित भालोद गटाचे दोन आमदार सत्यप्रकाश मालवीय

पृष्ठ २७ वर

# चक्रम्चक्री ( १५ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# तरंगणारे बेट

आपल्या पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी विभागात पूर्वी नागराजन् होते ना, त्यांनी २३ मे च्या टाईम्समध्ये जोरदार लेख लिहिलाय्.

अस ? काय म्हणतात नागराजन्साहेब ?

नागराजनच म्हणण अस की, इंग्रजी, इकॉनॉमिक्स, संस्कृत अशासारख्या विषयाच्या पदव्युत्तर शिक्षणाची सोय विद्यापीठाच्या विभागातून आहे, त्याचप्रमाणे निरनिराळ्या कॉलेजातूनही आहे. या कॉलेजांतून हे विषय अगदी डफ्फड शिकवले जातात. इतकेच नाही तर, या कॉलेजवाल्यांच्या दडपणामुळे विद्यापीठातील आणि काही चागल्या कॉलेजातील शिक्षणाचा दर्जाही घसरत चाललाय्. कोणतीही दर्जा उचावणारी गोष्ट करायची म्हटली की, ती निकृष्टातील निकृष्ट कॉलेजला परवडेल की नाही ते पाहावं लागत. त्यामुळे झालय् काय की, कोणत्याही प्रकारचे विद्यार्थी येतात, त्याना भरमसाठ मार्क्स दिले जातात. शिक्षण सुधारत नाही.

मग काय कराव अस सुचवलंय् प्रोफेसरमजकुरांनी ?

त्यानी सांगितलंय् की, युनिव्हर्सिटीतील पदव्युत्तर शिक्षण विभागाला या कॉलेजसच्या जोखडातून मोकळ करावं. या विभागाना स्वत:चे अभ्यासक्रम ठरवू द्यावेत, स्वतःच्या परीक्षा घेऊ द्याव्यात, आर्थिक स्वातंत्र्य असावं.

थोडक्यात म्हणजे युनिव्हर्सिटीच्या विभागाने दिलेली एम. ए. डिग्री निराळी आणि वरकड कॉलेजांतून मिळालेली डिग्री निराळी, असं म्हणा की, युनिव्हर्सिटी विभागान दिलेली डिग्री अर्थातच वरच्या दर्जाची समजली जाणार. हे छान आहे. खेड्यापाड्यातल्या मुलांना खोट्या पदवीची अफू आणि पुण्यासारख्या शहरातील निवडक मुलाना नागराजन्च्या प्रयोगशाळेतलं बालामृत !

पण मग त्याला काय करणार ? नागराजन्नी स्पष्ट म्हटलंय् की, सध्या विद्यापीठातले वर्ग म्हणजे कुंभमेळे झालेले आहेत. अशा वर्गांतून उत्तम शिक्षण देता येण अशक्य आहे नवीन, वरच्या दर्जाचे अभ्यासक्रम शिकवायचे म्हणजे वर्ग लहान हवेत, मुल निवडक हवीत, वैयक्तिक लक्ष पाहिजे शिक्षकांचं. हे करायचं म्हणजे चाळणी लावावी लागणारच. ही चाळणी जर शास्त्रशुद्ध असेल तर, केवळ शहरी मुलंच निवडली जातील अस का म्हणता ? निरनिराळ्या आय्. आय्. टीज. मधून किंवा मेडिकल इन्स्टिट्यूटस्मधून नाही का परीक्षा घेऊन विद्यार्थी निवडले जात ?

## चाळणीतला पक्षपात

शिक्षणक्षेत्रातली कोणतीही चाळणी मुळातच शहरी पांढरपेशांना पक्षपात करणारी असते. जितक्या जास्त चाळण्या लावाल तितकी खेड्यातील किंवा शहरातीलही श्रमजीवी मुले अधिकाधिक वगळली जातील खड्यासारखी. मला तर कधी कधी असा सशय येतो की, निरनिराळ्या प्रवेशपरीक्षाच्या चाळण्याच्या चळती ज्या रचल्या जातायत त्याचा हेतूच ग्रामीण भागातली आणि खालच्या वर्गातली मुलं वगळली जावीत हा असावा !

हे तुमचं काहीतरीच. अहो, तज्ज्ञानी विचाराती ठरवलेल्या कसोट्यानुसार निवड होत असते. त्यालाही तुम्ही पक्षपात म्हणू लागला ?

कोणी जाणूनबुजून पक्षपात करतय् असं मी म्हणत नाही. पण विद्यार्थी निवडण्याच्या कसोट्या विद्यार्थ्याचा शिक्षणात प्रगती करण्याचा वकूब मोजण्यासाठी असतात. हा वकूब केवळ जन्मजात बुद्धिमत्तेवर ठरत नाही. घरच वातावरण, आई-बापांचं उत्तेजन, दैनंदिन जीवनात येणारे अनुभव, भाषा वापरण्याचं आणि संकल्पनाचा विचार करण्याचं कसब या सगळ्याचा परिपाक म्हणजे विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती. आता मा सगळ्या गोष्टी शहरातील पाढरपेशाच्या मुलाना जितक्या अनुकूल असतात तितक्या खेड्यातील किंवा श्रमजीवीच्या मुलाना कुठून अनुकूल होणार ? बर्नस्टीन नावाच्या शैक्षणिक-समाजशास्त्राच्या अभ्यासकानं तर याची एक थिअरीच बसवली आहे.

काय म्हणतो हा बर्नस्टीन ?

बर्नस्टीनचं म्हणण अस की, शिक्षणात किंवा व्यवसायात पुढं यायचं असेल तर, भाषेचे कसब असावं लागतं. हे कसब अर्थातच व्यक्तीच्या अंगी जन्मजात असणार नाही, तर ज्या परिवारात ती व्यक्ती वाढते, त्या परिवाराकडून व्यक्तीला ते मिळणार. आता मोलमजुरीवर जगणाऱ्या कुटुबात भाषेचा वापर तो काय असतो ? त्याची वाक्यं लहान, विशेषणं, क्रियाविशेषण, अव्ययं याचा वापर बेताचा; कल्पनाही ढोबळ आणि बटबटीत. याउलट पाढरपेशा मध्यमवर्गीयाच्या घरात भाषेचा उपयोग कितीतरी प्रकारानी होत असतो. निरनिराळ्या कल्पना व्यक्त करणारी, तार्किक कसरती उलगडून दाखवणारी, व्यक्ती आणि वस्तू याच्यातील सबधाच विश्लेषण करणारी भाषा मुलाच्या कानी सतत पडत असते. शब्दातील सूक्ष्म फरक, वाक्यातील शब्दाची जागा बदलण्याने फिरणारा अर्थ, आवाजाच्या चढ-उतारातून व्यक्त होणारी भावनाची आदोलने याची जाण सुशिक्षिताच्या मुलाला आपसूकच होत असते. त्यामुळे शाळेत येतानाच मध्यमवर्गीय मुलापेक्षा श्रमजीवी कुटुबातील मुलगा अनेक दृष्टीनी पगू होतो. शिक्षणाच्या शिडीच्या पायऱ्या ही दोन प्रकारची मुल जसजशी चढू लागतात तसतसा पंगूपणा वाढतच जातो आणि आपण तर या शिड्या आणखी-आणखीच लाबवीत चाललो आहोत.

## लांबत जाणारी शिडी

ही लाबत जाणाऱ्या शिडीची काय कल्पना आहे ?

आज श्रमजीवी वर्ग आणि पैसा, प्रतिष्ठा व पुढारीपणा ज्याच्या ठिकाणी एकवटला आहे असा शहरी मध्यमवर्ग...

हा हा, हे बरोबर नाही. अहो, शहरी मध्यमवर्गाकडे कुठे आहे पैसा आणि पुढारीपण ? बागाईतदार शेतकरी आणि

शहरी-उद्योगपती तुमच्या लक्षात राहिलेले दिसत नाहीत.

बागाईतदार शेतकरी नि उद्योगपती शहरी मध्यमवर्गीयांपेक्षा श्रीमंत आहेत हे खरं, पण मी मध्यमवर्गीयांना पैसेवाले म्हणतो ते सापेक्षतः ! दुसरे म्हणजे, पुढारीपण केवळ राजकीयच असतं असं नाही. शहरी पांढरपेशांकडे पुढारीपण राजकीय अर्थाने नाही. पण वागणुकीचा आदर्श म्हणून पांढरपेशांच्या वर्तनाकडेच पाहिलं जातं की नाही !

बरं, पुढे.

तर या दोन वर्गांना जोडणारी एकमेव शिडी म्हणजे शिक्षण. आता शिक्षण घेतलेल्या प्रत्येकाला पैसा, प्रतिष्ठा आणि प्रामुख्य मिळेलच असं नाही; पण निदान मिळण्याची शक्यता तरी आहे. त्यामुळे तर शिक्षणाची सोय सगळीकडे हवी; प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कॉलेज हवं; प्रत्येक खेड्याला शाळा हवी; प्रत्येक जिल्ह्याला युनिव्हर्सिटी हवी; प्रत्येक राज्याला आय्. आय्. टी. हवी, ही हाकाटी ! पण आपण पांढरपेशे मंडळी वरताद. शिक्षणाच्या सोयी वाढत चालल्या, शिडीच्या खालच्या पायऱ्या प्रत्येकाच्या– निदान बऱ्याच जणांच्या आवाक्यात येत चालल्या, तसतसे आपण शिडीला वरून नव्या पायऱ्या ठोकू लागलो. इतकेच नव्हे तर, मधून मधून खोटया आणि फसव्या पायऱ्याही लावू लागलो.

ते कसं काय ?

इंजिनीयरिंगचा अभ्यासक्रमच घ्या. अगदी खालची पायरी म्हणजे आय्. टी. आय्. चा सर्टिफिकेट कोर्स; नंतर टेक्निकल विषय घेऊन एस्. एस्. सी. ( किंवा क्रम उलटाही असेल ! ); मग सरकारी पदविका अभ्यासक्रम; इकडे बारावी किंवा इंटर सायन्स झाल्यावर विद्यापीठाची पहिली पदवी, दुसरी पदवी आणि संशोधन पदवी; तसेच आय्. आय्. टी. तील एम्. टेक्. किंवा एम्. एससी. या पदव्या; एवढ्याने भागत नाही, म्हणून कित्येकजण परदेशी जातात अगर व्यवस्थापनाच्या पदव्या किंवा गणकयंत्राचे ज्ञान मिळवू लागतात. पाहा बरं, केवढी लांब आणि पायऱ्यांवर पायऱ्या लावलेली शिडी झाली आहे ती. खेरीज, निरनिराळ्या कारखान्यांचे उमेदवारी अभ्यासक्रम आणि ए. एम्. आय्. ई. सारख्या धंदेवाईक पदव्या आहेत.

खोटया आणि फसव्या पायऱ्या कोणत्या ?

आपले नागराजन् जोडायला निघालेत तसल्या ! आता असं पाहा, विद्यापीठाचा इंग्रजी विभाग स्वायत्त झाला की ग्रामीण महाविद्यालयांतील इंग्रजी विषयातील पदवी कवडीमोल ठरणार की नाही ? आता ती पदवी कोण घेतात ? तर शाळामास्तर, मुख्यतः एम्. ए. साठी नाव घालतात, कारण त्यांना कॉलेज-शिक्षक व्हायचे असते. ग्रामीण महाविद्यालयांतून इंग्रजीच्या एम्. ए. झालेल्या माणसाला शहरी कॉलेजेस काही नोकरी देणार नाहीत. हां, आता तो ज्या कॉलेजातून एम्. ए. होईल ते कॉलेज त्याला कदाचित नेमील. पण तिथेही एक अडचण आहेच.

ती कोणती ?

सरकारने असे ठरवले आहे की, यापुढे प्रत्येक कॉलेज शिक्षक एम्. फिल्. असला पाहिज. ( म्हणजे वाढवली एक पायरी. ) हे एम्. फिल्. कोठे व्हायचे ? धरा पुनः नागराजन्सारख्यांचे पाय. बरं, आता नागराजन् आणि त्यांचे सगेसोयरे एम्. फिल. च्या प्रवेशाच्या वेळी पुनः चाळणी लावणार. त्यात गळणार कोण, तर आमचे मशारनिल्हे कॉलेज-शिक्षकाचे उमेदवार शाळामास्तर ! म्हणजे त्यांची ग्रामीण इंग्रजीची एम्. ए. पदवी ठरली की नाही फसवी ? लहान मुलांच्या मासिकांतून भूलभुलैयाचा खेळ असतो ना, कुठून तरी निघून विशिष्ट ठिकाणी पोचविणारी रेघ काढण्याचा, तशी आपल्या शिक्षणाची अवस्था झालेली आहे. त्यात खोटया वाटा आहेत, फसवी वळणं आहेत, झुकांड्या देणाऱ्या सापट्या आहेत, आपण पुनः पहिल्याच ठिकाणी परतलो असं वाटायला लावणारी पुनरावृत्त स्थानं आहेत. सगळं चक्रावून टाकणारं आहे.

## तरंगणारं बेट

तुम्ही नकली पदव्यांना खोटया पायऱ्या म्हणता ते ठीक आहे. पण अधिकाधिक उच्च पदव्या प्रत्येक क्षेत्रात अस्तित्वात येत आहेत, त्यावरचा तुमचा राग अनाठायी आहे. आपली अर्थव्यवस्था जसजशी विकास पावत आहे, उत्पादनाची साधने जास्त गुंतागुंतीची होत आहेत, त्या प्रमाणात निरनिराळी कसबं अंगी असणारी, उच्च तंत्रज्ञान अवगत झालेली माणसं आपल्याला लागणार. त्यामुळे नवनव्या पदव्या घेतलेले तरुण समाजात वावरणार. याला काही मतलबी बुद्धीने शिड्या लांबवल्या जाणं हे नाव देण्यात फक्त कुत्सित बुद्धी दिसते.

पण अशी काय आपली भरभराट होऊन राहिलेय् ? आपल्या आर्थिक विकासाचा सरासरी वेग २.१ ते ३ टक्क्यांहून जास्त नाही. सुशिक्षितांची बेकारी वाढत चालली. धंदे–शिक्षण वाढलं पाहिजे, उच्चविद्याविभूषित तरुण परदेशी जाऊ लागले हे तर आपण ऐकत आहोत. दिसतं ते असं की, जी कामं पूर्वी मॅट्रिकपर्यंत शिकलेले लोक करीत असत, ती आता बी. ए. किंवा बी. कॉम्. झालेली माणसं करतायत. बी. ए. किंवा बी. एस्सी. माणसं चालत तिथे एम्. एस्सी. लोकांची भरती होत आहे; डिप्लोमा होल्डर्सवर काम भागत होतं तिथे बी. ई. लोक मिळत आहेत; कामं तीच आहेत, कामकऱ्यांची



अर्हता मात्र वाढत चालली दोन–चार पायऱ्यांनी.

असंच काही नाही अगदी नवीन तऱ्हांचे उद्योग आपल्याकडे निघाले आहेत. उदाहरणार्थ, इलेक्ट्रॉनिक्सचा धंदा घ्या, मनुष्यनिर्मित धाग्याचा धंदा घ्या, वीज–पोलाद–खाणीचे वाढते उद्योग पाहा. त्याखेरीज संशोधन संस्था पाहा टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रीसर्च, अणुशक्तिमंडळ, उपग्रह प्रेषण संस्थान यासाठी उच्चविद्याविभूषित माणसं लागतात. निरनिराळ्या वैद्यकीय संशोधनसंस्थाही आहेत. तेव्हा उच्च दर्जाच्या पदव्या घेतलेल्या माणसांचा उपयोग आपण करू शकत नाही, असं काही नाही.

तुमच्या म्हणण्यात थोडा मुद्दा आहे, हे खरं. काही अतिशिक्षित माणसं या उद्योगात सामावली जातात. पण या उद्योगाचा आणि सामान्य माणसाचा कुठे सांधाच जुळत नाही. तुम्ही आता ज्या संशोधनसंस्थांची नावं घेतलीत तिथे गेलं की, याचा प्रत्यय येतो. गलिव्हरच्या तरंगत्या बेटावर गेल्यासारखं वाटतं.

गलिव्हरचं तरंगत बेट ही काय भानगड आहे ?

गलिव्हरच्या प्रवासाच्या गोष्टी तुम्ही लहानपणी वाचल्या असतील तो एकदा बोटाएवढ्या माणसाच्या देशात जातो, तर एकदा माडाएवढ्या उंच देशात जातो. या लघुकाय आणि दीर्घकाय लोकांच्या गोष्टी अनेकांना माहीत आहेत. त्याच गलिव्हरची आणखी एक गोष्ट आहे. तो एका देशात जातो. तिथे तरंगणारं बेट होतं. या बेटावर गणितात मश्गुल झालेले लोक राहात असत. त्यांच्या कपड्यांवर त्रिकोणी–चौकोनी गणिती आकृत्या काढलेल्या असत त्यांच्या जेवणातील पदार्थांना सुद्धा गणितातले आकार दिलेले असत ते गणिती विचारात इतके गढलेले असत की, त्यांच्याशी बोलताना त्यांचा कान जागा करावा लागे, नंतर त्यांना उत्तर देता यावं म्हणून तोंड जागं करावं लागे. तुम्ही टाटा इन्स्टिटयूटसारख्या ठिकाणी गेलात तर या गोष्टीची सतत आठवण येत राहाते. इथली माणसं भारतीय भाषात बोलतच नाहीत. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन या भाषातून त्यांचे संभाषण चालते दुपारी जेवणाच्या वेळी अभिजात पाश्चात्य संगीत ते ऐकतात. संपूर्ण सुशीतल इमारतीत ही मंडळी वावरतात आणि आजूबाजूला अत्याधुनिक कला या नावावर मोडणाऱ्या चित्रविचित्र वस्तू ठेवलेल्या असतात. त्यांच्या सौंदर्याचा आस्वाद घेतात. त्यांचे बोलण्याचे विषयही अतिशय उच्चपातळीवरचे असतात, होमोलॉजिकल आल्जिब्रा, 'पिंच इफेक्ट, वैश्विक पोकळीतील प्लाझ्मा इत्यादी. तुमच्या–आमच्यासारख्या बऱ्यापैकी शिकलेल्या लोकांनासुद्धा ही कोणी परग्रहावरची माणसं आल्येत असं वाटायला लागतं, तिथे बिचाऱ्या खेडूत शेतकऱ्यांशी यांचं काय नातं जुळणार ? मग हे लोक परदेशाशी लागेबांधे जुळवतात. दर दोन वर्षांनी एखादं वर्ष तिकडे काढतात आणि आपलं एकटेपण पुसण्याचा प्रयत्न करतात. पण त्या केविलवाण्या प्रयत्नातून ते या देशातले उरले नाहीत हेच अधिक ठसठशीतपणे मांडलं जातं.

तुम्ही म्हणता ते पटलं मला या तज्ज्ञताप्राप्त माणसाचे डोळे परदेशीच लागलेले असतात गेल्या महिन्यात इंडियन मेडिकल कौन्सिलविषयी आलेली बातमी वाचलीत ना ?

काय बर ?

बातमीत म्हटलं होतं की, वैद्यकीय विद्यार्थ्यांचं इंग्रजीचं ज्ञान अधिक चांगलं असावं, यावर इंडियन मेडिकल कौन्सिल भर देणार आहे इथपर्यंत ठीक आहे. पण पुढे कारण देताना असं म्हटलं होतं की, इंग्लंड–अमेरिकेत हे डॉक्टर्स गेले की, इंग्रजीच्या तुटपुंज्या ज्ञानामुळे रुग्णाचे बोलणे त्यांना कळत नाही, म्हणून हिंदी डॉक्टरांच्या पदव्या इंग्लंड–अमेरिकेतील वैद्यकीय संस्थांनी अमान्य ठरविल्या आहेत. त्यामुळे इंडियन मेडिकल कौन्सिलने हा निर्णय घेतला आहे ! काय आहे की नाही उफराटं टाळकं या कौन्सिलवाल्यांचं ?

## इलाज

हे आपल्याला विचित्र वाटतं, पण कौन्सिलच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर ते साहजिक आहे तुम्ही कधी वावडी उडवली आहे का ? वावडीला 'वरचं वारं लागणं' म्हणून प्रकार असतो म्हणजे विशिष्ट उंचीच्या वर वावडी गेली की, ती वरच जाऊ लागते तिला खाली आणणंच अवघड होऊन बसतं आपल्याकडच्या उच्चपदवीधरांचं तसंच झालंय त्यांना आपल्या देशातल्या खातेऱ्यात उतरणं बरं वाटत नाही; मग करणार काय ? वरवरच जाणार

मग याला उपाय काय ?

मी मघाशी म्हणालो ना की, शिडी लांबवावी तितकं श्रमजीवी समाजातली मुलं आणि पांढरपेशातली मुलं यांच्यातलं अंतर वाढत जाणार. तेव्हा हे शिड्या लांबवणं थांबवलं पाहिजे खेड्यातल्या मुलांना काही कल्प्त्या करून झपाट्यानं पुढे खेचता येईल, हे वेडगळपणाच आहे तेव्हा शिक्षणातलं अंतर वाढू द्यायचं नसेल तर पांढरपेशाच्या तथाकथित प्रज्ञावंत मुलांची शैक्षणिक प्रगती रोखून धरली पाहिजे.

पण मग आपला देश या अंतराळयुगात प्रवेश कसा करणार ? चंद्रावर पाऊल कसं टेकणार ? अॅटमबॉम्बचा स्फोट कसा करता येणार ? छे, छे, तुमचा हा विचार अगदीच प्रतिगामी आणि काळाकडे पाठ फिरवणारा आहे.

अहो, अंतराळ युग, अॅटमबॉम्बचा स्फोट आणि चंद्रावरच्या मानवी पाऊलखुणा ही सगळी थोड्याफार स्वार्थी हेतूने गरीब जनतेसमोर वरिष्ठ वर्गीयांनी रंगवलेली स्वप्नं आहेत चंद्रावर कोणी आपल्यातलं पोचलंच तर ती असतील तरंगणाऱ्या बेटावरची माणसं–की जी आपल्यातली नव्हेतच.

तेव्हा ही भडक आणि नेत्रदीपक स्वप्नं आपण सोडून दिली पाहिजेत आणि ज्या अधांतरी बेटावरून हे चंद्रलक्षी रॉकेट उडणार आहे, ते बेटच खेचून जमिनीवर टेकवलं पाहिजे.

□

# हा पश्चिम बंगाल

तारा पंडित

....भर दुपारची वेळ ऊन मी म्हणतंय्. अशा वेळी असेंब्ली हाऊससमोरून बसस्टॉपच्या दिशेने चालत होते. सर्वत्र सामसूम होती. एरवी गजबजाट ऐकणारी ही इमारत स्तब्ध उभी होती. नव्या मंत्रिमंडळाच्या स्वागतासाठी जणू आतुर होऊन बसली होती. समोरच्या प्रांगणातील कारंजं देखील गप्प होतं मनात विचार आला, आणखी थोड्या दिवसातच इथे पुन्हा गजबजाट सुरू होईल. कोणकोणते चेहरे दिसतील बर? कोणत्या पक्षाचे किती लोक निवडून येतात, यावरच सारे अवलंबून असणार आहे. नजीकच्या भविष्यात अधिकाराने इथे प्रवेश करणारी मंडळी आज इतस्तत विखुरली आहेत. असेंब्लीत प्रवेश मिळवण्याच्या हेतूने धडपड करण्यात व्यग्र झाली आहेत.

...बसमध्ये चढल्यावर बस भरधाव निघाली. असेंब्ली हाऊसचे विचार मागे पडले. नवी दृश्ये... नवे विचार...

काही वेळाने अलीपूर जेलसमोरच्या स्टॉपवर बस थांबली. कुतूहलपूर्ण नजरेने पाहिल, काही नक्षलवादी नुकतेच सोडण्यात आले होते. त्यांच्या घरची मंडळी फाटकाशी त्यांच्या स्वागतार्थ उभी होती. त्या तरुणाच्या आजारी चेहऱ्यावर आत्मविश्वासाची छटा दिसली.

.. बस बरीच दूर गेली तरी नक्षलवाद्यांचा विचार मनात तसाच होता. आता त्यांच्यावरची बंधने उठवली असल्याने त्यांना भूमिगत राहण्याचा प्रश्न उरला नाही. त्यांना राजरोस शहरातून वावरता येईल. पण आता ते 'विनाशातून क्रांती'चा विचार सोडून प्रतिष्ठितांप्रमाणे लोकशाहीची तत्त्वे मानणार आहेत. नक्षलवादी हे लोकशाही मार्ग का स्वीकारू इच्छितात असे विचारले असता उत्तर मिळाले की, त्यायोगे त्यांना आपल्या तत्त्वाचा प्रसार करता येईल व पक्षाचे बळही वाढविता येईल. ह्यावेळच्या निवडणुकांमध्येही भाग घेण्याची त्यांची इच्छा आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट नेता श्री. ज्योती बसूदेखील 'नक्षलवाद्यांबरोबर स्पर्धा न करण्याचे उपाय योजीत आहोत,' असे म्हणत होते.

... घरी परतल्यानंतर पल्याच्या वाऱ्याने बरं वाटलं आणि दुपारचं रखरखं ऊन आठवलं, पाठोपाठ असेंब्ली हाऊस... तेथील स्तब्धताही ..

आता विचारांची दिशा किंचित बदलली. रोज बदलणाऱ्या राजकीय घटनांमुळे साधारण लोकांच्या मनातही आंदोलन निर्माण झाले आहे. कोणता पक्ष सत्तास्थानी येणार, याविषयी तर्कवितर्क करण्याचा चाळा नकळत सारेच करीत आहेत – मीसुद्धा.

अलीकडच्या जनता– डावे गट वाटाघाटी फिसकटल्यावर वाटलं, झालं हे चांगलं झालं की वाईट? एकदा वाटलं– हे बरं झालं नाही. काही झालं तरी, जनता पक्ष अगदी नवा आहे. उलट मार्क्सवाद्यांच्या विचारसरणीची पाळेमुळे अगदी खोलवर रुजलेली आहेत त्या दृष्टीने जनता पक्षाला मार्क्सवाद्यांशी केलेली तडजोड राज्यकारभार चालविताना फार फायद्याची ठरली असती. पण मग हेच मार्क्सवादी शिरजोर होऊन बसतील नि धिंगाणा घालतील अशी भीती जनता पक्षाला वाटणे साहजिक आहे याला कारण पूर्वीचे कटू अनुभव विसरू म्हटले तरी विसरणे अशक्य आहे.

एक मार्क्सवादी कम्युनिस्ट नेता श्री. प्रमोद दासगुप्ता यांचे म्हणणे असे की, केंद्र सरकार जनता पक्षाचे असले म्हणून काय *पंचायतीपर्यंत जनता पक्षाचीच सत्ता असावी* असे का आहे? एखाद्या ठिकाणी (प. बंगालसारख्या) डावे गट सत्तेवर आले म्हणून कुठे बिघडलं? त्यामुळे लोकशाही टिकवून धरण्यास मदतच होणार आहे. दासगुप्तांचा विचार अगदीच गैर नाही. पूर्वी जरी अपयश पदरात पडले असले तरी, आता डावे गट व्यवस्थित कारभार करणार नाहीत कशावरून? दुधाने तोंड पोळलं म्हणजे माणूस ताकसुद्धा फुंकून नाही का पीत? पण हे खूप लोकांना पटत नाही ते म्हणतात, अहो, हे मार्क्सवादी म्हणजे संधिसाधू लोक. ते नुसता उतमात करतील. शेवटी मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची पाळी येईल मग आहेच इतिहासाची पुनरावृत्ती... गव्हर्नर्स रूल... पुन्हा मुदतपूर्व निवडणूक... पुन्हा तेच ते! कशाला हवी एवढी यातायात?

आता श्री. ज्योती बसूंनी आपला मतदार संघ बदलावा हीही एक संशयास्पद गोष्टच. त्यांनी आपले बारानगर सोडून सत्रागाचीतून उभे राहायचे का ठरविले? लोक साहजिकच म्हणतात– बारानगर मतदारसंघाकडून अपयश पदरी पडेल अशी भीती वाटते की काय ज्योती बसूंना?

मे महिन्यातील लागोपाठ तीन दिवसांच्या वाटाघाटी प्रयत्न करूनही अयशस्वी झाल्यामुळे प्रमोद दासगुप्ता मात्र फार खट्टू झाले. मग त्यांनी ह्या अपयशाला जनता पक्षच कसा जबाबदार आहे, ते वर्णन करून सांगितले. ते म्हणाले, 'जनता पक्षाला वाटते, आता आपण काँग्रेसच्या जागेत फिट्ट बसलो. पण ही विचारसरणी चूक नाही का? वास्तविक आम्हा मार्क्सवाद्यांच्या दृष्टीने दोन्ही पक्षात फारसा फरक नाही. दोघांनाही आमचा पक्ष नकोसा वाटतो. त्यांच्यात एक फरक जरूर आहे. काँग्रेसने निवडणुकांचे वेळी लुच्चेगिरीचा अवलंब करून आम्हाला नामशेष करण्याचा प्रयत्न केला व जनता पक्ष आमच्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे.'

श्री. दासगुप्ता जनता पक्षाचा आणखीही एक ढोबळ दोष दाखवू इच्छितात त्यांचे म्हणणे राजकीय रंगभूमीवरून काँग्रेस अंतर्धान पावली आहे, *असा जनता पक्षाने गैर*समज करून घेतला आहे अहो, तीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात काँग्रेसने आपले जे प्रस्थ माजवून ठेवले ते काय असे सहजासहजी पुसले जाणार आहे? दासगुप्तांच्या मते निदान पश्चिम बंगालमध्ये तरी लोकशाहीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने संयुक्त प्रयत्न होणे अत्यावश्यक होते. जनता पक्षाने ही संधी गमावली

इकडे हा राजकीय गोंधळ चालू असताना दैनंदिन व्यवहारावरही त्याचा परिणाम झालेला आढळतो. नित्योपयोगी वस्तूंचे भाव तर इतके भरमसाठ वाढले आहेत की, गिऱ्हाइकांना कशी खरेदी करावी तेच कळेनासे झाले आहे आता व्यापारी मंडळी आपले हात धुऊन घेण्याचे सोडतील होय? आणीबाणी संपली नि त्यांची पोळी पिकली. आता तर त्यांनी वस्तूंचे भाव लिहून ठेवणेही बंद करून टाकले आहे अनेक वस्तूंचे कृत्रिम अभाव निर्माण करून त्या जास्त दराने विकणे सुरू केले आहे सर्व नेतेमंडळी निवडणुकीच्या *भानगडीत गुंतली* आहेत, लोकांच्या ओरडण्याकडे लक्ष देण्यास कुणालाच फुरसद नाही. केंद्रस्थानी जनता पक्ष आल्याआल्याच लोकांनी खरे तर भाव उतरतील ही अपेक्षा ठेवली होती. पण ती फोल ठरली. अशा वेळी वाटतं, एखादी बंगाली मृणाल गोरे इथे का निर्माण होऊ नये? पण इथला महिला वर्ग सक्रिय समाजकार्य करण्याच्या बाबतीत अगदीच अनुत्साही आहे

एकूण काय, निवडणुका होईपर्यंत काहीही बोलून उपयोगी नाही. आणि नंतर तरी काय होणार, हे आज काही सांगता येत नाही.

पश्चिम बंगालचे आजमितीचे चित्र हे असे आहे. यावरून तुम्ही काय अंदाज बांधाल? □

महाराष्ट्रात नक्षलवाद्यांची धरपकड चालू होती, त्यावेळीच ही नक्षलवादी चळवळ काय आहे, हे जाणून घेण्याच्या उद्देशाने ' माणूस 'ने ऑगस्ट ७० मध्ये अनिल बर्वे यांना श्रीकाकुलमला पाठवले होते. ' रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता ' या त्यांच्या स्फोटक लेखमालेचे वाचकानी त्यावेळी उत्स्फूर्त स्वागत केले होते. गेल्या महिन्यात २५ मे १९७७ ला नक्षलवादी चळवळीला दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त हा लेख....

# नक्षलबारीचे आंदोलन....त्यातील प्रश्न

डॉ. सुरेश बेरी

नक्षलवादी म्हटले की सर्वसामान्य जनतेच्या छातीत धडकीच भरते. त्यांच्या डोळ्यासमोर हातात बॉम्ब आणि पिस्तुले घेऊन दिसेल त्याला मारत सुटणारा एक रक्तपिपासू दिसतो. खुनी, दरोडेखोर, बलात्कारी वगैरे वगैरे अनेक विशेषणे त्याला लावली जातात. त्यामुळे अशा लोकाना पोलिसांनी खटला वगैरे न भरता गोळ्या घालून ठार मारले तर सर्वसामान्य जनतेला त्याचे फारसे काही वाटत नाही. परतु या नक्षलवादी लोकामध्ये अनेक उच्चशिक्षित, उच्च मध्यमवर्गातील तरुणतरुणी आहेत, क्रातीच्या ध्येयाने भारावून लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या सोडून ग्रामीण भागात जाणारे तरुण आहेत, वगैरे बातम्या वाचून मात्र त्याला आश्चर्याचा धक्काच बसतो. यातले खरे काय, याचा त्याला प्रश्न पडतो.

भाडवलदारी प्रचारमाध्यमे, विशेषतः वर्तमानपत्रे, मासिके कम्युनिस्ट क्रातिकारकाविषयी नेहमी असाच प्रचार करतात, त्याचे असेच काळेकुट्ट चित्र नेहमी रगवून वस्तुस्थितीवर पोलादी पडदा टाकण्यात येतो अशा भडक प्रचाराचा साहजिकच सर्वसामान्यावर झट्दिशी परिणाम होऊन गैरसमज वाढीस लागतात.

परंतु आता परिस्थितीनुरूप या तथाकथित हिंसाचारी नक्षलवाद्याबद्दल बरीच माहिती उपलब्ध झालेली आहे. त्याच्यावर पोलिसानी केलेल्या निर्घृण अत्याचाराच्या कहाण्या आता वर्तमानपत्रे रकाने भरभरून देत आहेत. अत्याचाराची चटक लागलेल्या पोलिसाचा प्रसाद आणीबाणीच्या काळात कांग्रेसविरोधी पक्षानाही खावा लागल्यामुळे या अत्याचाराविरुद्ध मोठ्या प्रमाणात जनमत तयार होत आहे. अजूनही तुरुंगात खितपत असलेल्या सुमारे २०,००० नक्षलवाद्याची सुटका करावी, अशी मागणी जोराने पुढे येत आहे. ही मागणी करणारांमध्ये राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे सरसघचालक श्री. बाळासाहेब देवरस, जनता पक्षाचे खासदार श्री. मधू लिमये, कृष्णकात आदी मान्यवर नेत्याचा समावेश आहे.

यामुळे नक्षलवादी चळवळ ही मुळातून कशी आहे, तिचा उगम कसा झाला, याविषयी माहिती मिळविणे अगत्याचे ठरेल. २५ मे १९७७ या दिवशी या चळवळीला दहा वर्षे झाली. या चळवळीमुळे ज्या समस्याकडे भारतीय जनतेचे लक्ष प्रामुख्याने वेधले, त्या जमिनीच्या प्रश्नाचाही सखोल अभ्यास झाला पाहिजे. उगीच साप साप म्हणून भुई धोपटण्यात अर्थ नाही. कारण भारतातील जमिनीचा प्रश्न काही नक्षलवाद्यानी अगर माओने निर्माण केलेला नाही. उलट जमिनीचा प्रश्न सुटला नाही म्हणून नक्षलवादी चळवळ निर्माण झाली.

नक्षलवादी हा शब्द ' नक्षलबारी ' या नावावरून प्रचलित झाला. प. बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्ह्यामध्ये ' नक्षलबारी ' हा एक तालुका आहे या तालुक्यात संथाळ नावाचे आदिवासी राहतात बहुसख्य संथाळ लोक भूमिहीन शेतमजूर आहेत. जमीनदाराच्या अत्याचाराचे भक्ष्य ते नेहमीच होतात. या शेतमजुराच्या असतोषाला त्या भागात काम करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोंड फोडले जमिनीचे बेकादेशीर हस्तातरही त्या भागात मोठ्या प्रमाणावर झाले होते. जमीनदाराच्या अतिरिक्त जमिनीचे वाटप, मजुरीचे दर, बेकायदेशीर हस्तातर वगैरे प्रश्नावर कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली तेथे त्यापूर्वी बरेच लढे झाले होते.

मार्च, १९६७ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकात इतर अनेक राज्यांप्रमाणे प. बगालमध्येही कांग्रेसचा पराभव झाला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि कांग्रेसमधून फुटून निघालेल्या अजय मुकर्जींची बंगला कांग्रेस या परस्परविरोधी पक्षानी एकत्र येऊन तेथे संयुक्त सरकार स्थापन केले. मार्क्सवाद्याचे श्री. ज्योती बसू गृहमंत्री झाले. ज्योती बसूनी कामगार आणि शेतकऱ्याच्या लढ्यामध्ये पोलीस कारखानदार आणि जमीनदारांच्या बाजूने हस्तक्षेप करणार नाहीत, असे जाहीर केले या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन आपले शेतमजुरांचे आदोलन पुढे रेटायचे असा निर्णय नक्षलबारी तालुक्यातील मार्क्सवादी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी घेतला. या आदोलनात चारू मुजूमदार, जगल सथाळ, कनू सन्याल आदी आघाडीवर होते.

जमीनदाराच्या अतिरिक्त जमिनीचा सथाळ शेतमजुरानी ताबा घेण्यास सुरुवात केली. या अतिरिक्त जमिनीतील उभी पिके कापण्यास त्यानी सुरुवात केली. मजुरीच्या दरात वाढ मिळविण्यासाठी शेतमजुराचे सप सुरू झाले साहजिकच या आदोलनाचे उग्र स्वरूप पाहून जमीनदाराच्या तोंडचे पाणी पळाले. त्यानी आदोलन मोडून काढण्याचा निर्धार केला. त्याच्या प्रतिकारामुळे काही शेतमजूर जखमी झाले. त्यामुळे चिडून जाऊन शेतमजुरानीही शस्त्र उगारले. आणि त्यात एक जमीनदार ठार झाला. त्याबरोबर सगळीकडे या चळवळीविरुद्ध आरडाओरडा सुरू झाला.

कम्युनिस्टानी हिंसाचार सुरू केला. प्रतिसरकार स्थापन केले.

असा प्रचार अनेक वर्तमानपत्रांनी सुरू केला. प. बंगालच्या मंत्रिमंडळातही मोठीच गडबड उडाली. मुख्यमंत्री अजय मुकर्जींच्या बंगला कॉंग्रेसने आंदोलनाला विरोध केला. या बंगला कॉंग्रेसमध्ये बंगालमधील जोतेदारांचा (जमीनदाराचा) भरणा होता. शेवटी आंदोलन दडपून टाकण्यासाठी इंदिरा गांधींच्या केंद्र सरकारने केंद्रीय राखीव पोलीस दल (C. R. P.) पाठवले. या सी. आर पी.ना विरोध करण्यासाठी राज्य सरकारने आपल्या अखत्यारीतील एस्. आर. पी. पाठवावेत अशी मागणी बऱ्याच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प बंगाल सरकारकडे केली. पण अजय मुकर्जी-ज्योती बसू यांनी तिला नकार दिला.

शेवटी केंद्र सरकारच्या पोलिसांनी नक्षलबारीच्या किसानांचे आंदोलन मोडून काढले. आपल्या पक्षाचे नेते राज्य सरकारमध्ये असतानाही आपल्याला त्यांनी मदत केली नाही याचे दुःख नक्षलबारीच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना झाले. या नेतृत्वाविरुद्ध त्यांच्या मनात फार मोठा असंतोष निर्माण झाला. सर्वंकष राजकीय सत्ता कामगार–किसान वर्गाच्या हातात आल्याखेरीज आपला कोणताही लढा यशस्वी होणार नाही, याची त्यांना खात्री पटली. त्यामुळे येथून पुढे केवळ आर्थिक मागण्यांसाठी लढे न लढवता सरळ सरळ राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीच लढा दिला पाहिजे या निष्कर्षाप्रत ते आले. ' राजकीय सत्ता बंदुकीच्या नळीतून वाढते. ' या माओच्या वचनावर त्यांचा सुरुवातीपासून विश्वास होताच. तो त्यांनी प्रत्यक्षात आणण्याचे ठरविले. ' राजकीय सत्तेसाठी सशस्त्र संघर्ष ' हे त्यांचे ब्रीदवाक्य ठरले.

नक्षलबारीच्या किसान-आंदोलनाने उभा बंगाल पेटून उठला. ठिकठिकाणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जहाल कार्यकर्ते आपल्या पक्षनेतृत्वाविरुद्ध बंड करून उठले आणि आपापल्या विभागात नक्षलबारीप्रमाणे किसान-आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न करू लागले. कलकत्त्यातील विद्यार्थ्यांनी तर नक्षलबारीला डोक्यावर घेतले. कॉलेजच्या निवडणुकामध्ये नक्षलबारीला पाठिंबा देणारे कार्यकर्ते बहुसंख्येने निवडून आले. नक्षलबारीचे आंदोलन चिरडले गेले. पण त्याचप्रकारचे आंदोलन देब्रा, गोपीवल्लवपूर, मुशाहारी, २४ परगणा वगैरे ठिकाणी सुरू झाले. दरम्यान इंदिरा गांधींनी बंगला कॉंग्रेस-मार्क्सवाद्यांचे संयुक्त मंत्रिमंडळ बरखास्त केले.

परंतु लवकरच या किसान चळवळीला डावे साहसवादी वळण लागले. ' वर्गशत्रूचा नि:पात करा ' या घोषणेची शब्दशः अंमलबजावणी या चळवळीच्या कार्यकर्त्यांनी सुरू केली. यातूनच काही अत्याचारी जमीनदारांचे खून पडले. त्यांच्या घरावर दरोडे घालून त्यांची संपत्ती जप्त करण्यात आली. त्यांचे धान्य लुटून त्याचे गरीब शेतकऱ्यामध्ये वाटप करण्यात आले. या त्यांच्या कृत्यामुळे पोलीस खात्याचे लक्ष त्यांच्याकडे ताबडतोब गेले. त्यामुळे नक्षलवादी कार्यकर्ते भराभर अटक होऊ लागले.

नक्षलवारी आंदोलनाच्या ज्वाळा लवकरच भारतात अनेक ठिकाणी पसरल्या. बिहार, ओरिसा, पंजाब, उ. प्रदेश, आंध्र, केरळ, महाराष्ट्र या ठिकाणी नक्षलवादी तरुण संघटित होऊ लागले. माओच्या विचाराचा अभ्यास सुरू झाला. क्रांतिकारक घोषणांनी भिंती रंगू लागल्या आणि त्याचबरोबर पोलिसांचे अटकसत्र सुरू झाले.

१९६९ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडलेल्या या सर्व कार्यकर्त्यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला. त्याचे नाव भारतीय कम्युनिस्ट पक्ष ( मार्क्सवादी-लेनिनवादी ). जनता त्यांना नक्षलवादी या नावानेच ओळखते. या पक्षाचा चेअरमन झाला दार्जिलींग जिल्ह्यातील चारू मुजुमदार.

चारूच्या मृत्यूनंतर म्हणजे १९७१ मध्ये पक्षाच्या डाव्या साहसवादी धोरणावर पक्षकार्यकर्त्यांनी टीका करण्यास सुरुवात केली. या धोरणामुळे पक्षाचे खूपच नुकसान झाले होते. पक्षाचे सुमारे ३५,००० कार्यकर्ते (बहुतेक तरुण) तुरुंगात विनाचौकशी खितपत पडले होते. हळूहळू या डाव्या साहसवादी धोरणाचा पक्षाने पूर्णपणे त्याग केला. व्यक्तिगत खून, शिक्षणसंस्थावर हल्ले वगैरे प्रकार १९७२ मध्ये पूर्णपणे थांबले. कार्यकर्ते पुन्हा जनतेला संघटित करण्याच्या कामाला लागले. किसान संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार संघटना यांच्या कामाला ते पुन्हा लागले. आर्थिक मागण्यांवर जनतेला संघटित करून अनेक अवस्थांतून संघर्ष गेल्यानंतर राजकीय संघर्ष देण्यास जनतेला प्रवृत्त करणे, हे त्यांनी आपले उद्दिष्ट ठरवले.

नक्षलबारीच्या लढ्यातून काय काय निष्पन्न झाले याचा शोध आपण घेऊ लागलो तर, असे आढळून येईल की, या देशातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो जमिनीचा आहे, हा निष्कर्ष त्यातून निघाला. ज्यावेळेस जमिनीच्या प्रश्नावर आंदोलने सुरू होतात तेव्हा राजसत्ता दचकून उठते. जेव्हा शेतकरी जागा होऊन डोळे चोळू लागतो तेव्हा राजसत्तेला प्रचंड हादरा बसतो. कामगारांनी कितीही आंदोलने केली तरी सरकारला त्याची फारशी काळजी वाटत नाही. अर्थात एखाद्या देशव्यापी रेल्वे संपाने त्यांची झोप उडते ही गोष्ट वेगळी. त्यामुळेच कामगारचळवळीवर एवढे अत्याचार होत नाहीत जेवढे शेतकरी चळवळीवर होतात. आणीबाणीमध्ये आणि त्यापूर्वीसुद्धा चळवळ करणाऱ्या कित्येक शेतमजुरांना संशयित नक्षलवादी म्हणून कॉंग्रेस सरकारने गोळ्या घालून ठार मारले आहे. वास्तविक हे शेतमजूर फक्त त्यांच्या मजुरीच्या दरात वाढ मागण्यासाठी चळवळ करीत होते.

देशातील जमीनदारीचा प्रश्न फारच भयावह आहे. स्थूलमानाने ८० टक्के जमीन २० टक्के मोठ्या शेतकऱ्यांच्या हातात आहे. तर २० टक्के जमीन ८० टक्के शेतकरी कसत आहेत. शेतकऱ्यांच्या एकंदर लोकसंख्येपैकी ३० टक्के भूमिहीन शेतमजूर आहेत. शेतमजुरांच्या संख्येतील लक्षणीय वाढ गेल्या २० वर्षांतील आहे. याचा अर्थ गरीब शेतकरी कर्जापायी भूमिहीन होत आहेत आणि त्यांच्या जमिनी बडे शेतकरी घेत आहेत. जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतराचे प्रमाण फारच चिंताजनक आहे. यामध्ये बहुतांशी दलितांच्या जमिनी अडकलेल्या आहेत. शेतमजुरांच्या मजुरीचे दर बऱ्याच ठिकाणी फारच कमी आहेत. जेथे ते जास्त आहेत तेथे ते लढ्यानंतरच मिळालेले आहेत. सावकाराच्या पाशात शेतकरी दिवसेंदिवस जास्त गुंतत चालला आहे. २० कलमी कार्यक्रमातल्या कर्जमुक्तीच्या कलमाचा त्याला काहीही फायदा झाला नाही.

याखेरीज जमीनदारांच्या अत्याचाराला त्याला रोजच्या रोज तोंड द्यावे लागते. दलित जातीतल्या शेतकऱ्यांना याशिवाय जातीय

अत्याचारांना तोंड द्यावे लागते ते वेगळेच. या देशात शेतमजूर स्त्री-पुरुषांना जमीनदाराच्या छळाला जे तोंड द्यावे लागते त्याला खरोखरी जगात तोड नाही. एकच उदाहरण देतो. तामिळनाडूमध्ये किलवेनमणी येथे शेतमजुरानी मजुरीच्या दरात वाढ करण्यासाठी म्हणून संप पुकारला. त्यामुळे चिडून जाऊन जमीनदारानी त्याच्यावर बदुका घेऊन चाल केली. त्यामुळे घाबरून जाऊन सर्व शेतमजूर आपापल्या झोपडयात आतून कडया लावून लपून बसले. उन्मत्त जमीनदारानी झोपडयांना आग लावून दिली. चाळीस स्त्री-पुरुष आणि मुले आगीच्या भक्षस्थानी पडले. यानतरची चीड आणणारी गोष्ट अशी की, पोलिसांनी या संदर्भात प्रथम अटक केली ती काही शेतमजुरांना. या प्रकरणाचा वर्तमानपत्रात आणि इतरत्र बराच गाजावाजा झाल्यानंतर सुमारे एक महिन्याने काही जमीनदारांना अटक करण्यात आली कोर्टात खटल्यामध्ये जमीनदार निर्दोष सुटले आणि शेतमजुराना शिक्षा झाल्या. भारतीय न्यायसंस्थेची अशी लक्तरे लोंबवणारा खटला खरा तर भारतात गाजायला हवा होता पण दुर्दैवाने याबाबत या देशातला जागृत (?) वकीलवर्ग, बुद्धिजीवी आणि राजकारणी यापैकी कुणालाच या गभीर घटनेची दखल घ्यावीशी वाटली नाही. हे केवळ एक प्रकरण. अशी शेकडो प्रकरणे राज्याराज्यांतून घडली आहेत आणि घडत आहेत. ग्रामीण भागात गेली तीस वर्षे आणीबाणीच चालू आहे.

जमीनदाराच्या हातात जमिनी फार मोठ्या प्रमाणावर एकवटल्या आहेत ५००० ते १०,००० एकर जमीन मालकीची असणारे जमीनदार या देशात अजूनही आहेत. स्वतःच्या मालकीचे विमानतळ असणारे जमीनदार बिहारमध्ये आहेत. ( खोटे वाटत असेल तर, वाचकानी श्री. अनिल अवचट यानी लिहिलेले 'पूर्णिया' हे पुस्तक वाचावे. ) हे जमीनदार जमीन खंडाने दुसऱ्याला कसायला देत असल्यामुळे त्याना उत्पादनवाढीत रस नसतो. जमिनीतील आलेले उत्पन्न ते चैनीत खर्च करतात आणि पूर्वीच्या सरंजामी इतमामाने राहतात. गावच्या सपूर्ण राजकीय, आर्थिक आणि सामजिक जीवनावर आपले नियंत्रण ठेवतात. शेतीसुधारणाना विरोध करतात. परिणामी ते विकासमार्गातील एक अडसर होऊन बसतात. राष्ट्रीयीकृत बँकेच्या शेतीसुधारणाच्या कामाला अनेक ठिकाणी या अशा लोकानी विरोध केल्याची अनेक उदाहरणे आज महाराष्ट्रातही सापडतात.

जमीनदारी प्रथेमुळे शेतीचे उत्पादन पुरेशा प्रमाणात वाढत नाही. त्यामुळे कारखान्याना कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा होऊ शकत नाही. त्यामुळे कारखाने व्यवस्थित चालू शकत नाहीत. शिवाय भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी हा शेतकरी वर्गातील बहुसंख्य भाग अतिशय गरीब असल्याने कारखान्यात तयार होणारा माल हा वर्ग विकत घेऊ शकत नाही. परिणामी मागणी सतत कमी राहिल्यामुळे कारखान्यातील उत्पादन वाढू शकत नाही म्हणजे जमिनीचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत या देशात कारखानदारीचाही विकास होऊ शकत नाही. बेकारी व टचाई वाढत जाते. त्यामुळे जमिनीचा प्रश्न हा या देशातील प्रमुख प्रश्न आहे आणि जमीनदारी हा देशाच्या विकासातील प्रमुख अडसर आहे, ह्या गोष्टीकडे नक्षलबारीच्या आंदोलनाने देशातील विचारवंताचे आणि राजकारण्याचे लक्ष वेधले; ही या आदोलनाची मोठीच देणगी आहे, असे मानावे लागेल. आदोलन चुकीचे की बरोबर हा घोळ घालत न बसता त्यातून निर्माण होणारे प्रश्न सोडवणे हेच प्रमुख काम मानले गेले पाहिजे.

या प्रश्नाची जाणीव इंदिरा सरकारलाही झाली होती. त्यामुळेच २० कलमी कार्यक्रमात शेतकऱ्याच्या प्रश्नाला प्रमुख स्थान मिळाले होते. कर्जमुक्ती, वेठबिगार रद्द, शेतमजुराच्या किमान वेतनात वाढ, जमीनदाराच्या अतिरिक्त जमिनीचे वाटप, शेतमजुराना झोपड्या बाधून देणे वगैरे कलमे शेतकरी वर्गातील प्रचड असतोष शमविण्यासाठीच होती. यासाठी प्रचाराचा मोठाच गदारोळ उठविण्यात आला. पण अमलबजावणी मात्र शून्य त्यामुळे परिस्थिती आहे तशीच कायम आहे. उलट आणीबाणीत शेतकऱ्याची आंदोलने दडपून टाकण्यासाठी त्या अमानुष दडपशाहीचा वापर करण्यात आला, त्यामुळे या मूळच्या असतोषात अधिकच भर पडली. परिणामी इंदिरा सरकारला सत्तेवरून हटावे लागले

आज जनता पक्षाच्या सरकारपुढेही हेच प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी त्यानी जर काहीच केले नाही तर, जनता पुन्हा राज्यकर्त्यांवर नाराज झाल्याखेरीज राहणार नाही. या शेतकरीवर्गाने आज जनता पक्षाच्या हातात मोठ्या विश्वासाने सत्ता दिली आहे.

चिनी आणि व्हिएटनामी क्रातीमध्ये जमिनीचा प्रश्न आणि परकीय साम्राज्यवादाचे वर्चस्व हेच प्रमुख प्रश्न होते. आपल्याही देशात हेच प्रश्न आपल्याला भेडसावत आहे. जमिनीचा प्रश्न आपण जोपर्यंत सोडवत नाही, तोपर्यंत नक्षलबारीच्या आदोलनासारखे छोटेमोठे उद्रेक या देशात होतच राहणार आणि हिंसाचारही होणार त्यामुळे हा प्रश्न फक्त कायदा आणि सुव्यवस्था याचा नसून, ती एक प्रमुख राजकीय समस्या आहे असे मानून ती सोडवण्याच्या दृष्टीने वाटचाल झाली पाहिजे.

□


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक । हेन्री शॅरीयर
अनुवाद । रवींद्र गुर्जर

किंमत । पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# हमीद दलवाई

## एक आठवण

नीना शहा, मालेगाव

हमीदभाई गेले. हिरव्या मनाला परत एक जबरदस्त धक्का ! हिरव्या डोळ्यानीच दिलेला फारसा संबंध नसतानाही फार जवळचा माणूस जावा तशी वाटणारी हुरहूर का? एखादी व्यक्ती कधी एकेकाळी थोड्याच क्षणात आपल्या मनात खोल ठाण माडून बसते. नि तिचं उच्चाटन ती गेल्यान कधीच होत नाही. उलट ती अधिक रुतून बसते. का ?

मालेगाव तसे हिंदू-मुसलमान दग्याझगड्याकरता प्रसिद्ध म्हणून वाटायचे. खरं तर हमीदभाईंनी इथच मुक्काम ठोकून बसायला हवे ! वाटायचे, कदाचित इथल्या पब्लिकचा लोकानी धसका घातला असावा. पण ही व्यक्ती ती मानणारी नाही. नि लवकरच ते प्रत्ययाला आले.

४-५ वर्षांपूर्वीची गोष्ट. इथल्या कॉलेजमध्ये त्याना वक्ते म्हणून बोलावले होते. खरे तर इथे सारी सतप्त रक्ताची तरुण पोरे भरलेली होती. म्हणून वाटायचे, त्यानी यायलाही हवे नि यायलाही नको. मुसलमानाचे काय किंवा कुठल्याही धर्मवेड्या तरुणाचे तप्त रक्त म्हणजे काय असते ? याची खात्री तेव्हा पटली. नि ती ठाऊक असावी म्हणूनच त्यानी अट्टाहासाने ते निमंत्रण स्वीकारले असावे. तोपर्यंत मीही त्याना प्रत्यक्ष पाहिल नव्हतच, फक्त ऐकले होते. म्हणून उत्सुकता होतीच.

एकदाचे ५ वाजले नि हॉलमध्ये हमीदभाई प्रिन्सिपॉलसमवेत दाखल झाले नि त्याच्या गहिऱ्या हिरव्या डोळ्यानी एकदा सगळ्यांचा कब्जा घेतला. त्यावेळी आमच्या वर्गात १४ मुलींमध्ये १२ मुसलमान होत्या नि हेच प्रपोर्शन मुलामध्येही नि साऱ्याच वर्गात होते. नि म्हणून तिथे आपोआपच मेजॉरिटी ( mejority ) प्रमाणे ग्रुप्स् पडले तरी मुली कमी म्हणून आम्ही साऱ्या मुली एकत्र एका रांगेत बसलो.

तशी आधी प्रिन्सिपॉलनी सूचना दिलीच असावी की भाषण हिंदीत द्यावे ! पण छे ! हमीदभाई कुठले ऐकायला ? अट्टाहासाने मराठीतच बोलायला सुरुवात केली पाचेक मिनिटे सारेजण मुकाट्याने ऐकत होते. (कारण कॉलेजचा रूलच होता-समजले नाही तरी शांत बसायचे ! )

पण बोलण्यात सारखा 'मुसलमान-मुसलमान' शब्द यायला लागला, तशी मुसलमान मुलांची चुळबूळ सुरू झाली नि हिंदू पोराकडे माना वळवून वळवून, काय चाललय, वगैरे सुरू झाले. हे सारे लक्षात येऊनही हमीदभाई आपले पुढेच धावत होते. मागे वळणे त्याना ठाऊकच नव्हते ना !

तोपर्यंत आम्ही आपले मुलींमध्ये दुभाषाचं काम करीत होतो. थोड्याफार मुलामुलींना अर्धवट मराठी समजत होते. त्यानी अर्थाचे अनर्थ करून आपल्या मनात सभाळून ठेवला.

पाऊण-एका तासात भाषण संपले नि हमीदभाई आमच्या रांगेकडे एक हसता दृष्टिक्षेप टाकून बाहेर पडले नि प्रिन्सिपॉलच्या केबिनमध्ये चहापान सुरू झाले असावे तेवढ्या वेळात हॉलला कसले रूप आले होते. तोबा ! सांगवतच नाही.

अर्धवट अनर्थ मनात गोळा करून ठेवलेल्या पोरांनी भराभर गरळ ओकायला सुरुवात केली की, हा माणूस मुसलमान धर्माबद्दल असे बोलला ! तसे बोलला ! तलाक घेऊ नका म्हणतो म्हणजे काय ? एकच शादी करायला काय सांगतो ? साला, मजहबमे ओ लिखा है वो सब झूठ ! ये चला है पैगंबर बनने ! '

'जूतेसे मारना चाहिए ।'

'लडकियोको भडकाना है क्या !' इत्यादी इत्यादी.

नि एकदा रक्त तापायला लागल्यावर काय ? एकात दोन-दोनात चार गोष्टींची भर पडतच होती. नि हिंदू मुले आपल्याला काय करायचय् म्हणून सरळ बाहेर पडत होती. मुली पण भयकर भडकल्या होत्या. आम्ही आपले त्याना अगदी सोप्या भाषेत समजावून देण्याचा प्रयत्न करीत होतो.

'देखो ! अगर आज तुम्हारी शादी हुआी और कल तुम्हारे शोहरने दुसरी लडकीको लाया या तुम्हें तलाक दे दिया तो चलेगा क्या ? '

या आपल ह् ! त्यात काय ? च्या आविर्भावात म्हणाल्या, 'उसमे क्या हुआ ? ये तो हमारे मजहबमे ही लिखा है। पैगंबरनेभी तो ऐसा किया था।'

त्यांच्या अशा सभाषणावर कीव करावी का रडाव ? हेच कळत नव्हत ! तरी आम्ही आपल घोड पुढे दामटतच होतो - 'हम मजहबके लिए नही हे। मजहब हमारे लिए है। उसे बदलना चाहिए।' वगैरे वगैरे —

तेवढ्यात केबिनमधून हमीदभाईंनी बोलावलं मी आपली घाबरत घाबरत आत गेले. तर हसायला लागले.

'वेडे ! घाबरायला काय झालं ? मी तुमच्याच काकाच्या घरी उतरलोय ! तू इकडे होतीस, तुला ठाऊक नसेल. तुझ्या काकाचा मित्र आहे मी ! तर आता हे बघ, मी तुझा पण काका ! तर माझं ऐकणार ना ? '

'या साऱ्या मुसलमान मुली तुझ्या मैत्रिणी ना ! ' मी होकारार्थी मान डुलवली.

'त्यांना कितपत पटलय् ? '

कशी कुणास ठाऊक, पण मी एकदम बोलून गेले.

'त्याना काही एक पटल नाही. त्यांना कळलच नाही. तुम्ही त्याच्याशी बोलायला

बालात नि हिंदीत का नाही बोललात ? त्याना मराठी काहीच कळत नाही.'

'काय ? इतकी वर्षं एकत्र राहूनही त्याना मराठी येत नाही ? तुला कस हिंदी येतं ? तुमच्यासारखंच त्यानाही शाळेत मराठी असत की ?'

याला माझ्याकडे काहीच उत्तर नव्हत.

मग थोडा वेळ विचार करून तेच म्हणाले,

'बर, मग आता आपण असं करू. तुझ्या मैत्रिणीकरता वेगळ परत बोलतो. जा ! त्यांना बोलावून आण. नि बघ, जर त्याना माझ नाही पटलं ना ! तर तू रोज त्यांना हॅमरिंग करून जर एकीला जरी पटवू शकलीस ना, तर मी माझी फेरी यशस्वी झाली अस समजेन.'

मी एकदम गप्प झाले. एवढा विश्वास का ?

मी तेथेच उभी राहिले. मुलीना इथे कसं आणायच ? तोच सर म्हणाले,– 'जा जा ! घेऊन यां त्याना.दहा-एक मिनिटं बोलायचंय्.'

मी हॉलमध्ये जाऊन मुलीना सागितल, आपल्याला आत बोलावलंय. केबिनमध्ये जायच म्हणून त्या जरा आश्चर्यचकितच झाल्या. नि नाही म्हणत आपाआपले बुरखे सावरू लागल्या.

तोपर्यंत या मुलामुलीचं काय ठरल होतं कुणास ठाऊक ? पण त्यांच्या डोळ्यात लाली उमटली होती नि ते मैदानात दगड वगैरे घेऊन उभे होते. मी एकदम घाबरले. मी त्याच्याकडे जाऊन हळूच विचारल, 'ये तुम क्या कर रहे हो ? देखो, वो आपने मेहमान है। हम अभी अदर जाते हैं। कुछ बात करते है। तुम चूप रहना।'

तेवढ्यात त्या मुलीनी आपल्याला आत बोलावल्याच सागितल. त्याना केवढा तरी आनद झाला. 'अच्छा हुआ तुम अदर जा रहे हो। एकेक उतारके रख देना।'

अई ! माझ्या छातीत एकदम धडकीच भरली. कुपणच शेत खायला उठल की ! बिचारे त्याच्याकरता इतके धडपडताहेत, शिव्याशाप खाताहेत, याच त्याना काहीच नाही. नवीन पिढीला तरी हे सारं कळायला हव ! तरी बरं, स्वधर्मीयच माणूस आहे. काय कराव काहीच सुचेना. तोच सराचा परत निरोप आला.

म्हणून कस तरी मुलीना चुचकारून– 'देखो ! मेरी खातीर वहा कुछ नही करना ! मेरी कसम है' करत आत नेलं.

नि मग हमीदभाई हिंदीत बोलायला लागले. 'आपको मेरा कहना क्यू मजूर नही ? क्या पटता नही ? ये सब पहले मुझे समझा दो, फिर मैं आपको कुछ बताना चाहता हूँ।' एकदम नर्म आवाजात.

तोपर्यंत त्या मुलीचीही भीड चेपली नि एकेक भडाभडा बोलायला लागली आम्ही आपले तावातावाने बोलणाऱ्या मुलीकडे नि थोडंस हसून सारा जोर घालवणाऱ्या हमीदभाईंकडे नुसत पाहतच होतो.

त्याच्या शात डोळ्याकडे बघून मला एकदम बाहेरचे सतप्त डोळे आठवले नि मी एकदम उठून सराना बाजूला घेऊन बाहेरची परिस्थिती सागितली

सरही विचाराधीन झाले. तोच हमीदभाईंनी विचारल, 'काय झाल ?'

मी नि सर काय सागाव म्हणून तसेच उभे होतो. ते पुढं म्हणाले, 'बाहर शायद कुछ गडबड हुई है !'

मी एकदम चमकले, याना कस समजल ! प्रत्येक ठिकाणी अस होत असेल का ?

परत आपल्या चर्चेकडे वळून शातपणे चर्चा संपविली. मुलीना चांगले विचार यावेत म्हणून दुवा केली नि हसंत निरोप घेऊन निघाले. तोच सर म्हणाले, 'थाबा, फोन करून काही सेक्युरिटी मागवू. तसे जाऊ नका. इथली मुल तुम्हाला ठाऊक नाहीत. त्याचा काही एक भरोसा नाही'

हमीदभाई हसतच म्हणाले, 'कुछ नही होगा ! हर तरफ ऐसा होताही हे। अपनेही लोग है। उनके पत्थरोसे डरूगा तो उनके लिए कुछभी न कर पाऊगा।' नि सरळ बाहेर पडले.

मैदानात बरीच मुल दगड घेऊन गोळा झाली होती. सर त्याना सावरायला धावले. पण हमीदभाई सावकाश टाग्यात चढत म्हणाले,

'घाबरू नका. धीर ठेवा. एके दिवशी त्याना होऊनच पटेल ते पटवून घेण्याकरता त्यानी दगड मारण रास्तच आहे ते आधळेपणाने तरी विचार स्वीकारत नाहीत ना ! हे खूप आहे नि त्याकरता कुणाला तरी आत्माहुती द्यावीच लागणार.'

आत्माहुती......





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

# उपनिषदातील व्यापक वैश्विक तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष समाजजीवन

# यातील तफावत संघाने दूर करावी

दि. ८ मे १९७७ ला पुण्यात मा. बाळासाहेब देवरस यांचा सत्कार व मानपत्र समर्पण समारोह साजरा झाला. त्या प्रसंगी अध्यक्षपदावरून रँ. ग. स. महाजनी यानी केलेले भाषण •

आजचा समारंभ-राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस ह्याना मानपत्र देण्याचा उपक्रम म्हणजे चमत्काराचे युग संपले नाही याची साक्ष होय. असा सुयोग आपणा पुणेकराना येईल असे २१ महिन्यापूर्वी स्वप्नातसुद्धा आले नसते.

दुसरा मोठा चमत्कार म्हणजे राजकीय पातळीवर झालेली क्राती. आपली लोकशाही, त्या एकवीस महिन्यांच्या अवधीत पडद्याआड जाऊन, एकतत्री राज्यकारभाराचे रूप धारण करून तिने जो अवतार घेतला, त्यामुळे प्रथम शिस्तीचा व अनुशासनपर्वाचा अनुभव आला तरी, मग अनेक दुष्कृत्ये घडत गेली अकारण बदिवासात डाबलेल्या हजारो लोकाचा छळ (काही अपवाद सोडता) झाला. त्यांच्या कुटुबियांची शोचनीय अवस्था झाली. पण नवलाची गोष्ट अशी की, ही एकतत्री राजवट अगदी लोकशाहीच्या, शातता-पूर्ण निवडणुकीच्या तंत्रानेच संपुष्टात आली. आत्मनाशानेच ह्या राजवटीने आपणा सर्वांना अपेक्षित अशा द्विपक्षीय लोकशाही पद्धतीला जन्म दिला व अर्थातच राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे ग्रहण सुटले.

ही राजकीय क्राती अभूतपूर्वच म्हणावी लागेल. कारण अशी घटना इतर कोणत्याही देशात पूर्वी कधी झाल्याचे नमूद नाही. भारतात आणि भारतीयाच्या हातून झालेल्या ह्या चमत्काराची सगती न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे ह्याच्या उद्गारात सापडते. ते नेहमी म्हणत :

I have implicit faith in two articles of my creed :
(i) This country of ours is the true land of promise.
(ii) This race of ours is the chosen race

ह्या अभूतपूर्व क्रातीचा अर्थ हाच की–

Though history often repeats itself, it continues to write new chapters.

आता हे इतिहासाचे नवीन पान लिहिले गेले. पण पुनरावृत्तीचाही एक दाखला आपणाला मिळतो.

राष्ट्रीय स्वयसेवक सघ २१ महिन्याच्या दिव्यातून बाहेर पडला, ही घटना काही अभूतपूर्व नाही.

१ प्रभू रामचद्रानासुद्धा १२ वर्षांचा वनवास सोसावा लागला.
२ : सीतामाईला दोन अग्निदिव्ये करावी लागली.
३ . पाडवांना तेरा वर्षे वनवास-अज्ञातवास घडला.
४ : राजा हरिश्चंद्राची कथा विश्रुत आहेच.

अर्वाचीन इतिहासातसुद्धा कित्येक व्यक्तीना व सस्थाना अशाच दिव्यातून बाहेर पडावे लागले आहे तेव्हा १०० वर्षांनी इतिहास लिहिला जाईल तेव्हा सीझेरिअन शस्त्रक्रियेशिवाय झालेल्या द्विपक्षीय लोकशाहीच्या या जन्माची मात्र अभूतपूर्व म्हणून नोद होईल.

**संघाची स्थापना**

१९२५ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर डॉ हेडगेवार ह्यानी राष्ट्रीय स्वयसेवक संघाची स्थापना केली त्याचे उद्दिष्ट असे सागता येईल–

आपल्या राष्ट्राच्या ५००० वर्षांच्या इतिहासात अनेक स्थित्यतरे झाली, अनेक आक्रमणे आली, तरी भारत हा भारतच राहिला व भारतीय संस्कृती इतर सस्कृतीचे प्रवाह आत्मसात करूनसुद्धा भारतीयच राहिली, पण गेल्या १२०० वर्षांत झालेल्या जवळजवळ प्रत्येक परकीय आक्रमणाच्या वेळी आपल्याला हार खावी लागली. मूठभर इग्रज व्यापारी येतात काय आणि एतद्देशीयाच्या मदतीने देशावर स्वामित्व मिळवतात काय, ह्याची मीमासा करताना डॉक्टरांनी पाहिले की, ह्याला कारणे राष्ट्रीय भावनेचा लोप, आत्मविश्वासाचा ऱ्हास, सघटनेचा अभाव आणि आपल्या (हिंदु. धर्माच्या) सनातन वैशिष्टयाची विस्मृती ही होत. डॉक्टराना बगालमधील क्रातिकारकाची प्रत्यक्ष माहिती होती व काँग्रेसच्या चळवळीतही त्यानी भाग घेतला होता. पण राजकीय चळवळी, परकीयाचे जू झुगारून द्यावयाचे ह्याकरता काँग्रेसच्या झेंडयाखाली झालेली सघटना व एकी प्रतिकारात्मक होती. स्वातत्र्यप्राप्तीनतर ती टिकेलच अशी शाश्वती नव्हती जरूर होती ती सतत टिकणारी कार्यप्रवण भावात्मक सघटना उभारण्याची. त्यायोगाने चारित्र्य, एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रत्येक व्यक्तीत आणणे हा मुख्य हेतू. म्हणून त्यांनी सघाची स्थापना केली व त्याला एक नवीन कार्य-पद्धती घालून दिली.

१९४० साली ते निधन पावल्यानंतर सघाची सूत्रे श्री. गोळवलकर गुरुजीकडे आली गुरुजीच्या मागे मोठी तपश्चर्या होती. कलकत्त्यात रामकृष्ण आश्रमात वास्तव्य, हिमालयात चिंतन, स्वच्छ ब्रह्मचर्य ह्यानी युक्त गुरुजीनी आपल्या आदर्श आचरणाने व निर्मळ अत.-करणाने सर्वांच्या आदरास पात्र होऊन आयुष्यभर, १९७३ पर्यंत, सघाची सेवा केली, जोपासना केली. त्याचे स्वत चे चातुर्वर्ण्याबाबतचे प्रामाणिक विचार दिवसानुदिवस कालबाह्य होत आहेत, याची त्याना जाणीव होती. कारण बाळासाहेबानाच त्यानी एकदा सागितले की, ' जुन्या काळी काय होते त्याची मी शास्त्रोक्त चर्चा केली. आज ती व्यवस्था जीर्णशीर्ण, कालबाह्य झालेली आहे, ' हे त्याचेच शब्द. असो. आता गुरुजीचा वारसा घेऊन सघाचे कार्य कालानुरूप करण्याचे स्वातत्र्य, संधी व वाव आहे. भारताच्या राजधानीत श्री. मो. ग. तपस्वीना दिलेल्या मुलाखतीत श्री. बाळासाहेब

म्हणतात, 'संघाची नवी प्रतिमा उभी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आपण फक्त काय ते मूळच्या प्रतिमेवरचे मालिन्य दूर करणार आहोत.' पण त्या भाषेत विनय आहे, अव्याप्ती आहे. एकंदर सर्व मुलाखत वाचल्यावर व विशेषतः ८ मे १९७४ रोजी त्यांनी येथे वसत व्याख्यानमालेत दिलेल्या भाषणाकडे पाहिले तर, बाळासाहेब संघाला नवीन रगरूप देतील व नवीन अलंकार घालतील, यात सदेह नाही.

गेल्या ५० वर्षांतील सघाच्या कार्याचे मूल्यमापन करण्यात काय अडचणी येतात, त्याची चर्चा आज अप्रस्तुत होईल. एवढे सागितले म्हणजे पुरे की, गांधीवधानतरच्या गढूळ वातावरणात, अकारण संघ हा सशय, अविश्वास, गैरसमज व अपप्रचार याच्या फेऱ्यात सापडला व त्याची प्रतिमा अस्पष्ट, अधुक व विकृत अशी वाटली. दोन वेळा भोगलेल्या बंदीतून मुक्त झाल्यामुळे सघाचे कार्य निर्विघ्नपणे, यशस्वीपणे बदलत्या कालानुरूप चालविण्याला बाळासाहेब कटीबद्ध आहेत व समर्थ पण आहेत

आता सघाविषयी दोन मुद्द्याचा मी विचार करणार आहे.

### हिंदुत्व हे भारतीयत्व

हिंदुत्व, हिंदुधर्म, हिंदुसस्कृती अशा शब्दयोजनेमुळे Secularismच्या सर्वधर्मसमभावाच्या वातावरणात काही लोक बिचकतात, हे मान्य. पण त्यानी हिंदू म्हणजे भारतीय व हिंदुत्व म्हणजे भारतीयत्व हे लक्षात ठेवावे. त्यामुळे सघ सर्व भारतवासीयाना, भारताबद्दल राष्ट्रीय भावना असणाऱ्याना खुला आहे, हे स्पष्ट होईल. आजपर्यंत हिंदूशिवाय इतर जमातीना सामावण्याचा कसोशीने प्रयत्न झाला नाही, त्याचे कारण बहुसंख्य हिंदुसमाजाची घडी आधी नीट बसवावी व मग विस्तृत कार्याला हात घालावा, हा संकल्प. ही घडी नीट बसवावयाला प्रथम हिंदुधर्म जुनाट, प्रतिगामी स्वरूपाचा, स्थितिशील असल्याचा गैरसमज दूर करून हिंदूना व इतराना त्याची मुख्य तीन वैशिष्ट्ये-व्यापकता, समता व परिवर्तनशीलता–ही विशद करणे जरूर आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' अशी घोषणा करणाऱ्या शास्त्रीपडितांनी धर्माची सहिष्णुता, व्यापकता व अनाग्रहित्व व अनेकान्तवाद लक्षात घ्यावा व इतराना पटवावा.

'सर्वेऽपि सुखिन सन्तु सर्वे सन्तु निरामया:
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्'

हे वचन म्हणजे greatest good of the greatest number ह्यापेक्षाही उच्च भूमिका दर्शविते व त्यात Charter of human rights चा समावेश आहे.

पण लगेच व्यवहारातील पहिली पायरी म्हणून बहुजनसुखाय। बहुजनहिताय हाही पर्याय मान्य केला.

हिंदुधर्माच्या व्यापकतेबाबत व दलितवर्गाबाबतच्या आस्थेविषयी पडित नेहरू व श्रीमती गाधी याचे विचार पाहा–

'Nothing is inconsistent between Indian Philosophy, religion and democracy Hindu religion has within itself an impressive universalism It is large enough to encompass different and even contrarary beliefs. Religion in India would undergo whatever change is necessary to have it reflect the general welfare of the people. Hinduism has digested great changes after a Budhism came, Hiduism did not set itself in competition with Budhism : it absorbed it.' –Nehru.

भागवत-पुराणात बुद्धाला अवतार मानले आहे.

'It was a white lie to call me anti-Hindu. I am proud to be a Hindu and a true Hindu who follows the teachings of the saints and scholars of the religion I am against those Hindus who exploit the large hearted Hindus in the name of religion and God– *Every true Hindu would stand against communalism* because Hindus basically believe in socialism and justice' –इदिरा गाधी.

आता संघात गुप्तता आहे, हुकूमशाही आहे या आरोपाबद्दल बाळासाहेबानी समर्पक उत्तर दिले आहे सघाचे कार्य शाखांच्या मार्गाने होते. त्या शाखा सर्व देशभर-मिझोराम, नागालॅण्ड, अदमान, आदिवासी भागातही आहेत. व त्या खुल्या मैदानावर चालतात, तळघरात नाही, तर गुप्ततेला वावच कोठे आहे? बरे, हुकूमशाही काही राजकीय सत्तेशिवाय चालत नाही. तशी सत्ता सरसघचालकानासुद्धा नाही. असो

शेवटी संघाच्या कार्यपद्धतीबाबत बोलून मी आपले भाषण संपवितो. नियमाने रोज केवळ एकच तास शाखेत एकत्र जमायचे. शारीरिक उन्नतीकरता कवायत करायची. झालेल्या, होत असलेल्या व पुढे जरूर असलेल्या कार्याची चर्चा करायची. ह्या कार्यक्रमात वैयक्तिक चारित्र्य, एकराष्ट्रीयत्वाची भावना वगैरे गुणाचा परिपोष करायचा. ह्या पद्धतीत पावले एकत्र पडतात, शिस्त लागते, मनोमीलन होते. आपल्या ऋषिमुनींनीसुद्धा हाच मार्ग सागितला.

सगमच्छध्वम् सवदध्वम् संवोमनासि जानताम्।

(Meet together, talk together, May your minds be united.)

संघ सत्तेच्या व निवडणुकीच्या राजकारणापासून अलिप्त राहिला आहे व पुढेही राहील, अशी ग्वाही बाळासाहेबानी त्याच्या मुलाखतीत दिली आहे ह्याचे औचित्य आपल्या २२०० वर्षांपूर्वीच्या Plato च्या उद्गारातही सापडते.

समाजात एकरसता, एकजिनसीपणा, राष्ट्रीय ऐक्याची भावना उत्पन्न करायची तर समाजातील घटक ज्या व्यक्ती त्याचे चरित्र सुधारणे हाच मार्ग असतो.

Social welfare cannot be secured by mere political institutions. Men must possess a sense of justice and conscience, decency, honour, reverance.

Societies will collapse unless individuals have a quantum of certain moral qualities; and neither technology nor political machinery can be a substitute for them

Experience shows that institutions get wrested (used) and moulded to the nature of those who work them'

ह्या अनुभवातून आपण नुकतेच बाहेर पडलो आहोत.

मित्रहो, माझी खात्री आहे, की बाळासाहेबाच्या नेतृत्वाखाली उपनिषदातील व्यापक वैश्विक तत्त्वज्ञान आणि हिंदु समाजातील कालबाह्य झालेला जातीवर आधारलेला आचारधर्म त्याच्यातील तफावत दूर होऊन, संघ सर्व भारतीयाना समावून घेईल. भारतीयत्वाचा उत्कर्ष होईल. □

# महाविद्यालयीन नियतकालिके

## एक परखड परीक्षण

सदानंद बोरसे

कॉलेजच्या मॅगेझिनमध्ये आपले नाव छापून येणे, आपल्या साहित्याला जागा मिळणे ही गोष्ट मॅगेझिन हा प्रकार सुरू झाल्यापासून अभिमानाची मानली जाते. आपले मॅगेझिन व त्याचा दर्जा हा प्रत्येक कॉलेजच्या दृष्टीनेही मानबिंदू मानला जातो. साहजिकच स्वतःच्याच नव्हे तर दुसऱ्या कॉलेजच्या मॅगेझिनबद्दलही मनात एक उत्सुकता जरूर असते. या उत्सुकतेपोटीच मी पुण्याच्या काही कॉलेजांची नियतकालिके चाळली. त्यांच्यातील चांगल्यावाइटाचाच हा एक संक्षिप्त आढावा. तो आढावा तुम्हाला आवडो, न आवडो; पण तो वाचल्यानंतर कॉलेजांची ही नियतकालिके व त्यातून डोकावणारे तुमच्या तरुण मित्रांचे बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्व न्याहाळण्याची तुम्हाला इच्छा झाली, तरी हा लेख सार्थकी लागल्याचे समाधान मिळेल.

माझ्या हातात पुढील नियतकालिके पडली :

( १ ) अर्थव्यवहार ( बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज ),

( २ ) वार्षिक नियतकालिक ( इंजिनीयरिंग कॉलेज ),

( ३ ) बैजीमिक ( बी. जे. मेडिकल कॉलेज ),

( ४ ) फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन,

( ५ ) मिसलेनी ( आबासाहेब गरवारे आर्टस, सायन्स कॉलेज ),

( ६ ) मिसलेनी (गरवारे कॉमर्स कॉलेज);

( ७ ) मॉडर्न कॉलेज मॅगेझिन,

( ८ ) नचिकेत ( पुणे विद्यापीठ ).

### तोंड लपविण्यासाठी मुखपृष्ठ

ज्या पानाआड झाकली मूठ ठेवून संपादक तोंड लपवू शकतो ते तोंडपान किंवा मुखपृष्ठ. अर्थातच त्याची रंगरंगोटी जितकी अधिक असेल, तितके संपादकाचे तोंड अधिक लपते. आजकाल मात्र साधेपणा = सौंदर्य असे तत्त्व तोंडावर फेकून मुखपृष्ठाचा जास्तीत जास्त भाग कोरा ठेवण्याकडेच कल असतो. या वेळची बरीच मुखपृष्ठे मात्र बरीच भरलेली होती.

गरवारे कॉमर्सच्या मिसलेनीचे मुखपृष्ठ म्हणजे भगव्या हातकागदावर तीन चौकटी व मध्ये एक 'L' आकाराची आकृती. हे मुखपृष्ठ पाहून माझ्या निरनिराळ्या मित्रांनी फारच निरनिराळे विचार मांडले; कोणाला ते अकातील चौकोनी साहित्याचे प्रतीक वाटले, कोणाला गरवारे कॉलेजच्या इमारतीचा नकाशा वाटला, एकाने तर मला दोन डोळे, सोंड व शिल्लक उरलेला दात दाखवून हे एकदंताचे मुखमंडल असल्याचे छातीठोकपणे सांगितले.

हीच गोष्ट मॉडर्न कॉलेज मॅगेझिनच्या मुखपृष्ठाची भगवेच कव्हर, त्यावर एक काळे रेखाचित्र. कोणी म्हणाले, ही शुष्क झाडाची फांदी आहे. कोणी म्हणाले, एकमेकाशी निगडित असलेले साहित्यप्रवाह आहेत. मेडिकलच्या दोस्ताने सांगितले, हे क्रोमोसोम्स आहेत.

'अर्थव्यवहार'चे मुखपृष्ठ पाहिले म्हणजे कॉमर्स कॉलेजच्या अिकॉनॉमिक दृष्टिकोनाची साक्ष पटते ARTHA VYAVAHAR या तेरा लांबोड्या अक्षरांची तंगडी एकमेकात गुंतवून वाचकाच्या डोळ्यावर पुरेसा अत्याचार केल्यानंतर मॅगेझिनचे नाव कळावे म्हणून पुन्हा उजव्या कोपऱ्यात ते छापले आहे

फर्ग्युसनने बहुधा लोकमान्यांपासून चालत आलेले दरवर्षीचे ठराविक व निवडक मळकट रंगातील मुखपृष्ठ न टाकता या वेळी तुकड्यामधून कॉलेजातील काही स्थळे दाखविणारे मुखपृष्ठ छापले आहे. 'हेही नसे थोडके.'

आबासाहेब गरवारे (आर्टस, सायन्स) कॉलेजच्या मिसलेनीचे कव्हर काहीसे लक्ष वेधून घेणारे आहे. उगवत्या वा मावळत्या पिवळ्या सूर्याच्या पार्श्वभूमीवर उगवत्या भवितव्याकडे नजर लावलेला एक उगवता वा मावळता निळा युवक. माझी स्मरणशक्ती मात्र वारवार फर्ग्युसनमधील एका हस्तलिखितावर हे चित्र पाहिले असल्याची टोचणी देत होती; तेव्हा मी तिला दटावले, 'चूप ! त्या चित्रातील या निळ्या तरुणाबरोबरची तांबडी तरुणी निघून गेलीय.' त्या तरुणीचा मी इतर मुखपृष्ठावर बराच वेळ शोध घेत होतो.

इंजिनीअरिंग कॉलेजच्या मॅगेझिनचे मुखपृष्ठ म्हणजे भडक तांबड्या, निळ्या व जांभळ्या रंगाच्या काही अगम्य आकृत्यांची गिचमीड सभोवती मांडून बसलेला एक बिनचेहऱ्याचा इंजिनीयर. त्याचा नसलेला चेहरा कॉलेजातून बाहेर पडणाऱ्या इंजिनीयरबद्दल बरेच काही सांगतो.

'नचिकेत'च्या मुखपृष्ठावरही अशीच झाडाळलेल्या हिरवळीची वा हिरवळलेल्या झाडाळीची गर्दी व त्यातून वाट काढत जाणारी एक वाट.

या साऱ्या मुखपृष्ठामध्ये उठून दिसणारे मुखपृष्ठ बी. जे मेडिकल कॉलेजच्या बैजीमिकचे. चॉकलेटी पार्श्वभूमीवर उठून दिसणारे सिरिंज धरलेले निळे–पोपटी हात व बाजूलाच माणसाची जन्मभरची वाटचाल दाखविणारी एक चित्रसाखळी–त्यातील अगदी xy / xx क्रोमोसोमच्या जोड्यांपासून दुधाची वाटली, त्रिकोण, काठी ते शिंकाळ्यापर्यंत अत्यंत प्रतीकात्मक व समर्पक चित्रे.

तर अशी ही वेगवेगळी मुखपृष्ठे. ती बाजूला करून अंक बघायला सुरुवात केली.

### जाहिरातींची खिचडी

मिसलेनी (गरवारे कॉमर्स) मध्ये कथांची व लेखांची सुरुवात मजकुराच्या वर व खाली

मोकळी जागा सोडून काहीशा वेगळ्या पद्धतीने माडली आहे, पण सर्वच लेखाना ही पद्धत वापरली आहे. 'ओळी पचेचाळीस मिनिटाच्या' अशा एखाद्या लेखाच्या बाबतीत तर पानाच्या बॅलन्सिंगचा विचार न करता अट्टाहासाने हीच माडणी वापरली आहे. संपूर्ण अक चाळताना जाहिरातीची महापूर सख्या डोळ्यात भरते, पण हेही जाणवते की, जाहिरातीना स्वतंत्र पाने न देता जाहिराती व साहित्याची संयुक्त खिचडी ताटात ओतली आहे. त्यातच कविताची भेसळीची भाजी दोन ठिकाणी मांडली वा साडली आहे 'आठ–आठ, सहा–सहा कविता दोन पानात मावल्या नाहीत, तर तुम्हे नाव जोशी–अभ्यकराच्या पंक्तीत बसवीन' अशी धमकी सजावटकाराला दिली की काय कोण जाणे? हिंदी व इग्रजी कविता मात्र एका पानात तीनच काय 'एक या दो बस्स' या न्यायाने टाकलेल्या. हे त्या भाषावरचे खास प्रेम, कवितावरचे खास प्रेम की कवि–कवयित्रीवरचे खास प्रेम?

'मॉडर्न' मॅगेझिनमध्ये संपादकीय व *समासात ठळक अक्षरात* त्यातील महत्त्वपूर्ण मुद्दे अशी सुबक माडामाड असते नेहमीचा हरदासी झग्याचा घोळ आटोपून असेच सुबक सपादकीय लिहिण्यास जर मॉडर्नचे सपादक शिकले, तर ते अधिक उपकार ठरतील मॉडर्नच्या कथा व लेखाची माडणी अत्यंत सरधोपट आहे. मधूनमधून पेरलेल्या कविता व चौकटी काही वेळा लक्ष वेधतात. अंकासाठी जाहिराती घेतलेल्या नाहीत, त्याची अनुपस्थिती ही एक जाणवणारी बाब.

बी एम्. सी. सी, फर्ग्युसन, नचिकेत यांतील माडणीही अशीच सरळसोट, साचेबद्ध व वैशिष्टचहीन. येतील तसे लेख एकापुढे एक टाकलेले

लेटरिंगचा विचार केला, तर मिसलेनी (गरवारे कॉमर्स) मध्ये काही अहवालासाठी केलेले लेटरिंग सुरेख झाले आहे, पण ते सर्व विभागासाठी वापरलेले नाही. हा पक्षपात को त्या विभागाशी असलेल्या खुन्नशीचा सूड?

नेहमीच्या वळणदार घाटदार अक्षराऐवजी वेगळ्या जातीची तरीही अधिक सुदर दिसणारी अक्षरे वापरतात, याची जाणीव कोणत्याच संपादकाला नसावी.

वैजीमिकमध्येही हा अक्षराचा एकसारखेपणा जाणवला, पण त्याची उणीव वेगवेगळ्या पद्धतीच्या लेआऊटने व विषयाला साजेशा चित्रानी भरून काढली आहे. विशेषत: सर्व्हे, गमभन या लेखाची व मुलाखतीची चित्रे फारच सुरेख आहेत.

इजिनीयरिंग कॉलेजच्या मॅगेझिनमध्ये अक्षराची विविधता आहे, चित्रेही भरपूर आहेत, पण चित्रे अतिशय बाळबोध असल्यामुळे बटबटीत वाटतात. प्रत्येक विभाग सुरू करताना काढलेली चित्रे मात्र याला अपवाद. लेआऊटमधील बदल म्हणजे ओबडधोबडपणा नव्हे इजिनीयरिंगच्या मॅगेझिनमधील हा ओबडधोबडपणा लेख, कविता, जाहिराती याच्या एकत्र सरमिसळीमुळे आला आहे

मिसलेनी (आ. ग. आर्टस सायन्स) मध्ये मात्र लेआऊटमध्ये जाणीवपूर्वक बदल केले आहेत, पण त्याना वेगळ्या अक्षराची वा चित्राचीही जोड नसल्याने ते फारसे डोळ्यात भरत नाहीत बहुतेक सर्व अकामधील अहवाल हे आधीच्या अंकाच्या अहवालाप्रमाणेच माडणी फारशी न बदलता छापलेले आहेत.

छपाई पाहिली असता एक गोष्ट सहज जाणवते, सगळ्याचीच छपाई किमान अपेक्षा पूर्ण करणारी आहे. त्यातही वैजीमिकची छपाई स्वच्छ व सुबकपणामुळे उठून दिसली.

कागदामध्ये वैजीमिकचा अपवाद वगळता पाढरा स्वच्छपणा अभावानेच आढळला.

## चित्रे व चेहरे

चित्रे हे वैजीमिक व इजिनीयरिंगचे वैशिष्टय, तर विषयाला साजेशी चित्रे हे वैजीमिकचे खास वैशिष्टय. या दोन्ही मॅगेझिनमधील व्यगचित्रेही वेधक ठरली विशेषत: *'अभियांत्रिकी नाटय महोत्सव'* म्हणून दिलेली व्यगचित्रे फारच मजेदार होती. अर्थात यात काही चावून चघळून चोथा झालेली व्यंगचित्रेही होती दोन्ही अकांत काही व्यगचित्राचा सदर्भ स्थानिक घडामोडीचा असल्याने ती कळत नाहीत, अर्थात हा प्रकार स्वाभाविकच होता.

नियतकालिकातील फोटो हा संबंधिताच्या अत्यत जिव्हाळ्याचा विषय. साहजिकच त्याच्या मर्जीप्रमाणे पाने या विषयावर खर्ची न पडल्यास त्या मडक्याचे मोजून एकेक खापर सपादकाच्या डोक्यात वर्षभर प्रत्येक भेटीत फोडले जाते. दरम्यान दुसऱ्या वर्षासाठी नवा संपादक, नवे डोके व नवे मडके तयार होतच असते.

अशी परिस्थिती असताना गरवारे कॉमर्सच्या मिसलेनीमध्ये फोटोवर फक्त दोन पाने खर्ची घातली आहेत आणि मोजून सोळा विद्यार्थ्यांचे फोटो अत्यंत सुटसुटीत पद्धतीने व स्वत:चे स्वत:लासुद्धा ओळखू येतील अशा मोठ्या आकारात टाकण्यात आले आहेत यातून बऱ्याच गोष्टी सूचित होतात–फोटोबद्दल प्राचार्यांची नावड किंवा गुणी विद्यार्थ्यांचा तुटवडा किंवा–?

याउलट मॉडर्नच्या मॅगेझिनमध्ये फोटोसाठी चौदा पाने खर्ची टाकलेली आहेत. इतरही मॅगेझिनमध्ये ही सख्या दहाच्या आसपास रेगाळते आता यातूनही बऱ्याच गोष्टी सूचित होतात, फक्त आधीच्या उलट.

फोटोच्या बाबतीत नेहमी येणारा अनुभव म्हणजे चागल्या फोटोचा सूक्ष्मदर्शित आकाराच्या ब्लॉकमुळे झालेला विचका. बी. एम्. सी. सी. च्या अर्थव्यवहारमधील वार्षिक स्नेहसमेलनाचे फोटो म्हणजे मॅगेझिनमधील फोटो कसे नसावेत याचे उत्कृष्ट उदाहरण. बाकी जी. एम् सी, खेळ, उगवते-चमकते तारे इत्यादी नेहमीचे प्रकार आणि काही नेहमीचे, काही बदलते चेहरे दरवर्षीसारखेच. काही फोटो पाहून तर हे फोटो विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकाचे की खुर्च्यांचे असा प्रश्न मला दरवर्षी पडतो.

मुखपृष्ठ व नंतरची खरीखोटी श्रेयनामावली बाजूला सारून 'संपादकीया'ची भेट घेतली. अर्थव्यवहार, मिसलेनी (आ. ग. आर्टस्, सायन्स), मॉडर्न मॅगेझिन आणि फर्ग्युसन मॅगेझिन या चार नियतकालिकाच्या सपादकानी मागचा अहवालच सपादकीय म्हणून स्वत च्या हस्ताक्षरात पुन्हा उतरवून काढण्यात जे अपार श्रम घेतले त्याबद्दल त्याचे मन पूर्वक अभिनदन. सपादकीय कसे नसावे, हे त्यानी सोप्या शैलीत सोदाहरण स्पष्ट करून दाखविले जोपर्यंत कॉलेज मॅगेझिन चालू आहे, तोपर्यंत या चौघानाही सुधारणेला वाव आहे, हे नक्की बाकीच्याची सपादकीय सदरे आटोपशीर, अकातील काही गोष्टीचे स्पष्टीकरण देणारी आहेत. मिसलेनी (गरवारे कॉमर्स) मध्ये 'निनाद' या त्या कॉलेजातील हस्तलिखिताचे संपादकीय छापले

आहे. अंकाच्या सपादकीयापेक्षा तेच अधिक वाचनीय आहे

बैजीमिक. इंजिनीयरिंग व मिसेलनी (गरवारे कॉमर्स) मध्ये शेवटच्या पानावर टाकलेली आभार-प्रदर्शनाची सदरे वेगळी वाटली. त्यातही इजिनीयरिंगच्या ' जाता जाता 'चा जिव्हाळा अधिक जाणवला.

यानंतर लागते ते साहित्य-तरुणाचे, तरुणासाठी, तरुणानी लिहिलेले, तरुण वगैरे साहित्य यात मुख्य भरणा कथा व कवितांचा.

### त्रिकोणी कथा

इजिनीअरिंग मॅगेझिनच्या कथांबद्दल सौ. विद्या बाळ याचा अभिप्राय देतो, 'एकूण कथामध्ये तरुण वयाच्या निदर्शक आणि फार सामान्य प्रकारच्या प्रेमकथाचं प्रमाण अधिक!...कथाचा दर्जा मध्यम प्रतीचा वाटतो ' हाच अभिप्राय थोड्या-फार फरकाने बाकीच्या नियतकालिकांमधील कथांनाही लागू पडतो.

मिसलेनी (आ. ग. आर्टस, सायन्स) मधील ' जाणीव ' आणि ' निवारा ' या दोन कथा 'फेबाळलेल्या रानाईत आईस्क्रि-माळलेल्या गोळ्याने बुडी मारली; तरी तिची तेजाळलेली पावले गर्भाळलेल्या क्षिति-जाकडे चालतच होती ! लतच होती ! !-तच होती ! ! !-ती ! ! ! !' अशा शब्द-बबाळ आणि कथावस्तू हरवून बसलेल्या. जास्तीत जास्त क्लिष्ट आणि न समजणारे कोण लिहिते याची ही चढाओढ असावी.

दहा बीस ते एक पचेचाळीस, दिनांक सात डिसेबर एकोणीसशे शहात्तर (मिसलेनी), डबल क्रॉस (इजिनीअरिंग), ओळी पचे-चाळीस मिनिटाच्या (मिसलेनी-गरवारे कॉमर्स) या कथा अतिशय समातर आहेत. चारी कथामध्ये कॉलेजच्या एक दिवसातील ठराविक काळाचे वर्णन आले आहे. बऱ्याचदा त्यातील धागा अर्धवट सुटल्याने कथा तुटक व ठिगळलेली वाटते.

मिसलेनी (गरवारे कॉमर्स) मधील ' मला आता जायचय-निरोप ' या शीर्षक बदलून आणि कथा म्हणून टाकलेल्या ललित-लेखाच्या मूळ लेखकाची रॉयल्टी सखाराम कोकाटे याने दिली असेल, अशी आशा वाटते. हीच गोष्ट मिसलेनी (आ. ग. आर्टस, सायन्स) मधील 'तो राजहंस एक !' या कथेची. गेल्याच वर्षीच्या मिसलेनीतील एक कथा चेहऱ्यामोहऱ्यात थोडासा फेरफार करून आपल्या नावावर खपविण्याचे धाष्टर्य आणि लाघव मानलेले आहे.

कॉलेजमधील क्लार्कच्या आयुष्याची फर-पट चितारणारी 'ग्रिल्स' (मिसलेनी-गरवारे कॉमर्स) ही कथा अतिशय सुरेख आहे फॉर्मच्या दृष्टीने एक घास चिऊचा, सुनीत (बैजीमिक) या कथाची भट्टी नीट जमली आहे. नचिकेतमधील 'शाळेचा पहिला दिवस' ही एकमेव कथा ' ठीक ' या सदरात मोड-णारी. बाकी बहुतेक कथा प्रेमाचा त्रिकोण, प्रेमभंग, सूड वा ' माफ कर दिया ' अशा त्रिकोणात फिरणाऱ्या किंवा पोलिओ, गरिबी, वेड इत्यादी व्यथाचे अत्यत ढोबळ व ओबड-धोबड चित्रण करणाऱ्या आहेत संवादातून कथासूत्र पुढे नेण्याची शैली या वेळी बऱ्याच ठिकाणी दिसली.

### चौकोनी कविता

कॉलेज मॅगेझिनमधील अत्यत वेगळे, वेडे भावविश्व म्हणजे कविताचे विश्व; पण कवितांमध्येही प्रेम, विरहवेदना, नैराश्य, एकटेपणा याचा उथळपणा व बुजबुजाट फार आढळतो. खोल जाणारा, काळजाच्या कातळालाही काट्यासारखा सलणारा अनुभव देणारी कविता अगदी क्वचितच पावलात अडखळते. हा नेहमीचाच अनुभव या वर्षीही आला.

अर्थव्यवहारमधील आजच्या रक्ताचिख-लाची जाणीव देणारी 'आज' कविता बोचरी. बाकी कविता सामान्य किंवा अगम्य. ' अनामिका ' कवितेतील तीन ओळी नमुन्या-दाखल देतो-

'शुक्राच्या चादण्या
अवतरल्या आंगण्या
ठसल्या मनप्रागणा ',

हा यमक्या वामनी अट्टहास पाहिला की वाटते,

'यमकाचा ध्यास
प्रसिद्धीची प्यास
काव्याचा सत्यानाश '

अर्थव्यवहारमधील 'अहो अनारसेपत' ही अनारसे व करजीच्या स्वयंवराची कविता म्हणजे महाराष्ट्रशारदेच्या दरबारात प्रवेशणाऱ्या एका बालसाहित्यिकाची लल-कारी आहे; पण ती कवीच्या बौद्धिक बालवयाची किंवा बालबौद्धिक वयाचीही जाणीव करून देते.

या महाभागाला दोन्ही कर जोडोन, माथा टेकोन पोटतिडिकीची विनती, ' बाबा रे, तुझ्या असामान्य कर्तृत्वाला चिमणगीते, कावळबोल अशा ठिकाणी प्रचड स्कोप आहे; तेव्हा तुला जी वरणभाताची, श्रीखंडपुरीची लग्नं लावायची असतील ती त्या मंडपामध्ये जाऊन लाव अन हे कॉलेज मॅगेझिनचे कार्यालय इतर शुभकार्यासाठी मोकळे ठेव.' या कवितेनतर लगेचच ' ह्याची तिरडी का नाही कुणी बांधत ' या ओळी छापणे हा योगायोग की संपादकाचे चातुर्य ?

इंजिनीअरिंग मॅगेझिनमधील ' सिम्बॉल ' ही कविता अतिशय वेगळी वाटली. वात्रटिका अत्यत बालिश आहेत. 'सूर्योदय की सूर्यास्त ?', ' युद्धानतर ' अशा काही कविता-मधून उगाचच सामाजिक जाणीव कवटाळ-ण्याचा प्रयत्न केला आहे इतराना बूर्झ्वा ठरवून गरिबी, अत्याचार, डावेपणा याना मिठ्या मारण्याची केविलवाणी फॅशन सगळ्याच मॅगेझिनमध्ये दिसते. या बहुतेक कविता मऊ दुलईच्या उबेत बसून लिहिल्या असल्याने त्याना प्रत्यक्ष अनुभवाची तेज धार कधीच येत नाही Attention, माणसे आज हरवली आहेत (फर्ग्युसन मॅगेझिन), माझ्या मना (मॉडर्न मॅगेझीन), या अशाच काही फसलेल्या कविता. ' माझ्या मना ' तर चक्क विंदा करंदीकराच्या 'माझ्या मना बन दगड ' वरून उचलली आहे. मिसलेनी (गरवारे कॉमर्स) मध्ये ' चूल 'ची चूल फक्त काहीशी वेगळी मांडलेली. 'चहाचा अर्क ' ही कविता तर एखाद्या खास महिलांच्या मासिकात उखाणा म्हणून शोभली असती मॉडर्न मॅगेझिनमधील ' पाप की पुण्य ', बैजीमिकमधील ' कीव ' व ' सूर्य ' आणि मिसलेनी (आ. ग. आर्टस्, सायन्स) मधील ' द्वंद्व ' व ' आग ' या कविता वेगळेपणामुळे अपेक्षापूर्तीचे समाधान देतात. आणखी काही अपवाद वगळल्यास बाकी कविता म्हणजे कवी म्हणवून घेण्या-साठी टाकलेल्या पाट्या वा पाडलेल्या टाक-साळी आहेत.

बहुतेक अकामधील हिंदी कविता पाहिल्या तर, त्या दोन टोकामध्ये प्रवास

करतात–एक एकदम 'गमे मुहब्बत', 'दर्दे अश्क' करून ढळढळा अश्रू गाळणारी; तर दुसरी एकदम

'चाहे रोए व्योम भयकर,
धरती भी जो काँपे थरथर,
फिर भी जगाता जीवनमदिर,
पूरब को चुम्बित करता है दिनकर।'

अशी 'रुद्रास आवाहन' छापाची. इंग्रजी कविताही 'Darling of the night' असे वर्णन करून शेवटी Darling म्हणजे Sleep असे सागून स्वतःच खुळखुळणारी. मराठीतून विचार करून मग त्याचे हिंदी वा इंग्रजीत भाषांतर करण्याचा प्रयत्न यात केला आहे, याची स्पष्ट जाणीव या साऱ्याच कवितामध्ये आढळून येते.

## वाटोळे लेख

बहुतेक नियतकालिकांमधून आढळणारे लेख हे त्या त्या कॉलेजच्या खास विषयाशी संबधित असतात. उदा. अर्थव्यवहारमधील Applied Technology of Value Added Tax, LIC, 'उत्पादनक्षमता व वेतनमान' असे लेख हे कॉमर्सशी संबधित नसलेल्या माणसासाठी लिहिलेले नसतात. कदाचित ते कॉमर्सशी सबधित असलेल्या माणसासाठीही नसावेत. हीच गोष्ट बैजीमिक, इजिनीअरिंग मॅगेझिन व अन्य नियतकालिकामधील काही लेखाबद्दल म्हणता येईल. असे विचारप्रवर्तक लेख डोक्यावरून वाहून गेले आणि काही ललित लेख भेटले की, थोडासा मोकळा श्वास घेतल्यासारखे वाटते.

प्रत्येक अकात कोणत्या ना कोणत्या नव्या वा जुन्या पुस्तकाचे परीक्षण हवे तसे वा नको तसे दिले आहे त्याबद्दलचे अनास्थेचे कारण नतर कळले. एक पुस्तकपरीक्षण हवेच, असा सक्तीचा नियम करण्यात आला होता. या परीक्षणामध्ये 'जिप्सी'चे फर्ग्युसन मॅगेझिनमधील परीक्षण वगळता बाकी सर्व परीक्षणे चटावरच्या श्राद्धाप्रमाणे उरकून टाकलेली आहेत. ही श्राद्धे उरकण्यास यजमानपदही त्याच लायकीच्या पुस्तकाना देण्यात आले, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट

निरनिराळ्या व्यक्तीवर लिहिलेले लेख हा आणखी एक पाटी टाकण्याचा प्रकार. फर्ग्युसन मॅगेझिनमधील 'पूज्य संत श्रीगाडगे महाराज' असा एखादा लेख वाचायला लागल्यानतर लेखकाला सांगावेसे वाटते,

'बाबा रे, तू फुकट शाळा सोडलीस.'

व्यक्तीविषयक लेख हा मुख्यत तिच्या तत्त्वज्ञानाचे वा कार्याचे मूल्यमापन करणारा असावा, जीवनचरित्र वा भाकडकथा सागणारा नसावा, अशी माफक अपेक्षा असते.

अर्थव्यवहारमधील 'पुणे . माऊंट अबू · पुणे' हे प्रवासवर्णन अशाच शाळकरी साहित्याचा उत्तम नमुना. माऊट अबूच्या बसथाड्यापासून निघून हा प्रवासवर्णनकार तेथे सूर्यास्त बघायला जमलेल्या लोकाच्या यादीपर्यंत येऊन थडकला. मग ओघाने 'कुठे बुडाला पलीकडील तो सोन्याचा गोळा' आलेच. हे प्रवासवर्णन भारत सरकारच्या माहितीपत्रकात मॅगेझिनपेक्षा अधिक शोभले असते.

अशा शाळू लेखांची यादीच देता येईल.

–माझे पहिले डिसेक्शन (फ्रॉगचे); झोपडपट्टी समस्येची दुसरी बाजू; मुलाखत–एका चोराची; हिंदी मुझे नही आई ! The Food We Eat (मॉडर्न मॅगेझिन).

साहित्य, विज्ञान और जीवन (फर्ग्युसन (मॅगेझिन).

रुपेरी पडदा, If I Were An Examiner (मिसलेनी–गरवारे कॉमर्स).

मला Adult व्हायचे, That Reddish–Pink Cardigan (मिसलेनी–आ. ग आर्टस्, सायन्स.)

लेखामध्ये मॉडर्न मॅगेझीनमधील 'मी व जात' व '४२ वी घटनादुरुस्ती' या लेखमाला वेगळ्या वाटल्या. राजकीय विषय हाताळणारी ही एकमेव लेखमाला. बाकीचे उल्लेख अत्यंत पुसटते व निसटते होते. बैजीमिकमधील आठ ललित लेख विषयाच्या विविधतेमुळे उल्लेखनीय. त्यातील मुलाखती हेही अकाचे एक वैशिष्टय ठरावे.

बाकीच्या मॅगेझिनमधील लेख म्हणजे शिळ्या कढीला ऊत आणण्याचा नेहमीचा प्रकार–

विश्वशांतिका आधार . भारतीय सस्कृती, लोकसाहित्य आणि स्त्रीजीवन (नचिकेत).

Books : My Favourite Friends; Youth Power (अर्थव्यवहार).

विवाह–एक समस्या, सामाजिक जबाबदारी (फर्ग्युसन मॅगेझिन).

कॉलेजमधील उल्लेखनीय घडामोडी, लेखामधील ठळक मते, अशा वैशिष्टयपूर्ण गोष्टी माडण्यासाठी काही अंकामध्ये चौकटी वापरल्या आहेत.

• नचिकेतमधील 'ऐकावे ते नवलच,' 'जगातील वैचित्र्य' इत्यादी चौकटी वाचताना आपण 'विचित्र विश्व'च्या दिवाळी अंकाचे सपादकीय वाचत आहोत, असा भास होतो. पुढच्या नचिकेतमध्ये बहुधा आणखी एक नवलकथा समाविष्ट होईल. 'पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचा विद्यार्थी मुरलीधर कुऱ्हाडे, कोकिळेप्रमाणे गाणारा मासा, घोगऱ्या आवाजाचा कावळा इत्यादी प्राण्याचा संग्रह करतो.'

या नियतकालिकामधील छपाईच्या चुका मोजल्या, तर प्रत्येक पानामागे सरासरी आठ ते दहा ढोबळ चुका आहेत; विशेषत. इंग्रजी विभागात या चुकाचे पेव फुटते. अर्थात हा दोष कंपॉझिटरच्या माथी मारला की, निष्काळजी प्रूफरीडिंगच्या आरोपातून सशयाचा फायदा मिळून मुक्तता होते.

## तरीही आपलीशी वाटली

सरतेशेवटी या अकामधील विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल. फर्ग्युसन मॅगेझिन असे एकमेव मॅगेझिन,ज्यात विद्यार्थी प्रतिनिधींची जागाच नाही. सर्व भाग प्राध्यापकाचा बाकी अकामध्ये मात्र माझ्या मते विद्यार्थी प्रतिनिधीच्याच सारे हाती असते; इतके की, मनात आणले, तर 'या वर्षी मीच कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम पाहिले,' असेसुद्धा तो छापून आणवू शकेल. बहुतेक वेळा विद्यार्थी या संधीचा व अधिकाराचा योग्य व पुरेपूर फायदा उठवतातही. साहित्यामध्येही कवी व लेखकाचा भरणा सुमारे नव्वद टक्के असतो. आपले मॅगेझिन अधिकाधिक नटविण्याकडे, सजविण्याकडे साऱ्याचेच लक्ष असते आणि साऱ्यांचा मनोभावे तसा प्रयत्नही असतो.

–तर अशी ही नियतकालिके. त्याच्याबद्दलच्या जनरल इंप्रेशनबद्दल म्हणाल, तर काहीही क्रमवारी न ठरविता सगळीच मला सारखीच आवडली; कारण सगळी मला आपलीशी वाटली–अगदी आवडलेल्या व नावडलेल्या साहित्यासकट माझी वाटली. ☐

सर्वोत्तम लेखक ('टाईम')वरून

# अल्डूस हक्सले

(१८९४–१९६३)

परिचय : जे. एन. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

२२ नोव्हेंबर १९६३ रोजी प्रेसिडेन्ट केनेडीच्या निघृण हत्येने सबंध जग हादरले. त्या वेळी केनेडी लाट फार जोरात होती. केनेडीच्या हत्येची बातमी जगातील सर्व वृत्तपत्रानी ठळकपणे पहिल्या पानावर छापली होती. आणि त्याच वर्तमानपत्रात (सर्व नव्हे!) आतील बाजूस कुठेतरी कोपऱ्यात ५–७ ओळीत अल्डूस हक्सले कॅन्सरने निधन पावल्याची बातमी आली होती. सूर्यप्रकाशामुळे जसे तारे दिसत नाहीत तसेच राजकीय व्यक्तीपुढे लेखक तर काय पण सिनेमातले स्टार्ससुद्धा दिसत नाहीत याची प्रचीती गेल्या निवडणुकीत चागलीच आली.

वास्तविक लेखक म्हणजे सस्कृतीचा कणाच राज्यकर्त्यापेक्षा केव्हाही त्याचे महत्त्व जास्तच. पण या जगात असाच उरफाटा प्रकार चालू राहणार. कारण हेन्री जेम्स म्हणाला होता,

'Life is, in fact, a battle. Evil is insolent and strong, beauty enchanting but rare, goodness very apt to be weak; folly very apt to the defiant, wickedness to carry the day; imbeciles to be in great places, people of sense in small, and mankind generally unhappy. But the world as it stands is no illusion, no phantasm, no evil dream of a night; we wake up to it again for ever and ever, we can neither forget it nor deny it nor dispense with it.'

असो. अल्डुस हक्सले प्रसिद्ध झाला तो Brave New World या पुस्तकासाठी. या पुस्तकात त्याने विज्ञानाची प्रगती व राज्यसत्तेचा वाढता वरचष्मा यामुळे स्वातंत्र्याची होणारी गळचेपी याचे वर्णन केले आहे. सघटन अतिरेकी झाले की, माणूस हा माणूस राहात नाही व तो निव्वळ एका महान यंत्राच्या (राजसत्तेच्या) चाकाचा दाता (a cog in the wheel) बनून राहतो. फॅक्टरीच्या कामगाराना आवाजाचा त्रास होऊ नये म्हणून आधीपासूनच त्यांच्यावर आवाजावर भडोमार करण्यात येतो. वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या रीतीने असे made to order कामगार तयार केले जातात Brave New World मध्ये Genetic Engineering हे सुद्धा अगदी शिखराला पोहोचले असते. एकाच Gene मधून त्याच प्रकारच्या अनेक व्यक्ती निर्माण करता येतात. याच्यात समजा तुम्हाला एकाऐवजी शभर आईन्स्टाईन निर्माण करायचे असल्यास तसे करता येते. याला cloning म्हणतात कार्बन कॉपीजसारख्या त्याच त्याच माणसाच्या अनेक 'कॉपीज्' निघू शकतात.

अगदी अलीकडे बऱ्यास सुप्रसिद्ध शास्त्रज्ञानी Genetic engineering या विषयावर पुढे सशोधन करण्याचे नाकारले आहे. कारण त्याना वाटते की, अॅटमचा जसा शोध लावून त्याचा हिरोशिमा व नागासाकीवर दुरुपयोग करण्यात आला व अण्वस्त्राच्या निर्मितीवर जसा वारेमाप पैसा खर्च करून या शोधाचा दुरुपयोग करण्यात आला, तसाच किंबहुना त्यापेक्षा जास्त दुरुपयोग Genetic engineering चा होईल. Brave New World हे पुस्तक १९३२ साली आधी प्रसिद्ध झाले. यावरून हक्सलेचा द्रष्टेपणा सिद्ध होईल.

अल्डूस हक्सले याला वयाच्या १६ व्या वर्षी डोळ्यात रोग झाला व त्याची दृष्टी खूपच खराब झाली. असे झाले नसते तर अल्डूस हक्सले हा त्याचा भाऊ ज्यूलिअन हक्सले याच्यासारखा शास्त्रज्ञ झाला असता, हे Brave New World या पुस्तकावरून आपल्याला कळते. शिवाय एकदा त्याने असेही लिहिले होते,

'I am to a considerable extent a function of my defective eye-sight.'

लेखकानेच अंध व्हावे याच्यासारखे दुर्दैव नाही. लेखक हा सतत शब्दांशी, विचाराशी खेळत असतो, आणि विचार माडण्यासाठी पुस्तकाइतके चागले दुसरे कोणतेच माध्यम नाही. हक्सलेची दृष्टी अधू झाली आहे, तसाच ज्यॉं पॉल सार्त्र हाही जवळ जवळ अंध झाला आहे. आपल्याला कुणी दुसऱ्याने पुस्तके–मासिके वाचून दाखवली तर फारसा रस उत्पन्न होत नाही. पुस्तकाच्या रेकॉर्ड केलेल्या टेप्स आपण ऐकल्या तर त्याही फिटया पडतात कारण पुस्तक वाचताना आपल्याला एखादे वाक्य, एखादी कल्पना खूप आवडली की, आपण त्या जागेवर रेगाळतो, ती वाक्ये परत परत वाचतो. एकदा वि स. खाडेकराच्या आत्मचरित्रातला काही भाग एका वर्तमानपत्रात आला होता त्यात हे वाक्य होते, 'फूल कोमेजून त्याचा सुगध जिथे जात असेल तिथेच मनुष्य मेल्यानतर त्याचे चैतन्य जात असावे.' हे वाक्य मी ४/६ वेळा वाचले. हेच जर मला कुणी वाचून दाखवले असते तर तिथे मी रेगाळू शकलो नसतो. आणि a suspended moment in eternity सारखा मला अनुभव मिळाला नसता लहान मूल जसे आईसकॅंडी चोखून चोखून खाते तसेच आपण ते छापील शब्द, ती वाक्ये, त्या कल्पनाचा मनात 'आस्वाद' घेतो. ऐकताना किंवा ट्रेनमध्ये वाचताना त्यातला बराच चार्म निघून जातो.

अल्डूस हक्सले जन्माला आला तो अगदी उत्कृष्ट genes घेऊनच. ही देणगी ज्याला मिळते तोच या जगात खरा भाग्यवान. ही संपत्ती कोट्याधीश रुपयांच्या मालमत्तेपेक्षा मूल्यवान आहे. हक्सलेचे आजोबा थॉमस हेन्री हक्सले हे एक मोठे biologist होते. मेथ्यू अर्नोल्ड या सुप्रसिद्ध कवीच्या अंगातून चागुलपणा जणू झिरपतच होता. हा कवी हक्सलेच्या आईचा काका. हक्सलेचा सख्खा भाऊ ज्यूलिअन हक्सले याने ४८ पुस्तके लिहिली. त्यात त्याचे आत्मचरित्र ते माणसाची उत्क्रांती हे विषय आहेत. हा ज्यूलिअन हक्सले सुद्धा मूर्तिभजक होता प्रदूषण वगैरेविषयी त्याने कितीतरी वर्षांपूर्वी सूचन

दिल्या होत्या. अल्डूसचे वडील हे कॉर्नहील मॅगॅझिनचे संपादक होते. एकीकडे विज्ञान व दुसरीकडे साहित्य अशी परंपरा असलेल्या कुटुंबात तो जन्माला आला. साहित्य व विज्ञान याचा संगम अल्डूसच्या पुस्तकात दिसून येतो. परंतु निव्वळ साहित्याचा जर निकष लावला तर अल्डूस हक्सलेची पुस्तके थिटी पडतात. अल्डूस हक्सलेला कादबरीचे तंत्र अजीबात जमलेले नाही. त्याच्या बऱ्याच कादंबऱ्या त्याने लेख म्हणून लिहिल्या असत्या तर ते लेख चागले झाले असते.

अल्डूस हक्सले हा तंत्रकुशल जरी नव्हता तरी तो एक दृष्टा, अष्टपैलू माणूस होता. आणि म्हणूनच त्याची पुस्तके वाचनीय आहेत. साहित्य हे शेवटी लेखकाचेच अनुभव-विश्व असते. लेखकाने स्वतःशीच निष्ठ राहून त्याला जे खरे वाटते तेच लिहिले पाहिजे. कमिटेड साहित्यात काही प्रमाद घडले तरी तेच साहित्य उत्कृष्ट असते. तंत्रशुद्ध साहित्य किंवा निव्वळ वाचकाशीच बाधिलकी असलेले साहित्य कधीच उत्तुग शिखरावर जाऊ शकत नाही. सांगण्याचे तात्पर्य असे की, अल्डूस हक्सलेने विविध विषयावर पुष्कळच वाचन केले होते यात विज्ञान, साहित्य, धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, संगीत, चित्रकला व इतर अनेक विषय होते. ज्याचे वाचन एवढे सखोल होते त्याचे म्हणणे आपण आवराने ऐकलेच पाहिजे व तंत्राबद्दलची त्याची उणीव बाजूला ठेवून लहान मूल जसे समुद्रकाठावर अनेक दगडांमधून गारगोट्या निवडते, तसे चांगले चांगले त्याच्या पुस्तकातून उचलले पाहिजे. नवीन रंगाचे, नवीन आकाराचे गोटे दिसले की, ते मूल आनंदाने चीत्कार करून ते गोटे उचलते, तसेच नवीन विचार, नवीन कल्पना साहित्यात दिसल्या की, आपण त्याचे ग्रहण करायला हवे. हक्सलेच काय, पण कोणतेही साहित्य मनाची सर्व कवाडे उघडी ठेवून अशाच डोळस रीतीने वाचले पाहिजे.

लहान असताना अल्डूस हक्सलेचे डोके इतके वजनदार होते की, त्याच्या भारामुळे तो चालू अडीच तीन वर्षांचा होईपर्यंत चालू शकत नव्हता मोठा झाल्यावर तो ६ फूट ४ इंच उच झाला. तो नेहमी उदराच्या कातडीच्या रंगासारखा सूट घालत असे व सापाच्या कातडीवरील खवल्यांसारखी टाय घालत असे (यात त्याला कोणते मॅचिंग दिसले ते बायकानाच किंवा सीगमंड फ्रॉईडलाच कळाले असेल.) या पोषाखात त्याने भरपूर लेक्चर्स दिली.

एकदा अल्डूस हक्सलेने अंतिम वास्तवता काय आहे त्याचा शोध घेण्यासाठी Mescalin घेतले होते. Mescalin हे LSD सारखे ( consciousness – expanding ) मादक औषध आहे. त्यावेळी त्याला आलेले अनुभव त्याने ' The Doors of Perception and Heaven and Hell ' या पुस्तकात दिले आहे. त्याचे हे पुस्तक अतिशय वाचनीय आहे. हक्सले या पुस्तकात म्हणतात की, मॅस्कॅलीन घेणारा हा अल्कोहोल घेणाऱ्याप्रमाणे भाडत नाही की जोराने गाडया चालवून जीव देत नाही व घेत नाही. मॅस्कॅलीन घेणारा आपल्याच विश्वात वावरत असतो. ते पुढे याच पुस्तकात म्हणतात की, अमेरिकेतले रेड इंडियन्स पीयॉट बटन्सचे सेवन करतात. ( या पीयॉट बटन्सपासूनच मॅस्कॅलीन बनवलेले असते. ) योग्य मार्गदर्शनाखाली, रेड इंडियन्सनी हे औषध घेतल्यामुळे कोणताच अपाय दिसून आला नाही. या औषधाच्या गैरवापरामुळे Schizophrenia होतो व मानसिक भ्राती ( hallucinations ) होते.

अंतिम वास्तवता ( Ultimate Reality ) काय आहे हे शोधण्यासाठी कार्लोस कास्टानेडा याने सुद्धा अलीकडे पीयॉटचे सेवन Don Juan या रेड इंडियन गुरूच्या देखरेखीखाली केले होते. आणि शेवटी शेवटी तर कोणतेही मादक सेवन न करता तो अतीम वास्तवतेशी एकरूप होऊन जात असे. कार्लोस कास्टानेडाने या विषयावर चार पुस्तकेच लिहीली आहेत. त्याची नावे अशी आहेत : ( 1 ) Teachings of Don Juan ( 2 ) Separate Reality ( 3 ) Journey to Ixtlan ( 4 ) Tales of Power. ही चार पुस्तके म्हणजे अतींद्रिय व मानसशास्त्राचा एक महत्त्वाचा दस्तऐवजच आहे, असे एका समीक्षकाने सागितले होते. या पुस्तकाचा येथे उल्लेख करण्याचे कारण की, अल्डूस हक्सलेने स्वतःवर mescalin ने केलेल्या प्रयोगासारखीच ही पुस्तके आहेत.

अल्डूस हक्सले म्हणतात की, पहिल्यादा जेव्हा त्यांनी mescalin घेतले त्या वेळेला ते हळूहळू एका तेजस्वी व रहस्यमय वलयात शिरले. ' मला वाटले की मी वर्मीयरने काढलेल्या एखाद्या सुंदर चित्रातच घुसलो आहे. ' असे त्याने वर्णन केले होते. Jan Vermeer हा सतराव्या शतकातला डच पेन्टर होता. त्याने उभ्या आयुष्यात फक्त ४० च चित्रे काढली होती. कारण तो फारच हळू काम करीत असे. त्याची चित्रे जणू


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

1. **Prison Diary** – Jayaprakash Narayan 25/–
2. **The Valhall Exchange** – ( Bestseller ) Harry Patterson 10/–
3. **The Miernik Dossier** – ( Bestseller – Spy Story ) – Charles Mac Cdarry 9·60
४. **All About Cricket** – Brian Johnston 5 60
5. **Irving's Delight** – ( Humorous funny novel ) – Art Buchwald 14.10
6 **The Bedford Incident** –( War story ) – Mark Rascovich 17/–
7. **Down Where The Moon Is Small** – ( Bestseller – Novel ) — Richard Llewellyn 16/–

**– मराठी –**

१. **महाभारत : एक सूडाचा प्रवास** – – दाजी पणशीकर ५०/–

● पालकानो, आपल्या पाल्याला उत्तम सस्कार देण्यासाठी त्याना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून द्या. उत्तम साहित्य वाचणे हे पदवी मिळवण्याइतकेच ( किंबहुना जास्त ) महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी " फिनिक्स लायब्ररी. "

**दि फिनिक्स लायब्ररी,**
**७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०**

आरशात कोरीव काम केल्यासारखी भासतात. They have a mirror lik naturalism त्याची चित्रे मेट्रॉपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, न्यूयॉर्क येथे आहेत व त्याच्या एका चित्राची किंमत कितीतरी लक्ष रुपयात जाईल.

सांगायचे तात्पर्य असे की, consciousness-expanding मादक औषधे घेतली की प्रकाशाचे वेगवेगळे खेळ व काचेसारख्या आकृत्या दिसू लागतात (Psychedelic designs.)

हक्सले सधन होता तरी त्याची राहणी साधी होती. राहणी साधी असली तरी राहाण्याची जागा मात्र तो सुंदर निवडत असे. इटालीच्या टेकड्यावर, दक्षिण फ्रान्स, मॉजेव्ह् डेझर्ट व कमी वस्ती असलेल्या लॉस एंजालिसच्या वेशीवर अशा ठिकाणी तो राहात असे. इंग्रजी लोक मख्खपणाबद्दल प्रसिद्ध आहेत एकदा १९६१ मध्ये अचानक त्याच्या घराला आग लागून सर्व वस्तू जळून खाक झाल्या बऱ्याच पत्रकारानी तिकडे धाव घेतली व त्यानी अल्डूस हक्सलेला विचारले, "त्यावेळी व नतर तम्ही काय केले ?" हक्सले थंडपणाने उतरला, "मी बाजारात जाऊन नवीन टूथब्रश विकत घेतला !"

हक्सलेही स्टीनबक व हेमिंग्वे व इतर कैक प्रख्यात साहित्यिकाप्रमाणे आधी पत्रकार झाला होता. आपल्या भारतात मात्र पत्रकार चांगला साहित्यिक झाल्याचे क्वचितच आढळतो.

हक्सले १९३७ पासून कॅलिफोर्नियामध्ये राहायला गेला. यापुढे गूढ विषयात त्याला एकदम रस आला कारण आता त्याची अशी ठाम समजूत झाली होती की, अंतिम वास्तवतेची जाणीव झाल्याशिवाय व त्या अंतिम वास्तवतेशी नाते जोडल्याशिवाय मनुष्याला कोणतीच आशा नाही त्याचा दृष्टिकोन थोडया ओबडधोबडपणाने "After Many a Summer" व "Time Must Haves a Stop" या दोन कादबऱ्यात त्याने मांडला आहे औषधानेच जर अंतिम वास्तवतेची जाणीव होत असेल तर इतर आटापिटा का करावा ? असे त्याने एकदा विचारले होते अर्थात त्यामुळे तो एकदम "हिप्पीप्रिय" झाला ! "या मनुष्याला हृदय आहे. तो फारच सज्जन (दुसऱ्याचा विचार करणारा) आहे," असे ते लोक म्हणत.

याउलट हक्सलेच्या १९२० च्या समकालीन साहित्यिकाला तो असहिष्णू वाटे. "तो बोलताचालता ज्ञानकोश आहे. त्याच्या गळ्याचा पुढचाच भाग (मेंदू) फक्त जिवंत आहे. !" असे ते म्हणत.

रोनाल्ड क्लार्कनी हक्सले कुटुबाचे एक चरित्र लिहिले आहे. त्यात अल्डूसविषयी तो म्हणतो, 'हा माणूस मनुष्यच नाही. तो एक प्रकारचा controlled experiment च आहे !' अल्डूस हक्सलेला सेक्स किळसवाणी वाटे. –"तिटकाऱ्यातन निर्माण झालेल्या हिमतीने तो सेक्समध्ये भाग घेई !" असे एकदा डी. एच्. लॉरेन्स म्हणाला होता. उत्कट भावना, सेक्स वगैरे विषयाचा लॉरेन्स गुरूच होता

हक्सलें लॉरेन्सचा मित्र होता (Opposites attract !) हक्सलेची पहिली बायको मारिया हिने तर लॉरेन्सच्या लेडी चॅटर्लीज लव्हर या पुस्तकाचा काही हस्तलिखित भाग टाईप केला होता

□

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

## □ हेही नसे थोडके !

आम्ही आपले जुन्या पद्धतीनुसार शाळा शिकलो. अकरावीपर्यंत. त्यानतर चार वर्षे कॉलेजची की मग डिग्री असला सरळ साधा हिशेब आमच्या काळी असे. हा प्रकार आताशा जुना झाला असे म्हणतात नव्या परिभाषेनुसार शिक्षणाच्या या जुन्या प्रकाराला ११+४ असे म्हणतात आमच्या या शिक्षणप्रकाराची देखील अगभूत आणि लक्षणीय वैशिष्टचे होती एक म्हणजे तो साधा, सरळ शिक्षणप्रकार असे. आम्ही काय शिकत असू ते अगदी आमच्या आईवडिलानासुद्धा समजत असे इतकेच नव्हे तर, काही हुशार पाल्याचे हुशार व उत्साही पालक आपल्या पाल्याना घरी काही विषय शिकवूही शकत असत. आताशा आपले पाल्य व त्याचे शिक्षण हे एकंदरीत पालकाच्या हाताबाहेर जाणारे प्रकरण बनले आहे, असे ऐकतो. आमच्या वेळी हायस्कूलच्या शिक्षणाचीही काही विशेष खासियत होती. त्यानुसार पाचवी ते अकरावी अशा सात वर्षांच्या अभ्यासक्रमात आम्हाला तोच अभ्यासक्रम पुन्हापुन्हा सात वेळा शिकवून आमची तयारी अगदी पक्की करून घेतली जात असे. विशेषतः शास्त्राच्या विषयात अशा तऱ्हेच्या पुनरुक्तीवर मोठा भर असे. त्यानुसार हायस्कूलमध्ये सतत सात वर्षे मी 'तपमापक' नावाचे एक महत्त्वपूर्ण प्रकरण दरवर्षी नव्यानेच शिकल्याचे मला स्मरते. त्यामुळे तापमापकाविषयी सारी माहिती मला अजूनही तोंडपाठ आहे, आणि त्याची आकृती तर, मी एकदाही पेन्सिल न उचलता काढू शकतो. याखेरीज आम्हाला 'इतिहास' हा विषय पाचवी ते सातवीपर्यंत पूर्ण शिकवला जाई. आणि मग आठवी ते दहावीपर्यंत तोच इतिहास पुन्हा एकदा शिकवून आणखी पक्का केला जाई दुर्दैवाने असा दोनदा इतिहास शिकूनही माझा इतिहास मात्र अजूनही कच्चाच आहे. असो. तर अशा रीतीने आमची जुनी शिक्षणपद्धती वैशिष्टचपूर्ण होती. आणि आम्हाला तर, ती भारीच प्रिय होती. कारण तीमध्ये एकदाच केलेल्या अभ्यासावर आम्ही सात वर्षे चांगले मार्क मिळवत असू.

या जुन्या पद्धतीची आज अशी एकदम अचानक आठवण येण्याचे कारण असे की, आजकाल ही पद्धती निकालात काढल्याचे ऐकतो. त्याऐवजी १०+२+३ अशा कठीण नावाची एक नवीन पद्धती सुरू झाली आहे.

अशा रीतीने नवीन पद्धत अंमलात आणण्यामागे बरीच कारणे संभवतात एक तर जुनी पद्धत आता जुनी झाली असली पाहिजे, तेव्हा ती टाकून काहीतरी नवे सुरू केलेच पाहिजे दुसरे म्हणजे असले ११+४ पद्धतीचे शिक्षण घेऊन आमचे तरी काही कल्याण झाले नाही. तेव्हा दुसरी कल्याणप्रद योजना शोधणे अगत्याचे ठरले असावे त्यानुसार आपल्या सरकारने १०+२+३ अशी एक कल्याणकारी योजना सुरू केली

ही योजना ७५ सालापासून अंमलात आली व दहावीची पहिली बॅच या योजनेचा फायदा घेऊन ७५ साली एस्. एस्. सी. च्या परीक्षेला बसली अशी एकदम नवीन योजना सुरू करणे म्हणजे काही खेळ नव्हे सरकारला याची पूर्ण जाणीव होतीच तेव्हा ७० सालापासूनच आपल्या सरकारने एक घोषणा करून या योजनेला सुरुवात केल्याचे जाहीर केले पाच वर्षे यावर सतत विचार झाला. विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या कितीतरी योजना या काळात आखल्या गेल्या पाहिजेत. अशी अगदी जय्यत पूर्वतयारी चालू असतानाच अखेर ती बॅच दहावीला आली. शाळा सुरू झाल्या आणि मग अचानक सरकारी शिक्षणतज्ज्ञाना जाणवले, विद्यार्थ्यांना अभ्यासाला काही पुस्तके असतील तर बरे ! मग घाईघाईने अशी पुस्तके छापून दोन महिन्यांत मुलाना वाटण्यात आली. आणि मुलांचा अभ्यास सुरू झाला आता या नव्या अभ्यासक्रमाचा अगदी तपशीलवार विचार करण्याची जरूरी नाही. आणि खर तर, तसा तो अजून कुणीच केलेलाही नाही. पण तरीही या अभ्यासक्रमाची काही ठळक वैशिष्टचे जाणवतात एक म्हणजे या अभ्यासक्रमामुळे मुलाचा अभ्यास पालकाना अगम्य ठरला. यामुळे शिक्षणक्षेत्रातली पालकांची लुडबूड अजीबात बद झाली. दुसरी गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचा अभ्यास त्यांच्या कित्येक शिक्षकानाही अगम्य वाटला. आणि आपल्या उतारवयात पुन्हा एकदा अभ्यास करण्याची वेळ त्यांच्यावर आली. तिसरी गोष्ट म्हणजे जुन्या पद्धतीत होणारी पुनरावृत्ती टाळली जाऊन त्याऐवजी विविध विषयांची व्याप्ती बेसुमार वाढवली गेली आणि त्यायोगे दोन-तीन वर्षांचा अभ्यास एकाच वर्षात उरकण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली

तर अशा वैशिष्टयानी युक्त अशा परीक्षेला दहावीची पहिली बॅच बसली. विद्यार्थ्यांचे कल्याण होण्याचा योग जवळ आला पण दुर्दैवाने विद्यार्थ्यांनी परीक्षेला विरोधी कौल दिला परीक्षेत त्याचे अक्षरश पानिपत झाले. बऱ्याच विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेला पुन पुन्हा बसून या कल्याणकारी योजनाचा वारवार लाभ घेण्याचा चग बाधला. त्यामुळे दुर्दैवाने निकालाची टक्केवारी घसरली आणि मग मात्र शिक्षणतज्ज्ञाना मोठीच हळहळ वाटली. तमाम शिक्षणक्षेत्रात दुखःपूर्ण मरगळ पसरली. यातूनही अर्थातच बरेच कल्याण झाले एक तर तुम्हा-आम्हाला चर्चा करायला एक विषय मिळाला. परिसवाद, व्याख्याने याची हौस आम्ही भागवून घेतली. आणि याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे या निमित्ताने बऱ्याच शैक्षणिक सस्थांची लफडीकुलगडी एकदाची बाहेर निघाली. शिक्षणसस्थामधले गैरव्यवहार आम्हाला चवीने ऐकायला मिळाले. कित्येक सस्था डोळ्यादेखत धडाधड कोसळताना पाहायला मिळाल्या

अखेर या पद्धतीच्या पहिल्या तडाख्यातून आम्ही सावरलो याही अडचणीवर मात करून आमची दहावीची ही बॅच पुढे सरकली मग अकरावी–बारावीचे वर्ग कॉलेजकडे द्यावेत की शाळाकडे ठेवावेत, असा प्रश्न अचानक उपटला ७० सालापासून सतत पाच–सहा वर्षे या विषयावर विचार करूनही आपले सरकार यावर तोड काढू शकले नाही, तेव्हा याही मुद्दयावर घाईघाईने चर्चापरिसंवाद होऊन प्रश्न निकालात काढला गेला व फक्त अकरावीचेच वर्ग शाळाकडे देण्यात आले. तेव्हा बऱ्याच मंडळीना पुन्हा एकदा ११+४ ची जुनीच योजना पुन्हा आल्याचा भास झाला. पण प्रकरण काही इतके सरळ नव्हते ! या बॅचच्या विद्यार्थ्यांचे पुरते कल्याण करण्याचाच सरकारी चग होता, त्यामुळे बारावीच्या मुलांना एकदम मेडिकलला आणि इंजिनीयरिंगला प्रवेश देण्याचा फतवा निघाला मुलाचे एक वर्ष असे वाचणार म्हणून पालक आनदले फक्त दोन बॅचेसच्या विद्यार्थ्यांना एकाच बॅचच्या जागामध्ये प्रवेश देणे सोयीचे व्हावे, यासाठी आता प्रवेशपरीक्षेचे किरकोळ भूत मुलांसमोर उभे केले गेले या प्रवेशपरीक्षेवर विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असल्याने मुलानीही मुकाट्याने त्यासाठी अभ्यासाला सुरुवात केली.त्यासाठी सुटीत क्लासेस निघाले, खास वर्ग सुरू झाले एकदरीत विद्यार्थिवर्ग असा बारमाही अभ्यासात बुडून गेला हा अभ्यासही अतिशय सखोल असावा, त्यात कुठेही कमतरता राहू नये, यासाठी दक्षता म्हणून या प्रवेशपरीक्षेचे स्वरूप मात्र शेवटपर्यंत सरकारने जाहीर केले नाही. यामुळे मुलानी अगदी सर्वच दृष्टीने परिपूर्ण तयारी केली आणि ही तयारी पुरेशी झाल्याचे दिसताच सरकारने अचानक प्रवेशपरीक्षा रद्द केल्याचे जाहीर केले आणि मुलाना आपली परीक्षाच रद्द झाल्याचा आश्चर्याचा धक्का बसला. अशी अचानक परीक्षा रद्द करण्याबद्दल काही मडळीनी निषेध केल्याचे ऐकतो, परतु अखेर खरे महत्त्व ज्ञानार्जनाला आहे. आणि एकदा पूर्ण ज्ञानार्जन झाल्यावर परीक्षा हा भाग दुय्यम आहे, ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. तेव्हा या रद्द झालेल्या प्रवेशपरीक्षेचेही विशेष लाभ झालेच आहेत. या परीक्षेमुळेच मुलाचा अभ्यास चागला झाला कित्येक क्लासवाल्याचे धदे झाले. शिवाय परीक्षा रद्द झाल्याने मुलाना आपल्या क्लासच्या फीचे काही पैसे परतही मिळाले माझ्या एका मित्राने आपल्या क्लाससाठी १०५ रु फी भरली होती आता त्याला त्यातले ५ रु परतही मिळाले आहेत, तेव्हा हा लाभही नजरेआड करून चालणार नाही. याखेरीज नवीन शिक्षणपद्धतीचा प्रयोग करून पाहण्यासाठी बळी गेल्याचे स्वार्थत्यागी समाधानही कित्येक मुलाना लाभले

तरी अशा तऱ्हेच्या नवनवीन प्रायोगिक योजना वारवार राबविल्या जाणे आवश्यक आहे. याचे असे बरेच फायदे होतात. त्यातून लहान वयात मुले सोशिक असल्याने त्याच्यावर असे प्रयोग करणे सोपे जाते. त्याचा त्रास मुलाना फारसा होत नाहीच, शिवाय त्याचे पालकही सोशिक होतात.

आमच्या जुन्या पद्धतीत शिक्षण घेऊन आम्ही मुर्दाड झालो. नवीन पद्धतीत शिकून बालके सोशिक होतील, हेही नसे थोडके !

□

## विधानसभा निवडणुका

पृष्ठ ७ वरून

आणि हरिकृष्ण श्रीवास्तव यानी केली. यावर दुसऱ्या बाजूचे म्हणणे असे की, चरणसिंगानी निवड समितीचा सल्लाच घेतला नाही व तिने सुचविलेली काही नावे बदलली. जनता पक्षाच्या अतिम यादीत भालोद २०० पेक्षा अधिक, जनसघ ११०, लोकशाहीवादी कॉंग्रेस ४२, सघटना कॉंग्रेस ३०, समाजवादी २०, माजी कॉंग्रेसजन १५ अशी घटक पक्षाची वर्गवारी आहे. घटक पक्षात असतोष असला आणि काही ठिकाणी बडखोर उभे असले तरी जनता पक्षाला बहुमत मिळेल, पण लोकसभा निवडणुकी-एवढा मोठा विजय मिळणार नाही, हे जनता पक्षाचे नेतेही मान्य करीत आहेत.

मध्यप्रदेशामधील जनता यादीत आणी-बाणीला पाठिंबा देणाऱ्या अनेक उमेदवारांचा समावेश आहे त्याना मतदाराचा पाठिंबा मिळणे कठीण आहे असे तटस्थ निरीक्षकाना वाटते. जनता पक्ष सर्व ३२० जागा लढवीत आहे त्यात १७५ जागा माजी जनसघाच्या उमेदवाराना मिळाल्या असून बाकी १४५ जागाची वाटणी इतर घटक पक्षात झाली आहे. नुकतीच कॉंग्रेस सोडलेल्या काही उमेदवाराना जनता पक्षाने तिकिटे दिली आहेत एकूण ३२० जागासाठी १९९३ उमेद-वार उभे आहेत व त्यात जवळजवळ १३०० अपक्ष आहेत. तीस मतदारसघात सरळ लढती ४२ जागासाठी तिरंगी सामने व बाकी मतदारसघात बहुरंगी लढती आहेत. अनेक ठिकाणी जनता पक्षाचे तिकिटे न मिळालेले उमेदवार बडखोर म्हणून उभे आहेत. जनता पक्षाप्रमाणेच कॉंग्रेस सर्वच्या सर्व ३२० जागा लढवीत आहे. या दोन प्रमुख पक्षाशिवाय दोन्ही कम्युनिस्टपक्ष हिंदुमहासभा, रामराज्य परिषद, जनता मोर्चा (जनतापक्षातील फुटीर गट) प्रजातत्र कॉंग्रेस (लोकशाही कॉंग्रेसचा फुटीर गट) असे इतर पक्षच निवडणूक रिंगणात आहे

राजस्थानमध्ये परिस्थिती फारशी निराळी नाही तेथे २०० जागासाठी ११५१ उमेदवार म्हणजे प्रत्येक जागेसाठी सरासरी ५ ते ६ उमेदवार आहेत. अठरा सरळ सामने व ३९ तिरंगी सामने आहेत. जनता पक्षाच्या अधि-कृत उमेदवाराविरुद्ध २० बडखोर उभे आहेत. पण त्यापैकी बहुतेक माघार घेतील असा विश्वास जनता पक्षाच्या नेत्याना वाटतो. जनतापक्ष सर्व २०० जागा लढवीत आहे. कॉंग्रेस १८७, मार्क्सवादी १५, कम्युनिस्ट १०, अपक्ष ७३३ अशी उमेदवाराची विभा-गणी आहे बहुरंगी सामने असले तरी जनता पक्ष बहुमत मिळवील असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

हिमाचल प्रदेशातील चित्रही फारसे निराळे नाही तेथेही जनता पक्षात बंडखोरी असली तरी बहुमत मिळविणे कठीण जाणार आहे.

सर्वात विचित्र परिस्थिती आहे ती पश्चिम बगालमध्ये. तेथे जनतापक्ष आणि मार्क्सवादी आघाडी याच्यातील बोलणी फिसकटली त्यामुळे बहुतेक मतदारसघात बहुरंगी सामने असून कोणत्याच पक्षाला निर्णायक बहुमत नाही असा निकाल लाग-ण्याचा सभव आहे. आपण बहुमत मिळवू असे मार्क्सवाद्याना वाटत आहे, तसे झाल्यास जनता पक्षाला आपल्या बळाचा अदाज चुकला असेच म्हणावे लागेल

बाकी राज्यातील निवडणुका १२ ते १४ जूनपर्यंत आहेत. त्यासंबधीचे विश्लेषण पुढील अंकात.

□

---

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**४।६।७७ ते १०।६।७७**

**मेष :** उन्नती होईल

दुसरा रवी–शुक्र असेपर्यंत तुमचे कोणतेही काम यशस्वीपणे पार पडेल. हाती घ्याल ते तडीस जाईल. राजकारण–नोकरी–धदा सारे क्षेत्र तुमच्या कर्तृत्वाने गाजून जाईल. मित्राचे सहकार्य व्यवस्थित मिळेल. परदेशी प्रवासाचे प्रयत्न मार्गी लागतील. नोकरीत जुने काम बदलून नवे काम मिळेल. माहितीचा उपयोग होईल. वरिष्ठावर तुमच्या गुणाचा प्रभाव राहील. त्यामुळे तुमचे मनोरथ पूर्ण होऊ शकतील. हाताखालचे नोकर अगर घरगुती काम करणारे नोकर खूष राहणार नाहीत. त्यामुळे थोडीफार अडचण येईल. तब्येतीची काळजी घेणे आवश्यक आहे. उष्ण तब्येत असेल तर पित्त वाढून प्रवास रद्द करावा लागेल. बेकाराना काम मिळेल. नवे वाहन वापरू नका. शुभ दिनाक ४, ५.

**महिलांना** नोकरीच्या प्रयत्नात यश येईल.

**विद्यार्थ्यांना :** नवे वातावरण लाभेल.

**वृषभ :** स्थैर्य मिळेल

फार छान हा आठवडा आहे आजवर कोणतेही काम त्रासाशिवाय होत नव्हते. आता मात्र ते करायचे ठरवाल ते यश घेऊनच पार पडेल मित्राचे सहकार्य अपेक्षे-प्रमाणे मिळेल. गुरू हा ग्रह राशीतच आहे. त्यामुळे उपासना हातून होईल. चांगले विचार सुचतील. प्रामुख्याने लेखकांना गती मिळेल नवे नवे विचार सुचतील. प्रकाशन व्यवसाय सुधारेल. नव्या योजना अमलात आणणे सहज जमेल व्यवसायिक यश हाती येईल अनेक प्रकारे लाभ होऊ शकेल पत्रव्यवहार पार पडेल. लोकप्रियता मिळेल. कलाक्षेत्रा-तील स्वप्ने साकार होतील. राजकारणात प्रगतीकडे पाऊल पडेल. नोकरीत बरेच काही हितकारक घडेल. वरिष्ठाच्या मनातील आकस अगर गैरसमज दूर होऊन सबध सुधारतील. बेकाराना काम मिळेल. शुभ दिनाक : ६–८

**महिलांना** . लॉटरीपासुन लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना** · हुशारीचे कौतुक होईल.

**मिथुन :** अनुकूलता

अंतरिक्षातील सारे ग्रह अनुकूल असे माणसाच्या जीवनात कधीच घडत नाही. काही अनुकूल तर काही प्रतिकूल असेच घडत असते. रवी व गुरू बारावे आहेत. त्याकडे दुर्लक्ष न करता तुमचे सारे व्यवहार करा. अपयश येणार नाही. पैशाची गरज भागवता येईल. बचत होणार नाही एखादा

नवा उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने जरूर प्रयत्न करा. नोकरीत थोडी थोडी अनुकूलता लाभेल. कामाचा उरक होईल. वरिष्ठांच्या मनात सहानुभूती निर्माण होईल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या यावेळी कायम होतील. बदली-बढतीचे प्रयत्न करा. बेकाराना नोकरी मिळेल. शुभ दिनांक–६–७.

**महिलांना :** ससारातील अडचणीवर मात कराल.

**विद्यार्थ्यांना** · शाळेत अथवा अभ्यासात बदल होईल.

## कर्क : पैसा चांगला मिळेल.

तुम्हाला सध्या बरेच ग्रह अनुकूल आहेत. गुरू व रवी अकरावे आहेत. अनेक क्षेत्रांत यश सहज मिळणार आहे. हाती घेतलेले काम तडीस नेऊ शकाल परदेशी प्रवासाचे स्वप्न साकार होईल उच्चपदस्थ अशा व्यक्तीबरोबर निकटचे सबध जुळून येतील. रेस – लॉटरी वा अन्य मार्गाने श्रमाशिवाय पैसा मिळू शकेल. ज्याना नोकऱ्या मिळाल्या नसतील त्याना त्या यावेळी मिळतील ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. व्यापारी जगात भरपूर नफा मिळवू शकाल. एखादा धंदा जर मंदीत असेल तर त्याची सुधारणा यावेळी अवश्य करा. स्थावराचा प्रश्न मार्गी लागेल जमीन अगर प्लॉट खरेदी करू शकाल शुभ दिनांक ५–७.

**महिलांना** . व्रतवैकल्ये सहज पार पडतील

**विद्यार्थ्यांना :** आळस दूर होऊन बौद्धिक तेज पडेल.

## सिंह : राहणी उचावेल.

शनीची साडेसाती असली तरी त्यामुळे तुम्ही त्रस्त होण्याचे मुळीच कारण नाही राजकारण असो की तुमचा धंदा असो, गेलेले स्थान पुन्हा प्रस्थापित होणार आहे. कारण गुरू व राशिस्वामी रवी सध्या तुमच्यावर खूष आहेत. नोकरीत तुम्ही वरिष्ठ जागेवर बदलून जाणार आहात. चागले अधिकार मिळतील. तुमची रेंगाळलेली कामे पार पडतील. कोर्ट-कचेरीचे निकाल तुमच्या बाजूने लागतील. बेकारीची समस्या सुटेल. तुम्ही यावेळी जर एखाद्या निवडणुकीला उभे असाल तर त्यात तुम्हाला हमखास यश मिळणार आहे तुमच्यावर कर्जाचा बोजा असेल तर त्यातून मार्ग निघेल. नातेवाईक व मित्र यांची मदत मिळेल. स्वप्ने साकार होतील. अनेक बाजूनी दबदबा निर्माण होणार आहे. मन उत्साही व आनंदी राहणार आहे. शुभ दिनाक ६–७

**महिलांना :** तुमच्या आशा–आकाक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना :** मनाची चचलता कमी होईल.

## कन्या : अपेक्षापूर्ती

कन्या राशीच्या माणसाना कोणतेच यश सहजपणे मिळत नाही. भरपूर कष्ट, भरपूर दगदग, असे सारे घडत असते. पण शेवटी यश मिळते. मित्रहो, यावेळी अनेकप्रकारे तुमशी अपेक्षापूर्ती होणार आहे. सार्वजनिक कार्यात तुमचा दबदबा निर्माण होईल. तुमचा प्रभाव वाढेल. नव्या ओळखी होतील. उच्च राजकारणी व धनी व्यक्तीचा सहवास लाभेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. नोकरीत मालक अगर वरिष्ठ अधिकारी यांच्यावर तुमचा प्रभाव पडेल. तुमच्या आशा–आकाक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टीने पाऊल पडेल. प्रवासात उत्साह राहील. कौटुबिक संबंध सुधारतील बेकारांना नोकरी मिळवण्यात मोठे यश मिळेल धादल व गडबड थोडीफार कमो होईल. दुय्यम धंद्याचे स्वरूप बदलेल. स्थैर्य येईल. नव्या योजनाना अनुकूलता लाभेल. शुभ दिनांक ७–९.

**महिलांना** . तब्येत सुधारून मन उत्साही राहील.

**विद्यार्थ्यांना :** सारी अनुकूलता लाभणार आहे.

## तूळ : बरीच अनुकूलता

राहू बारावा आल्यापासून तुमचे सारे तंत्र जरा बिघडले आहे. पण पुढील आठवड्यात रवी भाग्यस्थानी गेला की, तुमच्या बाबतीत बरीच अनुकूलता निर्माण होऊ लागणार आहे. विशेषतः नोकरीतील त्रास व गडबड बरीच कमी होईल. कामात मन लागेल. थोडाफार उत्साह वाटेल. चालू धंद्याच्या बाबतीत नवे पाऊल सध्या तरी उचलू नका. भाडवल गुतवणूक करू नका. व्यापार तसा व्यवस्थित चालणार आहे. परतु धाडसाने एखादी नवी मोठी खरेदी करू नका. प्रवासाचा बेत आखू नका. पार पडणे जरा अवघड आहे. बेकाराना अजून थोडा वेळ थाबावे लागेल वैवाहिक सौख्य तसे वाईट नाही. पण मतभेदाना अगर सशयाला जागा देऊ नका. शुभ दिनाक ५–८.

**महिलांना** आपुलकी व सहानुभूती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** कला–गायनाचा अभ्यास करा.

## वृश्चिक : धनलाभ

तुमचा कटकटीचा काळ आता सपलेला आहे. कारण इतके दिवस बाराव्या राहूने तुम्हाला फार छळले. पण तोच राहू आता अकरावा झाला आहे. त्यामुळे तुमचे आर्थिक जीवनमान सुधारणार आहे श्रम करावे लागले तरी श्रमाचे चीज होईल. केलेल्या कामाचे योग्य पैसे तुमच्या पदरात पडतील नोकरीत ठीक आहे. जुने त्रासदायक असलेले वरिष्ठ बदलून तुमच्यावर मर्जी असलेले वरिष्ठ येतील. संशयाचे वातावरण कमी होईल. बेकारीची वणवण सपेल. नोकरी अगर धदा जमेल. बँकेकडून कर्ज मिळवून उद्योग सुरू करायला अनुकूलता आहे. रेस अगर लॉटरी अगर अन्य मार्गाने अनपेक्षित लाभ होईल एकूण परिस्थिती आशादायक राहील. शुभ दिनाक ६–८

**महिलांना** · नोकरीत बरीच अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षेप्रमाणे बदल घडून येईल.

## धनू : व्यवसायात प्रगती

सहावा रवी अनुकूल असला तरी सहावा गुरू तेवढा अनुकूल नाही. कोणतेही काम विलंबाने होणार आहे. परंतु शेवटी यश मिळणार आहे. यावेळी असेच एखाद्या महत्त्वाच्या कामात मोठे यश मिळणार आहे.

एखादी मोठी उच्चपदावरील व्यक्ती तुमच्या जीवनात येणार आहे व त्यामुळे भावी योजनावर अनुकूल परिणाम होणार आहे. तुम्ही अध्यात्मवादी असाल तर तुमची इच्छा पुरी होण्याचा काळ जवळ आहे नोकरीत व्यवस्थित चालेल समज–गैरसमज दूर होतील. वरिष्ठाबरोबर सहानुभूतीचे सबंध जुळून येतील. नव्या कामाची जबाबदारी सोपवली जाईल. प्रवासाचे अचानक ठरेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. जुने येणे वसूल होईल. शुभ दिनाक ७–८.

**महिलांना** . संसारातील कोंडी फुटेल. आरोग्य लाभेल.

**विद्यार्थ्यांना :** शालेय स्थित्यंतर घडेल.

**मकर :** अडचणीवर मात

तुमच्याभोवती निर्माण झालेली विचित्र परिस्थिती अजून पूर्ण नाहीशी व्हायला अवकाश आहे पण परिस्थितीत हळूहळू बदल होत आहे, याचे प्रत्यंतर येऊ लागणार आहे. सार्वजनिक क्षेत्रात तुमचे नाव पुन्हा गाजू लागणार आहे. राजकारणात तुम्ही अलिप्तच राहणे सध्या तरी उपयुक्त ठरेल. नोकरीत वरिष्ठाबरोबर मतभेद असले तरी, त्याचा तुमच्यावरला राग थोडासा कमी होणार आहे. तुमच्या हाताखाली नोकर असले तर, तुम्ही त्याच्याशी सहानुभूतीने व सरळ वागणे जास्त हितकारक ठरेल आर्थिक बाजू तशी वाईट नाही. रेस, लॉटरीत फायदा होईल. जुने येणे वसूल होईल. नवीन उद्योग सुरू करू नका. त्यासाठी थोडा वेळ दम धरणे आवश्यक आहे शुभ दिनाक ७, ९.

**महिलांना :** एखाद्या मोठ्या काळजीतून तुम्ही मुक्त व्हाल.

**विद्यार्थ्यांना** · अनुकूल बदल घडणार आहे.

**कुंभ :** प्रतिष्ठा वाढेल

तुम्हा व्यक्तीना गेले काही दिवस अडचणीतून जावे लागत आहे, याची मला कल्पना आहे पण दैवाच्या गतीपुढे कुणाचाच इलाज नसतो. पण चागले ग्रह आले की, चागली फळे मिळू लागतात, याचा प्रत्यय याच आठवड्यापासून येईल, आठवड्याच्या अखेरीला रवी पाचवा होत आहे. तो अनेक प्रकारे महत्त्व वाढवील यश व प्रगतीच्या वाटा दृष्टिपथात येतील. धद्यात बरकत निर्माण करील व नोकरीत स्वतंत्र स्थान देईल. आर्थिक घसरगुंडी थाबवून चार पैसे खर्च करता येतील. नोकरीत तुमचे डावलले गेलेले हक्क तुम्हाला परत मिळतील वरिष्ठावरोबर सुखाचा सुसंवाद होईल प्रवासाचा बेत तडीस जाईल. वैवाहिक सौख्य मिळेल. शुभ दिनाक ५, ७.

**महिलांना :** घरच्या अडचणीतून मार्ग निघेल नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना** · बौद्धिक हुशारीने आपुलकी मिळेल.

**मीन :** नोकरीत उत्तम

- तिसरा गुरू व रवी तुम्हाला सारे मनासारखे मिळवून देणारे आहे प्रामुख्याने नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा फारच महत्त्वाचा ठरणार आहे. बेकाराना आजवर जो त्रास झाला तो यावेळी सपणार आहे. चालू नोकरीत वरिष्ठाच्या मर्जीमुळे अनेक कामात तुमचे यश डोळ्यात भरण्याजोगे असेल. प्रमोशनचे काम सहज होऊन जाईल. तुमच्यापैकी जे अधिक भाग्यवान असतील ते परदेश-प्रवासाचे मानकरी ठरतील. लेखकाना चागला वाव मिळेल. त्याच्या लेखनाला मागणी येऊन ते लोकप्रिय ठरेल. बक्षिसाच्या रूपाने अगर इतर मार्गाने एकदम रक्कम हाती येईल. मोठमोठ्या व्यक्तीबरोबर जिव्हाळ्याचे संबध जुळून येतील. प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य उत्तम राहील. जुना आजार कमी होईल. शुभ दिनाक ६, ८.

**महिलांना** . शिक्षणात व खेळात यश मिळेल

**विद्यार्थ्यांना :** मन चैतन्यदायी व उत्साही राहील. □

**मृणाल सेनचा मामुली चित्रपट**

# मृगया

अवधूत परळकर

मिठू चक्रवर्ती आणि साधू मेहेरचा देखणा अभिनय चित्रपटाला वाचवू शकत नाही आणि पहिल्या फ्रेमपासून चित्रपट कोसळायला सुरवात होते. मग प्रेक्षकाच्या नशिबी ठरतो तो एका श्रेष्ठ दिग्दर्शकाच्या दिग्दर्शनाच्या अधोगतीचा प्रवास.

मृणाल सेनचा नवा चित्रपट 'मृगया' संपतो तो प्रेक्षकाना एक मामुली चित्रपट पाहायला मिळाल्याच असमाधान देऊन

'भुवनशोम', 'कलकत्ता सेव्हन्टीवन'चा दिग्दर्शक तो हाच का ?

'एक अधुरी कहानी' नावाचा असामान्य चित्रपट यानच काढला का ?

प्रचारासाठी कला राबवण्याची हुशारी असलेला, सत्यजित रॉयच्या चित्रपट–क्षेत्रातल्या वर्चस्वाला शह द्यायचं सामर्थ्य असलेला हाच का तो मृणाल सेन ?

'मृगया' तसा एका दृष्टीनं मृणाल सेनचा एक आगळा चित्रपट आहे.

त्याच्या इतर चित्रपटात आढळणारी तांत्रिक कसरत इथं नाही.

सपूर्ण दृश्य एकाएकी गोठवणाऱ्या फ्रिझ-फ्रेम्स नाहीत.

ॲनिमेशनची किमया नाही. स्लो–मोशन नाही.

चक्रावून सोडणारे उलटसुलट फ्लॅशबॅक्स नाहीत.

ब्लॅक अँड व्हाईट फिलममध्ये एखादा रंगीत तुकडा किंवा रंगीत फिलममध्ये एखादा ब्लॅक अँड व्हाईट प्रसंग असला प्रकार नाही.

एखादा फ्लॅशबॅक सोडला तर 'मृगया'

हा साधा, सरळ आणि सोपा चित्रपट आहे. इतका सोपा की, चित्रपटाचं तात्पर्य आणि हेतूही पडद्यावर अक्षरी स्वरूपात वाचायला मिळतो.

'हुतात्म्याचं स्मरण ठेवा.'

कोण हे हुतात्मे?

त्यांच्यातला एक आहे नक्षलवादी. (मृणाल सेनचा चित्रपट म्हटलं की यातून सुटका नाही.) चित्रपटात त्याचं अस्तित्व जाणवते ते तो घर सोडून निघून गेल्याची बातमी गावात पसरल्यावर. नंतर तो प्रत्यक्ष दिसतो पोलिसांची नजर चुकवून आईला भेटायला आलेला. शेवटी त्याला सर्वसाधारण नक्षलवादी मृत्यू येतो. पोलिसाच्या ससेमिऱ्यात एका खबऱ्याची गोळी लागून तो ठार होतो.

दुसरा एक आदिवासी तरुण.

चित्रपटाचा नायक. दिसायला राजबिंडा, सुडौल, निरागस. मृगया म्हणजे शाही शिकार. हा तरुण शिकारीत तरबेज. डोंगरापलीकडे बंगल्यात राहाणाऱ्या इंग्रज साहेबाला (राजासाब) शिकार आवडते, एवढ कळल्यावर तो अधनमधन शिकार घेऊन जातो.

राजेसाहेबाच्या चेहऱ्यावरची खुषी पाहून याचे डोळे आनंदान फुलतात. गुलामगिरी आणि लाचारी त्यानं आनंदान स्वीकारलेली, किंवा त्याच्या रक्तातच ती आधीपासून असलेली. इकडे त्याच्या गावात सावकारी-अत्याचार चालू आहेत. दामदुप्पट व्याज वसूल करणं, ते करताना हवी तेवढी पिळवणूक, जूलूम—जबरदस्ती.

इतर आदिवासीप्रमाणे हा नायकही हे सर्व मुकाट्यानं सहन करीत असतो. सावकाराच्या जुलूमशाहीबद्दल त्याची काही प्रतिक्रिया नसते. त्याच्या डोळ्यासमोर फक्त त्याचा गोरा राजासाब, त्याला नजर करायची शिकार.

आणि एक दिवस सावकारी अत्याचार त्याच्याजवळ येऊन पोचतो. सावकार आपल्या हस्तकाकरवी त्याची पत्नी पळवून न्यायचा प्रयत्न करतो. तरुणाच रक्त खवळते. तो सुसाट धावत सुटतो. सावकाराला गाठून तो कुऱ्हाडीनं सावकाराची शिकार करतो. आणि आपलं हे नवं सावज गोऱ्या साहेबापुढं सादर करतो. परिणामी खुनाचा आरोप, खटला आणि फाशी.

आदिवासी भागात प्रत्यक्ष चित्रीकरण केल्यान या चित्रपटाला एक नवेपणा प्राप्त झाला आहे. पण हा नवेपणा तेवढ्यापुरताच मर्यादित आहे. आदिवासींची शेती, आदिवासींची नृत्यं फिल्म्स डिव्हिजनच्या माहितीपटातच शोभावीत अशी आहेत.

विदेशी चित्रपटाच्या तोडीची रंगसंगती आपल्याकडच्या फार थोड्या रंगीत चित्रपटात दिसून येते. या थोड्या चित्रपटात 'मृगया' बसत नाही. तेवढे सोडल तर कॅमेऱ्याचा वापर के. के. महाजननं चातुर्यानं केलं आहे. पण के. के. महाजनच छायाचित्रण उत्तम आहे, साधू मेहेरचा अभिनय उत्कृष्ट आहे, या खास नमूद करण्यासारख्या गोष्टी राहिलेल्या नाहीत.

चित्रपट कसाही असो. आपली भूमिका जिवंतपणे सादर करायची साधू मेहेरला सवयच आहे. नव्या नटाचं— (मिठू चक्रवर्तीचं) कौतुक मात्र करायला हवं. अभिनय, देखणेपण, आत्मविश्वासपूर्वक वावर या गुणांच्या भांडवलावर तो आपल्या पुढल्याही अनेक भूमिका गाजवेल असं वाटतं. त्याच राजबिंडेपण मात्र, या चित्रपटातल्या त्याच्या भूमिकेतला ठळक दोष आहे. त्याची जबाबदारी अर्थातच दिग्दर्शकाकडे जाते आपल्या अभिनयान मिठू चक्रवर्ती हाही दोष फारसा जाणवू देत नाही.

मृणाल सेनची दिग्दर्शनातली आजवरची कामगिरी पाहिली तर, 'मृगया'तल दिग्दर्शन दर्जाहीनच म्हणावं लागेल. सावकार करीत असलेली आदिवासींची पिळवणूक, आदिवासींची लाचारी, सहनशीलवृत्ती, त्याना गुरापासून होणारा उपद्रव वगैरे व्यक्त करण्यासाठी त्यानी दृश्यापेक्षा शब्दाचाच अधिक वापर केला आहे. आणि हे धक्कादायक आहे.

गोऱ्या साहेबाचा बंगला, आदिवासी तरुणाला घडलेल त्याचं दर्शन, जंगलातला पाठलाग, सावकाराचा खून इत्यादी काही मोजक्या दृश्यातली वातावरणनिर्मिती अस्सल आहे. पण एवढ्यानं काय होणार?

सलील चौधरीसारख्या प्रदेवाईक संगीतकाराची निवड या चित्रपटासाठी करायला नको होती. त्याच्या संगीतात ग्लॅमर आहे आणि ते चित्रपटातलं वातावरण बिघडवून टाकते. उदाहरणार्थ, सावकाराचा खून करायला नायक जंगलातून धावत निघतो त्यावेळच सस्पेन्स सूचित करणार फिल्मी पार्श्वसंगीत. अर्थात, स्वत दिग्दर्शकानच विषय इतका सुपरफिशियली हाताळलाय की, योग्य पार्श्वसंगीतान परिणामात फारशी भर पडली असती की नाही कुणास ठाऊक! आदिवसींची पिळवणूक आणि त्यांच्यात निर्माण झालेली प्रतिकाराची भावना हा चित्रपटाचा मध्यवर्ती विषय असावा. पण चित्रपटात हे कुठे काय नि केव्हा व्यक्त होते!

चित्रपटाच्या शेवटी 'कृपया उभं राहून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहा' अशी अक्षरं येतात.

कोण हुतात्मा?


बायकोवर अत्याचार झाला म्हणून वैयक्तिक स्वार्थासाठी सावकाराचा बळी घेणारा आदिवासी?

मॉस्को चित्रपटमहोत्सवासाठी 'मृगया'-ची निवड झाली आहे. त्या साम्यवादी देशाला हौतात्म्याची ही नवी व्याख्या मानवण्यासारखी आहे काय?

चित्रपट महोत्सव आणि त्यासाठी निवडले जाणारे चित्रपट याविषयी खल करण्यात अर्थ नाही. चानीसारख्या चित्रपटाची जिथं महोत्सवासाठी निवड होते!

वाईटात वाईट चित्रपटही चानीहून वाईट नसेल म्हणतात. 'मृगया' तितकासा वाईट नाही.

फक्त तो मृणाल सेनचा असायला नको होता. □



# स्वर्गीय अमिया चक्रवर्ती

## सिनेमातच फुललेले आणि संपलेले आयुष्य !

शिरीष सहस्रबुद्धे

भारतीय चित्रपटकलेच्या इतिहासात ज्यांची नावं अग्रक्रमानं घेतली जावीत अशा व्यक्तींचा चित्रपटाच्या दुनियेत प्रवेश कसा झाला, याचा इतिहास तपासला तर बहुतेकांच्या बाबतीत तो अपघातानं घडल्याचं दिसतं. ज्येष्ठ कलाकार अशोककुमारचं उदाहरण अनेकदा दिले जातेच. स्व. अमिया चक्रवर्तीही या अलिखित नियमाला अपवाद ठरत नाहीत. १९३३/३४ मध्ये कलकत्यात सरळपणे एम. ए. चा अभ्यास करणारा हा तरुण १९३५ मध्ये, म्हणजे वयाच्या तेविसाव्या वर्षी पळून मुंबईला येऊन ठेपला तो काही फिल्मस्टार वगैरे बनण्याच्या महत्त्वाकांक्षेनं नव्हे. ब्रिटिश पोलिसांचा ससेमिरा चुकवणं एवढाच उद्देश होता त्यामागे. पण मुंबईचे त्याचे आश्रयदाते नातेवाईक निरंजन पाल हे बाँबे टॉकीज् स्टुडिओमध्ये कथाविभागात नोकरीला होते, तेव्हा अमियाही तिथंच चिकटले झालं.

अमिया चक्रवतींचं निधन झाल्याला आज दोन दशकं उलटून गेली. त्यांची फिल्मी कारकीर्द तशी लहानशीच, उण्यापुऱ्या सतरा वर्षांची ( १९४०–१९५७ ). चित्रपटांची संख्या तर विशीच्या आतच. कारण मृत्यूनं त्यांना गाठलं तेच अवघ्या पंचेचाळिसाव्या वर्षी. तेही त्यांचं कर्तृत्व, प्रतिभेची भरारी कळसाला पोचलेली असतानाच. अमियांच्या एकोणीस चित्रपटात पडेल आणि रद्दी चित्रपट अजीबातच नव्हते असं नाही. पण दाग ( १९५२ ), पतिता ( १९५३ ), आणि सीमा ( १९५५ ) सारखे अविस्मरणीय चित्रपट देणाऱ्या अमिया चक्रवर्तींना सहजासहजी विसरणं कठीण आहे. पुण्याच्या चित्रांजली फिल्म सोसायटी आणि फिल्म कल्चरल सेंटर यांनी नुकताच अमिया चक्रवर्ती चित्रमहोत्सव संयुक्तपणे आयोजित केला होता, तेव्हाही हाच अनुभव आला. दि. २२ ते २५ मे दरम्यान झालेल्या या चित्रमहोत्सवाचं उद्‌घाटन स्व. अमियांचे जुने सहकारी श्री. एन. बी. कामत ( अध्यक्ष, फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया ) आणि अभिनेत्री श्रीमती उषाकिरण यांच्या उपस्थितीत झालं. दोघांनीही आपापल्या भाषणात अमियाजींच्या हृद्य आठवणी सांगितल्या.

'सिनेमाचं चित्रीकरण सुरू करतानाच अमियाजी त्याच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करायचे आणि ती न चुकता पाळायचे, येतील त्या सर्व संकटांना तोंड देऊन. ते सच्चा दिलाचे कलाकार होते आणि बॉक्स ऑफिसवर नजर ठेवून आपल्या कलेशी – प्रतिभेशी त्यांनी कधीही तडजोड पत्करली नाही,' अशा शब्दात श्री. कामत यांनी अमियाजींबद्दल आदर व्यक्त केला, तर श्रीमती उषा किरण यांनी त्यांचा उल्लेख आपले गुरू असा केला. 'दाग' ( १९५२ ), 'पतिता' ( १९५३ ), 'सीमा' ( १९५५ ) आणि 'कठपुतली' ( १९५७ ) या अमियांच्या चार फिल्म्स् या महोत्सवात संपूर्ण दाखविण्यात आल्या आणि 'पुनर्मीलन' ( १९३९ ), 'बंधन' ( १९४० ), 'बसंत' ( १९४२ ) आणि 'बादल' ( १९५२ ) यातले काही भाग प्रदर्शित करून अमियाजींच्या करियरचा शोध प्रारंभापासूनच घेण्यात आला. दोन दशकांवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या या दिग्दर्शक-कलाकाराची आठवण नव्या चित्ररसिकांच्या मनातही जागविणाऱ्या या महोत्सवाच्या आयोजकांना –श्री. शशिकांत किणीकर व त्यांच्या सहकाऱ्यांना – धन्यवाद द्यायला हवेत.

स्व. अमिया चक्रवर्तींचं स्वकष्टर्जित यश आणि त्यामागे असलेली त्यांची बाँबे टॉकीजमधली उमेदवारी उगवत्या कलाकारांनी अभ्यासावी, अशीच आहे. पोटे भरण्यासाठी आणि उद्याच्या उदयासाठी त्यांनी प्रसंगी तिथं 'एक्ट्राँ' मध्येही काम केलं. बऱ्याच संघर्षमय कालखंडानंतर स्टुडिओचे कॅन्टीन-मॅनेजर म्हणून त्यांना नोकरी मिळाली. १९३५ ते १९३९ ही चार/पाच वर्ष मोठ्या जिकिरीची गेली. अखेर त्यांच्यातल्या प्रतिभेची चमक बाँबे टॉकीजचे संचालक हिमांशू रॉय यांनी हेरली आणि आपले असिस्टंट म्हणून पटकथाविभागात त्यांची नेमणूक केली. 'आपल्याला हवी ती संधी मिळाली,' अशा कल्पनेनं अमियाजींनी रात्रंदिवस श्रमायला सुरुवात केली. पण पदरात कांही भरीव पडण्यापूर्वीच हिमांशू रॉय निधन पावले आणि बाँबे टॉकीजचे ताबूत थंड झाले. शेवटी ग्यान मुकर्जी, अमिया चक्रवर्ती आणि सुबोध मुकर्जी यांनी हातमिळवणी केली आणि स्टुडिओचे पुनरुज्जीवन करायची खटपट सुरू झाली. केवळ सात दिवसात कै. अमियाजी आणि ग्यान मुकर्जी यांनी एक कथा लिहून काढली. देविका राणी ( श्रीमती रॉय ) यांच्या मार्गदर्शनात झपाट्यानं शूटिंग सुरू झालं. कमीत कमी

निर्मितिकालात तयार झालेलं हे चित्र होतं 'बंधन' आणि बॉक्सऑफिसची जुनी रेकॉर्डस् मोडून या चित्रानं इतिहास घडवला. स्टुडिओ वाचला आणि अमियाजींची कारकीर्द सुरू झाली.

१९३९–४० मध्ये अशोककुमार-देविकाराणी जोडीच्या 'अनजान' चित्रपटाचं दिग्दर्शन करण्याची संधी कै. अमियाकडे चालून आली. हा चित्रपट प्रचंड गाजला नसला तरी १९४२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बसंत'नं ती उणीव भरून काढली. उल्हास, मुमताज शांती, बेबी मधुबाला यांच्या भूमिका आणि पन्नालाल घोषचं संगीत लाभलेला 'बसंत' मॅजेस्टिक चित्रगृहात सत्तर आठवडे गर्दीत चालला. या चित्रपटान अमियाजींना नावकीर्ती मिळवून दिली आणि यशस्वी दिग्दर्शक म्हणून त्यांच स्थान चित्रउद्योगात निश्चित केलं. 'हमारी बात' (१९४३) आणि 'चार आंखे' (१९४४) या बाँबे टॉकीजच्या चित्राची फक्त कथापटकथाच तेवढी अमिया चक्रवर्तींची होती. 'ज्वार भाटा' (१९४४) हे त्यांनी बाँबे टॉकीजसाठी दिग्दर्शिलेल तिसर आणि शेवटचं चित्र. दिलीपकुमार आणि मृदुला ही जोडी. दिलीपचं हे पहिलंच चित्र. त्याचं 'दिलीपकुमार' हे पडद्यावरच नामकरणही अमिया चक्रवर्तींनीच केलं. सरस्वती शास्त्री या तामिळ मुलीशी एव्हाना त्यांचा विवाहही झाला होता. 'ज्वार भाटा'नंतर देविकाराणीशी मतभेद झाल्यामुळे त्याना बाँबे टॉकीजमधून बाहेर पडावं लागल. निर्मितिप्रमुखत्वाची सूत्रं त्यानी सोडली.

स्व. अमिया आता फेमस स्टुडिओमध्ये दाखल झाले आणि सुहागरात (१९४६–४७) हा चित्रपट त्यानी दिग्दर्शित केला. तथापि तो अपयशी ठरला. फाळणीनतर ऑक्टोबर, १९४७ मध्ये अमियाजी (दिग्दर्शन), ग्यान मुकर्जी (निर्मिती), कवी प्रदीप (गीत) आणि अनिल विश्वास व सी. रामचद्र (सगीत) अशा बाँबे टॉकीजच्या जुन्या आधारवडानी एकत्र येऊन गर्ल स्कूल हा चित्रपट काढला. गीताबालीची प्रमुख भूमिका. परंतु चित्रपट अपेक्षेइतका जमून आला नाही आणि धदा तर अजीबात करू शकला नाही. मात्र गीताबाली व मंगला यानी सादर केलेलं भरतनाटचम् हे त्याचं वैशिष्टच ठरलं. हिंदी चित्रपटांत प्रथमच प्रविष्ट होत असलेल्या या नृत्यप्रकाराचं चित्रीकरण पुढे दिग्दर्शक म्हणून प्रकाशात आलेल्या गुरुदत्तच्या देखरेखीखाली झाल, हा आणखी एक योग गुरुदत्त या चित्रपटात अमियाचा पहिला असिस्टट डिरेक्टर होता.

वर्मा फिल्मसाठी अमियानी 'बादल'चं दिग्दर्शन केलं (१९५१). चित्रपट चागला चालला. त्यापाठोपाठच त्यानी 'मार्स अँन्ड मूव्हिज्' ही स्वतःची चित्रनिर्मितिसंस्था सुरू केली ११ जुलै १९५१ ला फेमस स्टुडिओज् (महालक्ष्मी) इथे 'दाग'चा मुहूर्त झाला. दिलीपकुमार–मधुबाला अशी जोडी ठरली. मधुबाला आणि तिचे वडील अताउल्लाखान यानी स्वतःची सस्था सुरू करण्यासाठी अमियाना खूप प्रोत्साहन दिलं होत तथापि ऐनवेळी दिलीप–मधुबालाचे मतभेद उपटल्यामुळे अमियानी तिच्या जागी निम्मीला आणल. मार्स अँन्ड मूव्हिजचं हे पहिलच प्रॉडक्शन हिट् ठरल आणि सस्थेचा पाया पक्का घातला गेला. पतिता (१९५३), बादशाह (१९५४) आणि सीमा (१९५५) ही चित्रे पाठोपाठ आली. 'सीमा' हा अमिया चक्रवर्तींच्या चित्रकर्तृत्वावर कळस चढविणारा 'मास्टरपीस' ठरला नूतन, बलराज सहानी आणि शुभा खोटे यांच्या संस्मरणीय भूमिकांनी 'सीमा' गाजला. नूतनच्या अभिनयाला एवढं आव्हान आणि एवढा वाव सीमामुळेच प्रथम मिळाला आणि तिला यशाची दारं खुली झाली.

'सीमा'नतर 'श्रीरंगम् प्रॉडक्शन्स' या नव्या बॅनरखाली स्व. अमियानी 'देख कबीरा रोया' आणि 'कठपुतली' हा चित्रपट सुरू केले. तथापि त्यापैकी कठपुतली अपुरा सोडूनच त्याना जावं लागल. 'देख कबीरा रोया' पूर्ण झाला तरी त्याच यश ते पाहू शकले नाहीत. 'सीमा'ला जाहीर झालेलं फिल्मफेअर अॅवॉर्डही त्याना स्वीकारता आलं नाही. ६ मार्च १९५७ रोजी त्यानी दिवसभर आपल्या कचेरीत काम केल, आणि त्याना आवडणारं रवी टागोराचं निरोपाचं गाणं मनात घोळवीत त्यानी आपल्या कर्मभूमीतच जगाचा निरोप घेतला.

एक कलावत म्हणून, एक दिग्दर्शक म्हणून अमिया चक्रवर्तींची बरीच वैशिष्टचे सागता येतील. लोकप्रिय ठरणारे चित्रपट काढण्याकडे त्यांचा कल होता, पण त्यांनाही काहीतरी वेगळा घाट, वेगळी दिशा द्यायचा अमियाचा प्रयत्न असायचा. नावीन्याचा अखड हव्यास त्याना होता. त्यानी सतत काहीतरी नवं आणि तेही गंभीरपणे केल. चित्रपटाचा विषय, हाताळणीची शैली आणि अभिनयाचे साचे यात सतत काहीतरी प्रयोग करायचा, बदल घडवून आणायचा प्रयत्न करणाऱ्या द्रष्टचा दिग्दर्शकांपैकी अमिया चक्रवर्ती हे एक होते.

जे आजही (दुर्दैवानं) रग्रविले जातात. असे काही फॉर्म्युले त्यानी चित्रसृष्टीला दिले; त्याच्या 'बसत'मध्ये नायिकेच्या पायात काटा रुततो आणि नायक तो काढतो. मग एक गाण. नायकान नायिकेला कशातून तरी सोडवण्या–वाचवण्याचा हा फॉर्म्युला अजूनही जोरात आहे. 'मेरे छोटे से मन में छोटी सी दुनिया रे' हे एकच गाणी त्यानी दोन / तीन प्रकारे गाऊन घेतलं. एकदा बालगायकाकडूनसुद्धा. सगीताचा हा साचा अजूनही टिकून आहे. 'गर्ल स्कूल'मध्ये भरतनाटचम् नृत्य आणि 'दाग'मध्ये 'लावणी' हा गीतप्रकार याची भर हिंदी चित्रसृष्टीत त्यानी नव्यानच घातली हे दोन्ही प्रकार पुढे खूप गाजले. अनूपकुमार व उषा किरण (गुण),


**पूर्णिया**

**अनिल अवचट**

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

दिलीपकुमार (दाग), माला सिन्हा व अपरेश लाहिरी–सगीतकार भप्पी लाहिरीचे पिताजी (बादशाह) अशा अनेक नव्या कलावताना प्रथमच सधी देऊन पुढे आणण्यातही अमियाजीची ताजेपणाच स्वागत करायची वृत्तीच दिसते.

काम करण्याची तडफ, उत्साही वृत्ती आणि काम करवून घेण्याची हातोटी ही अमियाजीची इतर वैशिष्टच. दागमध्ये दिलीपकडून आणि सीमामध्ये नूतनकडून त्यानी अविस्मरणीय भूमिका वठवून घेतल्या. त्याच्या दाग, पतिता, सीमा, कठपुतली, देख कबीरा रोया अशा चित्रपटाना शकर–जयकिशन वा इतरांनी दिलेल, दर्जा व लोकप्रियतेचा मेळ घालणारं सगीत याचीच ग्वाही देईल

कै अमिया चक्रवर्तीची चित्र निर्हेतुक–निरुद्देश कधीच नव्हती. दुनियेतल्या एकाकी, दुर्दैवी, दुबळ्या, अन्यायाला बळी पडलेल्या, आणि समाजान बाहेर टाकलेल्या जिवाचा टाहो 'पतिता', 'दाग', 'सीमा' यासारख्या त्याच्या चित्रपटातून प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. 'पतिता'मध्ये अत्याचाराचा बळी ठरलेल्या कुमारी मातेसारखा नाजुक विषय त्या काळाच्या सामाजिक पार्श्वभूमीवरही त्यानी सयमान आणि प्रभावीपणे हाताळला. 'सीमा'ची कथाकल्पना तर मुबईतल्या एका महिलाश्रमात घडलेल्या सत्यघटनेतूनच त्यानी उचलली. याच चित्रपटात गाण्याचा अत्यत अर्थपूर्ण उपयोग करून त्यानी चित्रपटाला communication ची एक नवी पातळी, नवा स्तर जोडला 'सीमा' हा त्याच्या चित्रपटक्षेत्रातल्या कर्तबगारीचा क्लायमॅक्स ठरावा या चित्रपटाच्या निर्मितिकाळातच त्याना हृदयविकारान ग्रासल होत आणि त्याचा मृत्यू तसा फार अचानक ओढवला असला तरी त्याची नजर आधीपासूनच अज्ञाताचा वेध घेत होतीच. कदाचित त्यामुळेच श्री बाबूराव पटेल यानी त्याना वाहिलेली शब्दाजली सार्थ ठरते–फिल्मइडियाच्या एप्रिल १९५७ च्या अकात अमियाच्या छायाचित्राखाली ते लिहितात:–

Late Amiya Chakravarty–producer and dirctor

He always tried to look beyond the horizon This time he travelled beyond it. ☐

## बंगालची मोठी देणगी

मला आता नक्की साल आठवत नाही, पण फार वर्षांपूर्वी मी हिमाशू रॉय–बॉंबे टॉकीजचे सस्थापक–त्याना भेटायला गेलो होतो त्याना भेटून परतताना मला एका गृहस्थान थाबवल. 'फिल्मइडियाचे सपादक बाबूराव पटेल ते आपणच ?' गभीर चेहऱ्याच्या त्या बुटक्या तरुणान मला विचारल 'माझ्या कॅन्टिनची चहा आणि भजी आवडली की नाही तुम्हाला ?' 'झकास आणि स्टुडिओच्या मानान तर फारच छान' मी उत्तरलो आणि त्याच्या नावाची चौकशी केली. 'ओमिया चक्रबोर्ती' आपल्या खास बगाली उच्चारात त्यान सागितल अमियाशी माझी पहिली भेट झाली ती अशी.

अमिया त्यानंतर एकदा माझ्या ऑफिसमध्ये येऊन मला भेटला. मी त्याला माझ्या खोलीत घेऊन गेलो आणि तो का आलाय याची चौकशी केली पण तो सकोचला आणि गप्प झाला भावनावेगान नर्व्हस झाला होता तो. हाताची घडी घालून मूकपणे तो बराच वेळ उभा राहिला 'अनजान' या त्याच्या पहिल्या चित्रपटाचा मुहूर्त दुसऱ्या दिवशी होता, त्याच निमंत्रण मला द्यायला आणि माझे आशीर्वाद मागायला तो आला होता. मुहूर्ताला जायला मला थोडासा उशीरच झाला, पण अमिया माझी वाटच पाहत होता. त्यानतर जवळ जवळ तासभर त्या चित्रपटाची सपूर्ण कथा त्यान मला सागितली त्याला शुभेच्छा देऊन आणि त्याच्या वागण्यातल्या उत्कट भावनाशीलतेबद्दल आश्चर्य करीतच मी परतलो.

नोव्हेंबर १९४१ च्या पहिल्या आठवड्यात अमिया पुन्हा एकदा माझ्या ऑफिसात माझ्यासमोर येऊन उभा राहिला हातात फिल्मइडियाचा अक आणि डोळ्यात पाणी 'अनजान'च परीक्षण मी अनूकूल लिहिल होतं आणि तात्रिकदृष्टचा सफाईदार चित्र अशी त्याची प्रशसा केली होती अमिया त्यामुळच सकोचला होता प्रशसा त्यालाही आवडत होती, पण एका प्रशंसकासमोर उभं राहायला सकोच वाटत होता दोष ठरावा इतकी नम्रता होती त्याच्या अगात

अमिया विलक्षण भावनाशील होता निष्ठावत होता स्वभाव काहीसा तापट, पण त्यात आरडाओरडाच खूप. द्वेष-मत्सरं थोडासुद्धा नव्हता. भावनावेग अनावर झाला की, त्याचा आवाज तापायचा आपल्या विचारात आणि सिगरेटच्या धुरात गुरफटून एकटच राहायला त्याला आवडायच चेनस्मोकर होता तो डॉक्टरानी त्याच्या हृदयविकारामुळे सिगरेट सोडायचा इशारा त्याला दिला होता पण असा सल्ला कुणी दिला की, तो कळवळून विचारायचा, 'अरे बाबा, सिगरेटसारखी वस्तू कुणी कशी सोडू शकेल ?'

वेळीअवेळी येऊन आपल्या सिनेमाच्या गोष्टी मला ऐकवणारा आणि ऐकवताना शेवटी ओरडा-बखेडा करणारा अमिया आता नाही, त्यान मला चुकल्याचुकल्यासारख वाटणार आहे त्याच कुठलच कथाकथन आरडाओरड केल्याशिवाय पुर होतच नसे आणि यालाच तो 'नॉर्मल' प्रकार म्हणायचा भावनाच्या विश्वातच हा माणूस सदैव वावरला. त्याची व्हिज्युअलायझेशनची ताकद आणि बहुविध वास्तववाद मला नेहमीच चक्रावून टाकायचे.

बगालन आपल्या चित्रसृष्टीला दिलेल्या सर्वश्रेष्ठ देणग्यापैकी अमिया चक्रवर्ती ही एक. एकाच वेळी थड आणि भावनाशील, रागीट आणि सहनशील, बुजरा आणि आक्रमक, उदास आणि उत्साही, ओबडधोबड आणि सभ्यसुसस्कृत आणि तरीही निष्ठावत असा होता तो. परस्परविरोधी स्वभावविशेष अमियामध्ये नुसते एकत्र नादत होते एवढच नाही, तरी त्यातनच त्याच्या आयुष्यात नवे रग भरले जायचे

अमिया आता आपल्यात नाही. त्याच्या आयुष्यासारखाच त्याचा मृत्यूही अनपेक्षित वेगान घडून आला. आपल्या कलासाधनेच्या पवित्र स्थानावरच त्यान ६ मार्च १९५७ च्या सध्याकाळी देह ठेवला. पचेचाळीस वर्षे वयाच्या एका भावावेगाची ती अखेर होती.

गमत म्हणजे आपल्या एका तरुण मित्राचा–अमिया चक्रवर्तीचा–मृत्युलेख भरल्या डोळ्यानी लिहायला दैवान मला–एका वृद्धाला–जिवत ठेवलय. कदाचित मृत्यूलाही आपल्या बलिवेदीवर ताजी फुल वाहिलेली आवडत असतील. आमेन !

**('फिल्म इडिया'च्या एप्रिल १९५७ च्या अंकात श्री. बाबूराव पटेल यांनी स्व. अमिया चक्रवर्तीवर लिहिलेल्या मृत्युलेखातील काही भागांचा स्वैर अनुवाद)**

# ट्रक-टँकर्सच्या संपामागील राजकीय हेतू : पृष्ठ १ वरून

आणण्याचा प्रयत्न करणार व कम्युनिस्ट पक्षही तोच प्रयत्न करणार ! त्यामुळे दोघाचे समान उद्दिष्ट राहील व समान उद्दिष्टासाठी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य करण्याशिवाय कम्युनिस्ट–काँग्रेसला दुसरा मार्ग राहणार नाही. स्वत:च्या ताकदीवर काही घडवून आणावे अशी परिस्थिती दोन्ही पक्षाचीही नाही. काँग्रेसला ३० वर्षांत आंदोलने माहिती नाहीत. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते आंदोलनाच्या कार्यक्रमात किती भाग घेणार आणि किती निष्ठेने आदोलने करणार, हाही प्रश्नच आहे ! कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणामुळे कामगारजगतातही त्याच्याविषयी भ्रम–निरास होऊ लागला आहे. यामुळेही कम्यु-निस्ट–काँग्रेस सहकार्य होईल.

जनता पक्षाचे सरकारने मूळ धरलेले नाही तोच त्याच्यावर मूलेकुठार करण्यासाठी सप घडवून आणण्याचा पवित्रा काँग्रेस व कम्युनिस्ट यानी घेतला आहे. मुबईच्या ठाणे–बेलापूर पट्ट्यात ५०–७५ उद्योगातील २०–२५ हजार कामगार सपावर गेले आहेत. शिवाय २०० उद्योगामधून सपाच्या नोटिसा लावल्या आहेत मालकानी टाळेबंदी केल्यामुळे अनेक कारखाने बंद आहेत. कारखान्यातील सप–टाळेबदी यामुळे उत्पादन बद आहे. हे वातावरण काही दिवस राहिले तरी देशाच्या बऱ्याच मोठ्या भागात अगदी अराजक माजले नाही तरी गोधळ माजेल ! हा धोका सभवतच नाही असे नाही ! या धोक्याची बरीच शक्यता आहे. गोधळाची परिस्थिती काही भागात निर्माण झाली की, कम्युनिस्ट पक्षाची 'शाततेच्या मार्गावरील निष्ठा' ढासळणारच नाही, हे कोणी छातीवर हात ठेवून सागू शकेल काय ? जनता पक्षाचे सरकार ही परिस्थिती कशी हाताळते, यावर पुढचा काळ सघर्षाचा ठरणार, की शाततामय होणार हे अवलबून आहे. कम्युनिस्टाना आवरावयाचे असेल तर त्याचा बोलावता धनी रशियाशी नव्या सरकारने फटकून वागता कामा नये. रशियाशी जमवून घेतले तर त्याच्यामार्फत येथील कम्युनिस्ट पक्षाचे ताबूत थड करता येतात, हे पं. नेहरूनी स्वीकारलेल्या धोरणाने दाखवून दिले होते ते जर जनता पक्षाच्या सरकारने केले नाही तर आज मुबईच्या ठाणे–बेलापूर पट्टीत सपाचे वातावरण आहे, ते अवजड उद्योगात पुन्हा सुरू होऊन वस्तूचा अपुरा पुरवठा, वाढत्या किमती, वाहतुकीची व्यवस्था या साऱ्याच आघाड्या घडाडू लागतील ! जनता सरकारचे नवे आर्थिक धोरण जाहीर होण्यापूर्वीच हे घडून आले तर जनता साधकबाधक गोष्टीचा विचार करण्याच्या मन स्थितीत राहणार नाही

चिलीमध्ये सी. आय. ए. ने कट करून अलादे याचे सरकार उलथून टाकले. त्यापूर्वी तेथे वस्तूची टचाई, महागाई असेच वातावरण निर्माण केले होते. तेवढ्या मोठ्या प्रमाणावर नसले तरी वस्तूचा पुरवठा होऊ द्यावयाचा नाही, उत्पादन रोखायचे आणि जनता तिच्या दैनंदिन गरजासाठी बेजार झाली की, आपली राजकीय पोळी भाजायची, या हेतूनेच आजचे राजकारण खेळले जात आहे जुन्या लफड्याची चौकशी करण्यावर भर देऊन या लफड्याच्या गुगीत जनतेला ठेवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी जनता सरकारने नवे आर्थिक धोरण अमलात आणण्यावर भर दिला पाहिजे. त्या पक्षाचे यश त्यावर अवलबून आहे ते केले नाही तर देशात वेगळीच परिस्थिती निर्माण होईल. येत्या पाच वर्षाच्या काळात जनतेचा जनता सरकारवरील विश्वास उडेल. एकाच पराभवात काँग्रेस पक्ष विकलाग–अर्धांगवायू झाल्यासारखा निकामी झाला आहे. तो पक्ष पुन: पहिले स्थान घेऊ शकणार नाही. दुसरा पर्यायी प्रबळ पक्ष नाही. अशा परिस्थितीत पाच वर्षानंतर केंद्रात कोणत्या तोंडावळ्याचे सरकार येणार हे प्रश्नचिन्ह आहे. ते टाळावयाचे असेल तर सध्याच्या सरकारला दिलेल्या अवघड आश्वासनाची परिपूर्ती करण्याच्या कामाला पहिल्या वर्षापासूनच ठोस पावले उचलावी लागतील. तीच पावले डगमगली तर मात्र जनता सर्वच पक्षाना एकाच मापाने जोखील !

□

ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

**श्री ग्रा मा य न**

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये